ॐ

श्रीमत्
स्वामी

विवेकानंद
यांचा
सामर्थ्यवान् संदेश.

१९२६

प्रकाशक,
शिवराम वामन आवटी (विद्वांस)
श्री भारतप्रकाशन कार्यालय,
मुंबई व पुणें.

किंमत १२ आणे

प्रकाशक—शिवराम वामन आवटी (विद्वांस)
५३८ शनिवार पुणें व चंद्रमहाल मुंबई नं. ४.

मुद्रकः—दि. सी. सांखळकर, लोकसेवक प्रेस,
खटाव मकनजीची वाडी, मुंबई नं. ४.

श्रीमत् स्वामी विवेकानंद यांचा सामर्थ्यवान् संदेश.

अनुक्रमणिका.

"I have a meassage for the world which I will deliver without fear and without care for the future. To the reformers I will point out that I am a greater reformer than any one of them. They want to reform only little bits. I want root-and-branch reform."

SWAMI VIVEKANANDA.

व्यासंगानेंच अधिकारयुक्त व धीरोदात्त लेखणीनें लिहितां येतें. नाऊमेद होऊं नये. The art of scratching is the art of writing हें लक्ष्यांत ठेवावें. यथाशक्ति आम्हीं अशा लेखकांचीं उत्तम पुस्तकें हौसेनें प्रकाशित करूं.

वाचकवर्गास विज्ञप्तिपूर्वक हेंच सांगणें आहे कीं, सदभिरुचि उत्पन्न करणें हेंच खरें कल्याणकारक आहे. स्वामी विवेकानंदांसारख्यांच्या उपदेशाकडे केवळ 'तत्वज्ञान' या दृष्टीनें बघून किंचितही कानाडोळा करूं नये. तापलेल्या दुधांत दूध व साय असा जरी कारणपरत्वें निराळा भाव दिसून येतो तरि पूर्वस्वरूपांत ज्याप्रमाणें दोन्ही समरूप असतात तद्वत् व्यवहार व तत्वज्ञान आहेत. समंजस व्यवहार म्हणजेच तत्वज्ञान. प्रत्यक्ष व्यवहारांत मनुष्यास पारमार्थिक दृष्टयाच नव्हे तर पूर्ण ऐहिक दृष्टयाही प्रत्यक्षपणें उपयोगी पडतें, व प्रत्यक्ष व्यवहारांत अनेकवेळां गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित होतात, त्यावेळीं तर खरी मदत तत्वज्ञानामुळेंच होते. यास्तव ऐहिक दृष्टीनेंही खरा सुखी होऊं इच्छिणारानें महात्म्यांचा उपदेश एकनिष्ठेनें मनन करून त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय करावा. असो. आतां येथेंच थांबणें योग्य. कारण आमचे हे चारच शब्द.

मुंबई,
जून १९२६. } शिवराम वामन आवटी. (विद्वांस)

अनुवादनापूर्वी आत्मनिवेदन.

राष्ट्राच्या अवनतकालीं मोहवश जनतेला जागृतीचा कर्णा फुंकून जागें करणें हें राष्ट्रजागृतीचें कार्य स्वामी विवेकानंदांसारख्या दिव्य अंतर्दृष्टीच्या सत्पुरुषांच्या दिव्य संदेशानेंच होत असतें. या पवित्र भावानें प्रेरित होऊन The Ramkrishna Mission Student's Home, Calcutta या संस्थेचे कार्यवाहक स्वामी निर्वेदानंद यांनीं विवेकानंदाच्या ओजस्वी वाङ्मयांतून परम उज्ज्वल दिव्य संदेश SWAMI VIVEKANANDA on India and her Problems या पुस्तकांत एकत्रित केले आहेत. ते दिव्य संदेश राष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत जाऊन थडकले पाहिजेत. तो जागृतीचा डंका राष्ट्राच्या रोमारोमांतून प्रतिध्वनित झाला पाहिजे. यासाठीं त्या संदेशाचे सर्व राष्ट्रभाषांतून अनुवाद झाले पाहिजेत. महाराष्ट्र भाषेंत अनुवाद करण्याची परवानगी स्वामी निर्वेदानंदजीकडे मागितल्यावरून ती त्यांनीं मोठ्या उदार अंतःकरणानें दिली आणि जगद्गुरूंचा दिव्य संदेश महाराष्ट्रीय तुतारींतून ऐकविण्याचा शाहीरी मान मला दिला याबद्दल त्यांचे कृतज्ञ अंतःकरणानें आभार मानतों.

अनुवादनांत मूळ इंग्रजीला महाराष्ट्र भाषेचा पेहराव चढवतांना अलंकाराचा समतोलपणा राखण्याचा प्रयत्न सर्वत्र केला आहे. कांहीं ठिकाणीं मूळ विचार विशद करणें आवश्यक वाटल्यावरून तसें करतांना अनुवादनीय शाब्दिक नियमनांचें उल्लंघन करणें अपरिहार्य झालें आहे; परंतु क्वचित स्थळीं दोन चार अलंकार कमी जास्ती

झाले असले तरीही स्वामीजींच्या भावनाशीं मेळ घालण्याची सर्वत्र खबरदारी घेतली आहे.

शेवटीं ज्या ज्ञानवृद्ध सुहृदांनीं व सुजनांनीं या अत्यंत महत्वाच्या कार्यमूर्तींच्या कामीं मला बिनमोल सहाय्य केलें त्या सर्वांचे आभार मानून ही माझी अनुवादन कृति प्रसिद्ध करण्याची कृपा केल्याबद्दल श्रीभारत प्रकाशन कार्यालयाच्या प्रेमळ चालकांचे आभार प्रदर्शित करून हें आत्मनिवेदन पुरें करतों.

सुजन चरणारविंदीं मिलिंदायमान,

गंगाधर भाऊराव निरंतर.

—अनुवादक.



SWAMI VIVEKANANDA

·The Hindoo Monk of India·

श्रीमत् स्वामी विवेकानंद
यांचा
सामर्थ्यवान् संदेश.

आमच्या मातृभूमीचें वैभव.

या पृथ्वीतलावर ‘ पुण्यभूमि ’ म्हणून संबोधण्यासारखा जर कोणता देश असेल तर आमचा आर्यावर्त हा एकच आहे. पृथ्वीवरील प्रत्येक जीवात्म्यास कर्मयोगासाठीं योगभूमि म्हणून भरतखंड हा एकच भूप्रदेश आहे. परमात्मगामी अशा प्रत्येक जीवात्म्यास अंतिम ध्येय जें ईशस्वरूपीं विलीनत्व, तें परमोच्च दिव्यधाम गांठण्यासाठीं या पुण्यभूमीचाच आश्रय केला पाहिजे. या पुण्यभूमींतच मनुष्यजातीची सर्वांगीण उन्नति झाली. शांति, औदार्य, दया, पावित्र्य, या सर्वांचें अंतिम ध्येय गांठून आध्यात्मिक उन्नतीच्या दिव्य प्रभावानें, मानवी शक्ति ज्या भूमींत पूर्णत्वास पोहोंचली ती हीच एक आर्यभूमि होय.

२ पर्वतश्रेष्ठापेक्षांही अचल आणि दृढतर पायावर उभारलेलें आर्यावर्तांचें वैभवमंदिर आजही तितक्याच दिव्य तेजानें व दैवी शक्तीनें आपल्या अविनाशित्वाची साक्ष विश्वास पटवीत उभें आहे. हिंदुस्थान

आत्म्याप्रमाणेंच अनाद्यनंत आहे. आणि अशा पूज्य हिंदभूमीचे—आर्य-भूमींचे—आपण आर्यपुत्र आहोंत.

३ अनादिकालापासून तों आज अगदीं प्राचीनकाळांतही मानवी जीवाच्या आयुष्याचें परमोच्च ध्येय या एका पुण्यभूमींतच आहे. धर्मभूमि, वेदांतभूमि आणि देवांची जन्मभूमि असा हा आर्यावर्त अध्यात्म्याचें आदिस्थान आणि परमपवित्र अशी यज्ञभूमि आहे.

४ वेदांतविद्येचें व आध्यात्माचें उगमस्थान, परमार्थाचा सोपान, भक्ति, नीति, प्रेम, पावित्र्य आणि सौंदर्य यांचें जननस्थान असा हा हिंदुस्थान, इतक्या कालावधीनंतरही आज विश्वाच्या आद्यस्थानींच विराजमान आहे. आणि जगाच्या अनुभवावरून मी अगदीं खात्रीनें आणि अधिकारी वाणीनें जाहीर करतों कीं, भारताची ही आध्यात्मिक दैवी-शक्ति जगाच्या आधिभौतिक सामर्थ्यापेक्षांही आजच्या अवनतकालींही श्रेष्ठच आहे. आध्यात्मिक हिंदुस्थान आजच्या क्षणींसुद्धां विश्वाच्या परमोच्च पदावरच आहे.

५ आज ज्या देहात्मवादी असुरांच्या आधिभौतिक ऐश्वर्यासाठीं, लाखों जीवांचा संहार होत आहे. देहात्मवादाची भडकती आग विझविण्याचें सामर्थ्य असलेला चैतन्याचा जीवनझरा अखंड वेगानें या पुण्यभूमीवर वहात असल्यानें, विश्व आधिभौतिक ज्ञानाच्या हांवेनें सत्ता-धीशांच्या ऐश्वर्यानें चिरडत असतां, हिंदुस्थान मात्र शांतिनिकेतन आहे.

६ हिंदुस्थाननें जगाला दिलेलें ज्ञानरूपी ऋण कधींही न फिटणारें आहे. जगाच्या नकाशावरील देशामागून देश असा प्रत्येक देश पहाल तर सर्व जगभर अशी एकही वसाहत किंवा ज्ञाति तुम्हांला सांपडावयाची

नाहीं कीं, जिच्या विश्वसेवेपेक्षां सौजन्यशील भारतानें विश्वावर केलेले उपकार लाखों पटींनीं जास्त नाहींत.

७ हळुहळु आणि नकळत होणाऱ्या दंवबिंदूच्या सिंचनापासून गुलाबकलिका उमलविल्या जातात. (पण त्यांच्या सुगंधानें सर्व वातावरण दरवळून जाईपर्यंत विश्वास त्या सुंगधाचा उगम, त्या कलिकांचा उद्भव, ह्याविषयीं जाणीवही नसते.) विश्वाच्या विकसनार्थ कारणीभूत झालेलें आर्यावर्ताचें ज्ञानकार्यही अशाच स्वरूपाचें आहे.

८ जगांतील धर्मसंशोधनावरून अनेक विद्वानांच्या असें प्रत्ययास आलें आहे कीं, जगांत असा एकही देश अस्तित्वांत नाहीं कीं, ज्याच्या धर्मांतील नीतितत्त्वांचा सांठा आर्यधर्मांतून घेतलेल्या नीतितत्त्वांवर उभारलेला नाहीं. आणि जगांत असा एकही स्वयंभू धर्म नाहीं कीं, ज्याच्या मध्यें, हिंदुधर्मांतून आत्म्याच्या अमरत्वाविषयीं जीं सुंदर विवेचनें अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्षपणें त्यांनीं उचललीं आहेत, त्यापेक्षां एकतरी उदात्त तत्त्व किंवा ध्येय त्यांच्या धर्मांत प्रतिपादिलें आहे.

९ ज्या देशांतील वानप्रस्थाश्रमी ऋषींच्याच वंशांत—राजांच्या नव्हे किंवा चांचेगिरीसारख्या क्षुद्रवृत्तीनें उपजीविका करणाऱ्या लुटारू सरदारांचे वंशांत नव्हे, तर जगानें अशिक्षित म्हणून गणलेल्या ऋषीश्वरांच्याच वंशांत क्षत्रियकुलावतंस भूपाल निपजले अशा एखाद्या देशाची कीर्ति तुमच्या कानावर आली आहे काय ?—तोच हा विक्रमशाली भारतवर्ष !

१० पाश्चात्य शास्त्रज्ञ, 'शक्ति हेंच जीवनकलहाचें साधन,' याविषयीं हजारों सिद्धांत व उपपत्त्या यांच्या परिशीलनांत व विवेचनांत गुंग आहेत; आणि असेंही ठांसून सांगत आहेत कीं, "आधिभौतिक

सामर्थ्य—शारिरिक संपत्तीच—अविनाशी आहे." शारिरिक सामर्थ्यानेंच चिरकाल टिकेलशी जिवंत स्मृति मागें राहूं शकेल; पण जर त्यांचे सिद्धांत खरे असते तर मी त्यांना विचारतों कीं, (रोमन व ग्रीक अशीं) अत्यंत बलाढ्य आणि जुनीं जुनीं राष्ट्रें, आत्मिक सामर्थ्याच्या अभावीं ढिळ्यास न जातां, आजही आपल्या वैभवस्थानीं विराजमान व्हावयास पाहिजे होतीं; आणि त्यांच्या पाशवी शक्तीपुढें आम्हां साधुवृत्तीच्या दुबळ्या हिंदूंचा तेव्हांच धुव्वा उडावयास पाहिजे होता. मग तीं राष्ट्रें आज कालाच्या चक्रांत नाहींशीं कां झालीं ? त्यांची अविनाशी शक्ति विनाशाप्रत कां गेली ? उलट एकाही राष्ट्रास न लुटतां लुबाडतां, एकाही जातीवर किंवा धर्मावर जुलूम न करितां विश्वबंधुत्वानें विश्वाशीं सख्य करून आमच्या आध्यात्मिक बलावर आज आम्हीं तीस कोटी हिंदु आमच्या राष्ट्रासुद्धां जिवंत आहोंत ! मग अविनाशी सामर्थ्य कोणचें—आधिभौतिक कीं आध्यात्मिक ?

११ जगांतल्या सर्व जातींत हिंदू ही एकच जात, जगांतल्या सर्व राष्ट्रांत हिंदुस्थान हें एकच राष्ट्र, चिरंजीवि आणि चिरविजयी होणारें आहे. आणि आत्मजयाचा शुभाशिर्वाद आमच्या पुण्याईनें आम्हाला आहे म्हणूनच आम्हीं आज विश्वाचा साद्यंत इतिहास सांगण्यासच कीं काय राष्ट्ररूपानें जिवंत आहोंत.

१२ जगांतल्या सर्व मानवी प्राण्यांतला मी एक अत्यंत गर्विष्ठ प्राणी आहें असेंही म्हणा, पण मी तुम्हांला स्पष्ट सांगतों कीं हा वैयक्तिक अभिमान नसून माझ्या वंशपरंपरेबद्दलच्या अत्युच्च अभिमानानें मी हें विधान करीत आहें. आर्यवंशजांनों, हिंद तरुणांनों, भारताचा

वाली तो परमेश्वर तुमच्या अंतःकरणांत तितकाच जाज्वल्य देशाभिमान जागृत करो. वंशपरंपरेनें आलेलें तें देशाभिमानाचें चैतन्य तुमच्या रोमरोमांत भिनूं द्या. आयुष्याचें तेंच एक अत्युच्च आणि उज्वल ध्येय ठेवा. तोच एक तुमच्या जिव्हाळ्याचा विषय होऊं द्या; आणि आपलें आर्यतेज विश्वोन्नतीसाठींच सांठवून त्या तेजानें विश्वास दिपवा व पवित्र करा.

१३ हा भरतखंड आज हजारों वर्षांपासून या एकाच शांततेच्या तत्त्वावर जिवंत आहे, व त्याच एका शांततेच्या तत्त्वाचा प्रसार करीत त्याच तत्त्वावर उभारलेलीं तत्त्वें प्रतिपादीत आहे. उपदेशाच्या प्रत्येक शब्दापूर्वी आशीर्वाद आणि प्रत्येक शब्दापुढें शांततात्मक शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

१४ सर्व जगाच्या इतिहासाचा सूक्ष्मदृष्ट्या अभ्यास करा. त्यांत तुम्हांला शेवटीं असेंच आढळून येईल कीं, ज्या उदात्त तत्त्वांवर जगाचा विस्तार झाला त्या प्रत्येक उदात्त तत्त्वांचा उगम या आर्यभूमींतच झाला आहे. असंख्यात कालापासून मानवी समाजापुढें उदात्त व परमोच्च तत्त्वरूपी रत्नें फेंकणारीं हिंदुस्थान ही एक तेजोमय खाणच आहे. असल्या गहन व उदात्त तत्त्वांचा उगम या भारतभूमींत होऊन मातृभावानें, आपपरभावरहित वात्सल्यानें, गुरुकृपेच्या औदार्यानें, अनादिकालापासून हा भारतवर्ष त्या तत्वांचा निष्काम लोकसेवाद्वारें प्रसार करीत आहे व आत्मोन्नतीबरोबर विश्वाचाहि उत्कर्ष करीत आहे.

२

गायनांत ज्याप्रमाणें एखादा मुख्य सूर असतो त्याचप्रमाणें प्रत्येक राष्ट्राचा असा एक विशिष्ट आलंब असतो. धर्म हाच अनादिकालापासून आर्यांच्या उत्कर्षाचा ध्रुवबिंदु ऊर्फ आलंब होय व त्याच्या भोंवतीं आर्यावर्ताच्या उत्कर्षापकर्षाचें चक्र प्राचीन काळापासून फिरत आहे, आणि वाटेल तशी घडामोड झाली तरी हा अध्यात्म उर्फ वेदान्ताचा ध्रुवबिंदु प्रसंगामध्यें आम्ही तो न सोडणें हेंच आमचें मुख्य कर्तव्य समजून धर्मसुधारणेखेरीज इतर सर्व सुधारणा अनुषंगिकच समजतों.

२ मला असें वाटत कीं, ज्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीला आयुष्यांत गांठावयाचें असें एक अत्युच्च ध्येय असतें व तें ध्येय किंवा तो आयुष्याचा उच्च बिंदु लक्षूनच त्याच्या प्रत्येक क्रिया, भावना, विचार त्या ध्येयाचे ठिकाणींच एकरूप होतात; त्याचप्रमाणें प्रत्येक देशांत सुद्धां त्या देशाचें विशिष्ट असें ध्येय असतें; आणि त्या ध्येयरूपी आलंबाला अनुसरूनच त्या राष्ट्रांतील सुधारणा, भावना, कृती हीं सर्व असतात. त्या राष्ट्राच्या उत्कर्षापकर्षाचें जें चक्र तें या विशिष्ट ध्येयरूपी कण्यावरच फिरत असतें. उदाहरणार्थ इंग्लंडप्रमाणें एखाद्या देशाचें राजकीय सत्ता हेंच ध्येय असतें. त्या राष्ट्राचा तो आलंब आणि त्याला अनुसरूनच त्यांच्या धार्मिक, सामाजिक, औद्योगिक कोणत्याही प्रकारच्या चळवळीचा किंवा उन्नतीचा ओघ वहातो. नैतिक प्रगतीची दिशा, राजनीतीचीं तत्त्वें हीं सर्व त्या राजकीय सत्तारूपी ध्येया-

वर उभारलेलीं असतात. कोणाचें आधिभौतिक आयुष्य हेंच एक ध्येय असतें. आर्यावर्ताचा धर्म हाच एक ध्रुवबिंदु आहे; व तें राष्ट्रीय आयुष्याचें ध्येय, राष्ट्रीय जीविताचें जीवन, राष्ट्रगीताचा मुख्य ध्वनि, राष्ट्रनौकेचें उद्दिष्ट स्थान व राष्ट्रोत्कर्षापकर्षाच्या नेमिचक्राची आंख आहे. जर एखादें राष्ट्र, आधिभौतिक उन्नतीसाठीं आध्यात्मिक ज्ञानाचा पूर्ण लय करीत असेल व राष्ट्राच्या उन्नतिमार्गावरील अत्यंत तेजस्वी असा जो वेदांतज्ञानाचा प्रज्वलित दीप त्याचें तेज लोपवून क्षुद्र स्वार्थासाठीं धर्मतेजाचा व्यय करून, सर्वभक्षक कालचक्रांतून ज्या दिव्य शक्तीनें त्याला जगणें शक्य झालें, त्याच दिव्य मार्गाला त्यानें सोडलें तर त्या राष्ट्राचें आयुष्य संपलेंच. आणि म्हणूनच जर धर्माचा आलंब सोडण्याचा प्रयत्न करून, राजकीय, सामाजिक किंवा कोणच्याही आलंबाचा स्वीकार कराल व 'धर्म' हें आर्यावर्ताचें ध्येय बदलून इतर कोणतेंही ध्येय आपल्या शक्तीचें केंद्र करालतर त्या प्रयत्नाचें पर्यवसान तुमच्या नाशांतच होईल.

३ हा माझा सिद्धांत आहे व माझी त्याच्या सत्यतेविषयीं पूर्ण खात्री झाली आहे. प्रत्येक राष्ट्रौघांत एखादा तरी मुख्य प्रवाह असतो कीं त्याच प्रवाहानुसार राष्ट्रनौका वहाते आणि भारतांत धर्म हाच मुख्य राष्ट्रौघाचा प्रवाह आहे. तोच इतका प्रबल करा कीं आसपासचे वाटेल तसे उलटे सुलटे प्रवाह त्याच्याशीं एकरूप होऊन त्याच प्रवाहास शेवटीं येऊन मिळतील. त्या मुख्य प्रवाहाचें वळण न बदलतां इतर प्रवाहांचें वळण बदला.

४ धर्मसुधारणा, धर्मसंरक्षण, धर्मसंवर्धन आणि मग या विश्वोद्धारक धर्माची प्रवर्तनरूपी विश्वसेवा हेंच आमचें ध्येय ! (धर्म हा राष्ट्राचा आलंब असल्यामुळें धर्मप्रवर्तक हे राष्ट्राचा आत्मा होत.) वैयक्तिक ध्येयानुगामी जीवितौघ या राष्ट्रीय ध्येयाच्या प्रवाहांत येऊन मिळावा म्हणजे सर्व हिंदुमात्राच्या ध्येयप्रवाहाच्या संगमानें होणारा राष्ट्रीय ध्येयरूपी प्रचंड ओघ राहिलेलें (ध्येयप्राप्तीचें) कार्य आपोआप घडवून आणील. हिंदमातेच्या विराटस्वरूपांत आपलें व्यक्तित्व विसरून जा. (आर्यावर्तांतील आध्यात्मिक ज्ञान इतक्या परिणतावस्थेला गेलेलें आहे कीं, त्यांत आणखी एकाही ज्ञानकणाची उणीव नाहीं) भारतीय आध्यात्मज्ञानरूपी ध्वज इतक्या उत्तुंग शिखरावर रोंविला आहे कीं, त्याच्या परमोच्चतेची परमावधी झाली आहे.

५ आयुष्याच्या कोणत्याहि अवस्थेंत जर चैतन्य रोमरोमांत भिनलें असेल, शुद्ध व सात्विक असें जोमदार रक्त अंतरंगांत स्वैर खेळत असेल, तर एकाही रोगजंतूस देहांत थारा मिळत नाहीं. आमचें राष्ट्र चैतन्य राष्ट्राचें सात्विक व अतएव जोमदार रक्त म्हणजे आत्मनिष्ठा व आत्मसामर्थ्याचें तेज हेंच होय. जर तें अत्यंत शुद्ध व अत्यंत जोमदार अशा स्थितींत राष्ट्र-स्वरूपी हिंदमातेच्या विराटस्वरूपाच्या प्रत्येक घटकांत जिवंतपणानें रहात असेल तर राष्ट्ररूपी विराटपुरुषाचें चैतन्य कायम आहे हें खास ! त्या अंतर्हित चैतन्यशक्तीनें राजकीय, सामाजिक इत्यादि कोणत्याहि राष्ट्रांगाचा दुबळेपणा एका क्षणांत भरून निघेल पण त्या आत्मशक्तीच्या अभावीं आपल्या सर्व चळवळी फोल ठरतील हें आपणास जगाच्या इतिहासावरून दिसून येईलच.

६ **'अहं ब्रह्मास्मि'** या स्वातंत्र्यपोषक परमोच्च तत्त्वाचा प्रतिपादक जो वेदांतधर्म हेंच आर्यावर्ताचें आयुष्य, विश्वाच्याहि अंतापर्यंत सर्व शक्तींना त्याच एका वेदांतधर्मसंरक्षणासाठीं केंद्रीभूत करणें हेंच आपल्या आयुष्याचें जीवितकार्य, जीवन व इतिकर्तव्यता होय. वेदांतधर्माचा लय हा भारताचा आध्यात्मिक व आधिभौतिक असा दुहेरी संपूर्ण नाश होय. अत्यंत उन्नत अशा सुधारणाकालींही फार काय पण प्रत्येक आर्यपुत्रावर कुबेराच्या संपत्तीचा वर्षाव झाला तरि, त्या प्रचंड ऐहिक सामर्थ्यावरसुद्धां, विश्वाच्या साम्राज्यशक्तीच्या बलावरही, केवळ एका वेदांतशक्तीच्या अभावीं हिंदुस्थान एक पळभरही जगणें शक्य नाहीं.

७ राजकीय सत्तेच्या संपादनार्थ सर्व शक्तींचा लय करणाऱ्या इतर राष्ट्रांना वाटेल तेवढें बलाढ्य होऊं द्या. व्यापाराभिवृद्धीनें अगणित संपत्ति लुटणाऱ्या राष्ट्रांना सांपत्तिक वैभवाच्या वाटेल तेवढ्या गप्पा मारूं द्या. ऐहिक सामर्थ्यानें विश्वास आकळूं पाहणाऱ्यांना वाटेल त्या बढाया मारूं द्या. आर्य अंतःकरणास या ऐहिक सुखाची लालसा नाहीं, त्या वैभवाची फिकीर नाहीं व त्याची जाणीव करून घेण्याची इच्छाही नाहीं.

८ आत्मज्ञान, धर्माचरण, परमेश्वराची अनन्य भक्ति, आत्म्याच्या अमरत्वाविषयीं जाणीव, अनंतत्वाचें आकलन, परमोच्च मोक्षावस्था व निर्बंधत्व या आध्यात्मिक ज्ञानांगांच्या बाबतींत जर एखाद्या भाविक, श्रद्धाळू अशिक्षित हिंदु शेतकऱ्याच्या अंतःकरणाचा तुम्ही ठाव घ्याल तर मी तुम्हांला प्रतिज्ञेवर सांगतों कीं, पाश्चात्य देशांतील अहंमन्य तत्वज्ञात्यांपेक्षां त्यांच्या अंतःकरणांत आत्मज्ञानदीप जास्त प्रज्वलित दिसेल. त्या धर्मसुधारकांपेक्षां तो जास्त धार्मिक, श्रद्धावान् असा तुम्हांस दिसेल. त्या

तार्किकांना ज्या भगवंताचा, आगमानिगमांचीं वनें धुंडूनही, सुगावा सुद्धां लागला नाहीं तोच भगवंत त्या श्रद्धाळू भाविक जीवांनां प्रत्येक झाडाझुडपांत असलेला दिसतो, असल्या श्रद्धाबलाच्या योगानें वाटेल ते तेथें त्या जगन्नियंत्यास पाहूं शकतात व म्हणेल तेव्हां तो भावाचा भुकेला भगवंत त्यांच्या साह्यार्थ धांव घेतो. पांडित्यप्रकर्षणाच्या आगीनें त्याच्या अंतःकरणांतील श्रद्धेचा ओलावा आटून गेला नसल्यामुळें त्यांचा भाव भक्तिरसानें ओथंबलेला असतो.

९ तुमचीं राजकीय भाषणें, सामाजिक पुनरुज्जीवनाविषयींचे वादविवाद, सामर्थ्यसंपादनाचे व व्यापाराभिवृद्धीचे हजारों सिद्धांत हीं सर्व पालथ्या घागरीवरील पाण्याइतकीं निष्क्रियच ठरतील.

१० मी असें प्रतिपादन करीत नाहीं किंवा माझा तसा आशयही नाहीं कीं, राजकीय व सामाजिक सुधारणा किंवा चळवळी आवश्यक नाहींत, परंतु मला तुम्हाला हेंच पटवावयाचें आहे कीं, तीं सर्व ध्येयसंपादनाचीं, उन्नतीचीं उपांगें आहेत. आर्यावर्ताच्या अभ्युदयाची उपास्यदेवता आत्मिक बल हें एकच आहे. व्यक्तिविषयक स्थानिक धर्माला राष्ट्रीय धर्मापेक्षां जास्त महत्त्व देतां कामा नये.

११. एक वेळ गंगाप्रवाह हिमालयांत परतवून तो बदलवतां येईल एवढीही प्रचंड महत्त्वाकांक्षा तुम्हांस पुरी करतां येईल; पण आर्यसंस्कृतीच्या वळणांतून तुम्हांस एक निमिषमात्रही बाजूस होतां येणार नाहीं. आर्यावर्तानें, स्वधर्म, स्वसंस्कृती फेंकून देऊन एखादा नवीनच राजकीय किंवा इतर ऐहिक सामर्थ्यसंपादन हा आपला आलंब करणें कालत्रयींही शक्य होणार नाहीं. अनंतकालापासून वहात आलेला

आर्यसं कृतीचा प्रचंड ओघ बदलविणें कधींही शक्य होणार नाहीं. हें कार्य मानवी शक्तीच्या आटोक्याबाहेरचें आहे. (आर्यावर्तानें आर्य-संस्कृती सोडणें हें प्राणज्योत मालवून जगण्याचा प्रयत्न करण्याइतकेंच हास्यास्पद व आत्मघातकीपणाचें होणार आहे.)

१२. निर्घृण उत्क्रांतिचक्रांत चिरडून न जातां आज आर्यावर्त जिवंत आहे याचें कारण हेंच कीं, धर्माचें आणि आध्यात्मिकतेचें दिव्यधाम असा जो परमेश्वर तो आमचा पाठिराखा आहे. आम्ही आर्य-संस्कृतीचें रहस्य जोंपर्यंत अंतरंगांत बाणून ठेवूं तोंपर्यंत विश्वैकशरण्य असा तो परमात्मन् आपल[illegible] वचनास विसरणार नाहीं व आर्यावर्त चिरकाल आपली चैतन्यसाक्ष[illegible]गास पटवील.

१३ हिंदुस्थान हें राष्ट्र कधींहीं लयास जाणार नाहीं; कारण त्याचा आलंब जो आत्मा तोच मुळीं अविनाशी आहे. आमचें हिंदराष्ट्र चिरंजीवी आहे. आणि जोंपर्यंत आम्ही हिंदू लोक आमच्या आध्यात्मिक स्थानापासून भ्रष्ट होणार नाहीं, धर्म हाच एक राष्ट्रालंब धरूं तोंपर्यंत निर्घृण उत्क्रांति चक्राचे फेरे वाटेल तसे उलटे सुलटे फिरले तरी हिंदराष्ट्र चिरस्थायीच राहील. हिंदुस्थान भिकारी झाला, दारिद्र्यानें तरफडत राहिला, विश्वांतापर्यंत आधिभौतिक दास्यत्वांतच खिचपत राहिला तरी सुद्धां आर्यपुत्रांनों ! आपल्या ध्येयापासून च्युत होऊं नका. आलंब सोडूं नका. आणि परमेश्वरास न विसंबतां एक क्षणभरही तुम्ही ऋषिवर्यांचे वंशज अहांत याची विसर पडूं देऊं नका. आपलें आर्यत्व विसरूं नका.

३

ज्या पवित्र कार्यासाठीं प्रत्येक आर्यपुत्राचा जन्म झाला तें पवित्र कार्य कोणचें ? धर्मसंरक्षणासाठींच प्रत्येक ब्राह्मणाचा जन्म आहे ही मनूची आज्ञा तुम्हीं वाचली नाहीं का ? पण याहीपेक्षां पुढें जाऊन मी उच्च स्वरानें सांगतों, केवळ ब्राह्मणाचेंच नव्हे तर आर्य म्हणविणाऱ्या प्रत्येक जीवाचें मग—आर्यपुत्र असो वा आर्यस्त्री असो—प्रत्येक हिंदमात्राचें धर्मसंरक्षण हें पवित्र कार्य आहे; व त्या कार्यासाठींच त्याचा जन्म या पवित्र भूमींत झाला आहे.

२ सर्वांगीण सुधारणेसाठीं विश्व वाट पहात आहे. आध्यात्मिक संपत्तीची इतर जग हिंदुस्थानापासूनच अपेक्षा करीत आहे. आर्यसंस्कृतीच्या तेजस्वी प्रभावाची, आध्यात्मिक ज्ञानाची अखिल विश्व भुकेल्या भावानें वाट पहात आहे.

३ ज्या ज्ञानामृताचा सांठा ईशस्वरूप मुनिवर्यांनीं भारतांत सांठवून ठेवला आहे त्या ज्ञानामृताच्या एकेक थेंबासाठीं हात पसरून ज्ञानाच्या भुकेनें व्याकूळ होऊन, कळवळून, करुण स्वरानें ज्ञानभिक्षा मागणाऱ्या त्या लाखों जीवांचे आर्तस्वर आपणास क्वचितच ऐकूं येतात व त्यांची जाणीवही आपणास क्वचितच असते.

४ आधिभौतिक सुखामागें पळणारें विश्वाचा पश्चिमार्ध—पाश्चात्य राष्ट्रें हीं जणूं एकाद्या ज्वालामुखी पर्वतावरच हवा खात आहेत. तें शिखर आज ना उद्यां धडाडून राष्ट्रांसुद्धां त्यांचा लय करणारें आहे हें खास ! विश्वाचे कानेकोपरे धुंडूनही त्यांना शांतीचा लवलेश मिळाला नाहीं.

सुखाच्या शोधार्थ आधिभौतिक ज्ञानसागराच्या तळाशीं बुड्या मारिल्या पण तेथेंही त्यांना शांति मिळाली नाहीं. भारताच्या पवित्र कार्यास सुरवात करण्याची योग्य वेळ आतांच आली आहे. सुखाची निराशा झालेल्या पाश्चात्यांना आध्यात्मिक ज्ञानाचें महत्त्व उच्च स्वरानें सांगा. त्यांना ज्ञानदुंदुभीचा जयनाद ऐकूं जाऊं द्या कीं, भारतीय आध्यात्मिक ज्ञानाचीं बीजें त्यांच्या अंतःकरणाच्या भूमिकेंत खोल रुजलीं पाहिजेत. पाश्चात्यांना आध्यात्मसंपन्न भारताचे एकनिष्ठ सच्छिष्य बनवा. भारताचें शिष्यत्व ते एकदिलानें पत्करतील.

५ मानवी जीविताचा प्रश्न जास्त सुखकर रीतीनें सोडविणाऱ्या दिव्य ज्ञानाचा प्रकाश विश्वावर पाडण्यासाठीं, आधिभौतिक मायावी सुखांत गुरफटलेल्या अंधारांत ठेंचाळणाऱ्या जगाला आध्यात्मिक उन्नतीचा दिव्य मार्ग दाखविण्यासाठीं, त्या पवित्र कार्याच्या पूर्णतेसाठीं स्वतः सिद्ध होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ती पवित्र नीतिकर्तव्यता आर्यपुत्रांवर आली आहे.

६ राजकीय सत्तेच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेपायीं विस्कळित झालेल्या समाजसुधारणेचे नवीन मार्ग नवीन बेत आक्रमीत व अनुभवीत आज पाश्चात्य राष्ट्रें हैराण होऊन अवनतीस पोहोंचलीं आहेत व सर्वस्वीं दुर्बल होऊन संस्कारभ्रष्टतेमुळें अर्धमेलीं झालेलीं आहेत. अवनतीच्या खड्ड्यांत जाणारा झोल त्यांचा त्यांनाच सावरेनासा झाला आहे. आत्मोद्धार त्यांच्या आटोक्याबाहेर गेला आहे. अशा प्रसंगीं विश्वोद्धार करण्याचें पवित्र कार्य आर्यपुत्रांवर येऊन पडलें आहे. कारण या पवित्र धर्मभूमींत धर्माचें पवित्र तेज आणि चैतन्य अद्याप अखंड वावरत

आहेत. तो आत्मतेजौघ सर्व विश्वावर वाहवून विश्वाची विशुद्धि करावयाची आहे. आर्यपुत्रानों, ऋषिवर्यांच्या दिव्य तपश्चर्येचीं तुमच्या ठिकाणीं अंतार्हित असलेलीं तेजें आतां प्रकट करून विश्वास उजाळा देऊन आपलें कर्तव्य कर्म बजावण्याची वेळ झाली आहे.

७ आर्यपुत्रांनों ! विश्वाच्या अवनतींत नष्ट झालेलें तेज, तुम्हांला अंतार्हित ज्ञानानें भरून काढावें लागेल. त्या तेजाचा सांठा विश्वाच्या उन्नतीसाठीं तुम्हांला खर्च करावा लागेल. कारण आध्यात्मिक दिव्य ज्ञानाचें दान तुम्हांला विश्वास द्यावयाचें आहे. ही दिव्य देणगी देऊन जगताला उपकृत करावयाचें आहे.

८ हिंदवासीयांनों, अनादिकालापासून ज्या आर्य ऋषींनीं आपल्या दिव्य ज्ञानानें आर्यदेशाची ही पुण्यभूमि केली त्या ऋषींच्या वंशांत तुम्हीं जन्मलां आहांत. त्यांच्या तपस्तेजाचे तुम्हीं अंश आहांत. अजरामरत्वास पावलेले, दिव्य करून दिव्यत्वास गेलेले ते तुमचे परमपूज्य पितर तुमच्या प्रत्येक कृतीकडे लक्ष देत आहेत. म्हणून उठा, जागे व्हा आणि आपल्या परमपूज्य पितरांना वंदन करा. त्यांचा दिव्य आशीर्वाद घेऊन कार्याला लागा.

९ प्रत्येक वंशाला, प्रत्येक पिढीला, प्रत्येक राष्ट्राला विश्वाच्या आयुष्यांत कांहीं एका विशिष्टध्येयपूर्तीसाठीं विशिष्ट ईशसंदेशानुसार जन्म घ्यावा लागतो, आणि प्रत्येक पिढीनें आपल्या कृतीनें पुढील पिढीसाठीं दिव्यदीप कार्यमार्गावर लावून ठेवणें हें जिवंत स्मारक होय ! विश्वाच्या वाळवंटावर कायमचीं पावलें उठतील इतका तो मार्ग दिव्य व स्पष्ट असला पाहिजे. राजकीय सत्ता किंवा तोफांच्या जोरावर राक्षसी महत्त्वाकांक्षेची

पूर्तीही आम्हां सत्त्वशील आर्यांचीं ध्येयेंच नव्हत. तीं कधींच नव्हतीं. आणि लक्षांत असूं द्या कीं हें—राक्षसी ध्येय—आर्यावर्ताचें भविष्यकालींही ध्येय होणार नाहीं. हिंदुस्थानचें ईशोद्दिष्ट पवित्र कार्य म्हणजे एखाद्या विद्युच्छक्तीच्या सांठ्याप्रमाणें पितरांची परंपरागत दिव्यशक्ती आमच्यांत कायम ठेवून, त्या दिव्यशक्तींत आत्मोद्धाराच्या दिव्याची भर घालून, तो अध्यात्मतेजाचा उद्दीपित तेजोसंग्रह विश्वाच्या अवनतकालीं पुन्हां मेल्या जगांत चैतन्य उत्पन्न करण्यासाठीं, संस्कारभ्रष्ट जगाच्या शुद्धिसंस्करणार्थ, खर्च करणें हें होय.

१० धर्माचें पुनरुज्जीवन, हेंच आमचें पवित्र कार्य. आमच्या भगव्या झेंड्याच्या टोंकावर नाचणारें हेंच आमचें राष्ट्रध्येय. सर्व जगभर दुष्टपणा, बेबंदशाही, अन्याय, जुलूम यांचा प्रलय झाला; राजधर्म, राष्ट्रधर्म, व्यक्तिधर्म, पितृधर्म यांची पायमल्ली झाली; विश्व सत्तामदानें धुंद झालें; अनीतीचा घोर अंधःकार पसरला म्हणजे आत्मज्ञानाचा, वेदांताचा उज्वल प्रकाश पाडून, मरत्या राष्ट्रांना चैतन्य देऊन धर्माचें पुनरुज्जीवन करणें हेंच आमचें जीवितकर्तव्य ! त्याच ध्येयाचें अनुगमन विश्वाच्या आरंभापासून आमच्या पूर्वजांनीं केलें. आम्हीं केलें पाहिजे, व हेंच पवित्र ध्येय भावी हिंदुस्थान—तरुण पिढी—पुरें करील. आर्यपुत्रांनों ! आपलें पवित्र निशाण, उन्नतीचा ध्वज उंच धरा, विश्वास संजीवनी देण्याचा मान गमावूं नका. या पवित्र कार्यानेंच, या धर्मसंस्करणानेंच, या विश्वाच्या पुनरुज्जीवनानेंच तुमचा भूतकाल यशानें उज्वल झाला. वर्तमानकालींही अशीच दिव्य कृती करा कीं भारताचें भवितव्य उज्वलतम होईलच होईल. कारण आजही भारताचें तेंच एक आत्यंतिक श्रेष्ठ व दिव्य राष्ट्रीय ध्येय आहे.

११ अनादिकालापासून कालचक्राच्या नेमिक्रमाबरोबर अव्याहत फेरे खाऊन आज परदास्यत्वाच्या विपन्नावस्थेंतही अंतर्बाह्य जुलुमाची भर पडत असतां आज हिंदराष्ट्र विद्यमान आहे याचें कारण हेंच कीं, 'विश्वस्थितीसाठीं जीवन,' हें उदात्त ध्येय आजही आमच्यापुढें आहे. आर्यांच्या भावना, आर्यांच्या महत्त्वाकांक्षा, आर्यावर्तापुरत्याच आकुंचित कधींच नव्हत्या व नाहींत. विश्वाच्या विराट स्वरूपांत विलीन होऊन समष्टिसेवेचें आत्यंतिक ध्येय पूर्ण होईपर्यंत आर्यावर्ताचें जीवनकार्य पुरें होणार नाहीं.

१२ आर्य संस्कृतीवर आजपर्यंत हजारों आपत्ती कोसळल्या तरीही परकीय संस्कृतीशीं अव्याहत टकरा देत, नामोहरम न होतां, हजारों वर्षेपर्यंत आपल्या संस्कृतीच्या दिव्यत्वावर होणारे आघात सहन करूनही आर्यसंस्कृति निःशेष लयास कां गेली नाहीं ? जर इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षां आमच्या चालीरीती रानटी होत्या, आमचें राष्ट्र अडाणी होतें तर या अडाणी संस्कृतीचा लोप कसा झाला नाहीं ? जीवितकलहांत अडाणी संस्कृतीचे अनुयायी हिंदूलोक इतर अनार्यसंस्कृतीच्या अनुयायांप्रमाणें नाश न पावतां अद्यापिही राष्ट्रस्वरूपांत कसे जिवंत राहूं शकले ?

१३ कालचक्राच्या तडाख्यांत जवळजवळ विश्वाचें पुनरुज्जीवन होण्याइतकी प्रचंड क्रांति झाली तरी हिंदराष्ट्र मात्र जिवंत कां राहिलें? हें हिंदराष्ट्राच्या जीवनाचें इंगित जाणणाऱ्या जिज्ञासूंनों, ऐका कीं, हिंदराष्ट्राजवळ जो दिव्यशक्तीचा अविनाशी संग्रह आहे त्याशिवाय विश्वाची 'स्थिति' च होणार नाहीं म्हणून—विश्वाला जिवंत ठेवण्यासाठीं—हिंदराष्ट्र जीवंत आहे; आर्यावर्तातील ज्ञानशक्ति हें जगाचें जीवनतत्त्व आहे;

विश्वोन्नतीला पुरेसा असा दिव्यज्ञानसंग्रह अद्यापही आर्यावर्तांत आहे म्हणून आर्यराष्ट्र जिवंत आहे हें ध्यानांत ठेवा. आर्यावर्त विश्वाला जीवन पुरवींत आहे म्हणून आर्यावर्त जिवंत राहणें आवश्यक आहे.

४

आमच्या जन्मभूमीचें दिव्य भवितव्य.

ही दीर्घकालरात्र संपत आली आहे. सुप्तावस्था सोडून निद्रावश आर्यावर्त हालचाल करूं लागला आहे. आणि ईश्वरी दिव्य संदेश ऐकूं येऊं लागला आहे. हिमालयांतील चैतन्यदायक वायूच्या लहरीप्रमाणें त्या दिव्य संदेशाच्या नादलहरींनीं मृतवत् निर्जीव देहांत जीवन प्राप्त होत आहे. राष्ट्राची महानिद्रा संपत आली आहे. ज्याला अंतर्दृष्टि नसेल किंवा जो सत्तामदानें धुंद झाला असेल त्याला दिसत कदाचित् नसेल कीं ही आपली मातृभूमि जागृत होत आहे. कारण अंतर्ज्ञानानेंच या भारताच्या दिव्य भवितव्याचें दर्शन होणें शक्य आहे.

२ आतां कोणत्याही आणि केवढ्याही प्रचंड शक्तीनें आर्यावर्त नामोहरम होणार नाहीं. प्रगमनशील अशा या सुप्तप्रतिबोधित हिंदराष्ट्रास या जागृतावस्थेंत आतां मागें खेंचण्याची किंवा प्रगतीस अडथळा करण्याची कोणत्याही राष्ट्राची हिंमत नाहीं. कारण अप्रतिहत आणि अविनाशी चैतन्यशक्ति आत्मतेज हिंदुस्थानास प्रेरणा करीत आहे.

३ मधुरफलभारानें भारावलेला एखादा प्रचंड वृक्ष कांहीं कालपर्यंतच फुलत उभा असतो. तीं फळें जमिनीवर पडून पंचत्वाप्रत विलीन होतात. कांहीं कालानंतर तो प्रचंड तरूही पडतो. परंतु जमिनीवर

पडलेल्या इतस्ततः पसरलेल्या फळांतूनच त्या वृक्षबीजांना हजारों अंकुर फुटतात. एका वृक्षांतून शेंकडों प्रचंड वृक्ष पुन्हां उठतात. हे नवे प्रचंड वृक्ष पूर्वीच्या बीजवृक्षांपेक्षां अधिक जोमदार होतात. जणूं काय तो आदिवृक्ष या नव्या वृक्षांच्या उन्नतीसाठींच व्यक्तित्वाचा लय करतो. यावरून त्या आदिवृक्षाचें मरण नव्या हजारों वृक्षांच्या जननासाठींच आवश्यक असतें. वास्तविक तो वृक्ष नाश पावतो ही भाषाच खोटी ! तो वृक्ष नाश पावत नसून आपल्या देहातीत चैतन्याचा पंचतत्त्वाशीं लय करून पुन्हां दुप्पट जोरानें उगवण्यासाठीं अंतर्धान पावतो. मध्यंतरींची सुषुप्तावस्था आवश्यकच असते. हीच स्थिति, हाच नियम उगवत्या हिंदराष्ट्रासही लागू आहे. हिंदराष्ट्राची दीर्घ सुषुप्तावस्था संपत आली आहे. भूतकालीन मृत शरीरांतून चैतन्याची रोपटीं उगवत आहेत. मृत्पिंडांतून अंकूर फोंफावत आहेत. भूतकालाच्या गडद अंधारांतून, वर्तमानकालच्या घोर मध्यरात्रींतून येत्या दिव्य सूर्याची प्रभा डोकें वर काढूं लागली आहे. सर्व रात्रीपेक्षां प्रभातकालीं अत्यंत दाट काळोख पडतो आणि तोच येत्या सूर्यप्रभेचा सूचक असतो. तसा हा निद्रारूपी अंधःकार आतां पूर्णावस्थेप्रत जाऊन येत्या ज्ञानसूर्याचा अरुणोदय क्षितिजावर डोकावत आहे. या अज्ञानाच्या खतांतून ज्ञानवल्ली उगवून तीं फोंफावत आहे व तिचा अत्यंत जोमदार वृक्ष या दिव्यभूमीवर वाढूं लागला आहे.

४ चमत्कृतिनिधान, ऐश्वर्यसंपन्न असा भारतवर्ष आतां या दिव्य भविष्यांतून जगावर उदय पावत आहे. प्राचीन ऋषिवर्यांपेक्षांही अत्यंत तपस्वी, तेजःपुंज ऋषी आपल्या तपोबलानें विश्वास उजळण्यासाठीं

आर्यावर्तांत अवतार घेणार आहेत. दिव्यलोकाप्रत गेलेले तुमचे वंशज प्रभावल्यानें शतपट देदीप्यमान होत्सात्या वंशजांस पाहून परलोकांतून त्याच्या परमोच्च पदावरून ते अत्यंत अभिमानानें पुष्पवृष्टि करतील. तुमच्या वैभवाकडे पराक्रमानें सकौतुक प्रसन्न चित्तानें पहात आनंदाश्रूंचा वर्षाव करतील, व शुभाशिर्वादाचा जयनिनाद करून आपलें दिव्यतेज तुमच्यावरून ओंवाळून टाकतील.

५ आर्यपुत्रांनों उठा, जागे व्हा ! शाश्वत व दिव्यतम सिंहासनावर विराजमान होणाऱ्या आपल्या प्रतापशालिनी मातृभूमीस वंदन करा.

६ **उत्तिष्ठत जागृत प्राप्यवरान्निबोधत ।** विश्वास ठेवा कीं, अशी आकाशवाणी झाली आहे, असा ईश्वरी संदेश आला आहे कीं भारताचा अभ्युदय झालाच पाहिजे.

७ रात्र संपली. सूर्योदयानें सर्व आर्यावर्त प्रकाशित झाला आहे. या उसळत्या लाटेचा जोर अप्रतिहत आणि अव्याहत वाढत जाऊन, ती अज्ञानानें मलिन झालेल्या विश्वाचें प्रक्षालन करून सर्व विश्वास दिव्य ज्ञानतेजाचा उजाळा देईल.

प्रकरण २ रें.

१

राष्ट्रसेवक

हिंदस्वराज्यासाठीं अहर्निश झटणाऱ्या राष्ट्रसेवकांच्या मार्गांत दोन मोठ्या अडचणी आहेत. आमचें शारीरिक दौर्बल्य ही एक व आमचा द्वेषभाव-परोत्कर्षामुळें भडकणारा मत्सर ही दुसरी.

शारीरिक दौर्बल्य

२ हिंदुस्थानच्या पाठीशीं उपनिषदांसारख्या दिव्य ग्रंथाचें ज्ञानतेज असलें, त्यांची वंशपरंपरा उच्च असली, इतर कोणत्याही ज्ञातीपेक्षां नैसर्गिक संस्कार जास्त उज्वल व सात्विक असले तरीही शारीरिक दौर्बल्य मात्र आपणास नाकबूल करतां यावयाचें नाहीं. इच्छाशक्तीला सुद्धां शरीर असल्याशिवाय ती शक्ति अगदीं कवडीमोलच ठरेल. आपल्यावर ओढवलेल्या आपत्तींपैकीं निदान एकतृतीयांश तरी आपत्ती खास आपल्या शरीरदौर्बल्यामुळेंच ओढवल्या आहेत ना ? भावी हिंदस्वराज्याची भव्य इमारत ज्यावर उभारली जाणार ती तरुण पिढी जोमदार असली पाहिजे. आधीं शरीरशुद्धि मिळवा. मग धार्मिक संस्कारांतर्गत आत्मिकतेज आपोआप प्राप्त होईल. म्हणून तरुणांनो, आद्य धर्मसाधन—पुरुषार्थाचें मूळ—जें शरीरबल तें प्रथम कमवा.

माझा तुम्हांला हाच उपदेश आहे. फार काय पण गीतावाचनापेक्षां फुटबॉलनेंच तुम्हांस स्वर्ग जवळ होईल. भगवद्गीतेचीं मुखोद्गत पारायणें केल्यापेक्षां संपन्न शरीरद्वारेंच तुम्हांला तो भगवत्संदेश चांगला पटेल. तुमच्या रक्तांत जर चैतन्यवृद्धि होत असेल तरच भगवान् श्रीकृष्णाची चैतन्यवाणी तुम्हांस कळेल आणि कर्मयोगाचें रहस्य जातिवंत हृदयाला-जागृत आत्म्यालाच कळेल. गीतेंतील दिव्य ज्ञानसामर्थ्य तुम्ही स्वतः सामर्थ्यवान् झाल्याशिवाय आकलन करतां येणार नाहीं. स्वावलंबी व्हाल, आपल्या पायावर उभे राहूं शकाल, मनुष्यत्वाची जाणीव तुम्हाला खरोखर होऊं लागेल. तेव्हांच तुम्हांला उपनिषदांचें अध्ययन आणि आकलन करतां येईल, व आत्मिकबल प्राप्त होईल. कारण **नायमात्मा बलहीनेन लभ्यः ।**

३ तुमच्या अंगांत तारुण्याचें रक्त सळसळत असेल, शिराशिरांत नवचैतन्य वहात असेल, स्नायूपटलें लोखंडासारखीं बळकट असतील, पोलादाची चिकाटी तुमच्या अंगीं येईल तरच तुम्ही स्वराज्याचे आधारस्तंभ व्हाल. निस्तेज देहांत क्षुद्रच विचार वास करतात. पाप्यांच्या पितरांच्या महत्त्वाकांक्षा—इच्छाशक्ती कधींही प्रबळ आणि उच्च नसतात. सरड्याची धांव कुंपणापर्यंतच !

आज्ञापालन.

४ आज भरतखंडाच्या कोनाकोपऱ्यांतून जर कशाची ओरड ऐकूं येत असेल तर ती परदास्याचीच आहे. गुलामगिरीविरुद्ध प्रचंड ओरड चालली आहे. प्रत्येकास अधिकारसत्तेची उत्कट इच्छा आहे. परंतु सेवाधर्माचा मात्र तिटकारा केला जात आहे. [विश्वाचा सम्राट होण्याची,

अधिकारसूत्रें हातांत घेण्याची, प्रत्येकाची धडपड आहे. परंतु अधिकारप्राप्ती हें सेवाधर्माचें परिणत फल आहे हें कोणीच लक्ष्यांत घेत नाहीं. यामुळें समाजांत विस्कळीतपणा वाढत चालला आहे.] आणि याचें मुख्य कारण आर्यकालीन ब्रह्मचर्यपद्धतीचा ऱ्हास हेंच होय.

५ आर्यपुत्रांनो, प्रथम सेवाधर्माचें एकनिष्ठ आचरण करा. आणि अधिकार हा आपोआप प्राप्त होईल. प्रथम सेवक होण्यास शिका. स्वयंसेवक व्हा देशसेवक व्हा कीं उद्यां देशाचे मालक होण्यास तुम्ही योग्य व्हाल.

६ ज्यांच्या अधिष्ठानाखालीं तुम्ही कार्य कराल, ज्या पुढाऱ्यांचे तुम्ही सेवक असाल त्यांनीं तुम्हांला एकाद्या नदींत उडी टाकून सुसरीला हात घालण्याची जरी आज्ञा केली, तरी एका क्षणाचाही विलंब न करतां प्रथम आज्ञापालन करण्यासाठीं उदार व्हा, आणि मग तुमच्या वरिष्ठाशीं तक्रार करा. जिवाच्या हिताहिताचा विचारही मनांत न आणतां, आज्ञेच्या योग्यायोग्यतेविषयीं शंकाही न घेतां एकदम ती पाळण्यास तयार व्हा. आणि मग त्याविषयीं विचार करा. आज्ञा होतांच 'जगेन किंवा मरेन पण कर्तव्य आज्ञापालनच,' असा जिवाचा निर्धार एका क्षणांत होणें हाच सेवाधर्माचा उत्कर्ष होय !

उदारभाव.

७ द्वेषाचीं पाळेंमुळें उपटून टाका. परोत्कर्षाविषयीं असहिष्णुता वाढूं न देतां समत्वाचा भाव ठेवण्यास शिका. परमोच्च महत्त्वाकांक्षेच्या आड येणाऱ्या या अमंगळ भावनांचें रान जाळून टाकून अन्तःकरण विशाल आणि पवित्र केल्याशिवाय तुमच्या आकांक्षा सफळ व्हावयाच्या नाहींत.

तुमच्या इच्छाशक्तीचा होम करणारा धगधगणारा द्वेषाग्नि तुम्ही शांत केला नाहीं तर तुमचे सर्व प्रयत्न फोल ठरतील. तोंपर्यंत तुमची शक्ति मृत्पिंडासमान निष्क्रिय व भस्मचयासमान चैतन्यहीन होईल. म्हणून प्रथम ही आग शांत करा. त्याशिवाय अद्याप करावयाचीं अशीं महत्तम आद्य कर्तव्यें तुमच्या हातून पूर्ण होणार नाहींत.

८ द्वेषाचा उमाळा असणें हें हृदयाचें आत्यंतिक दौर्बल्य होय. ही राष्ट्राची अवनती आणि अपकर्षाची परमावधीच होय. म्हणून हा उमाळा प्रथम टाळा. द्वेषाचीं अज्ञानपटलें प्रत्येक क्षणीं तुमचा कोंडमारा करतील म्हणून प्रथम तीं नाहींशीं करा.

९ आपल्यांतलाच एखादा आर्यपुत्र उन्नतीप्रत जात असला तर तुम्ही त्याला खालीं ओढण्यांत आपली शक्ति खर्च करतां. तुमच्या प्रत्यक्ष देशबांधवांविषयीं तुमचा इतका परमावधीचा द्वेष ! देशांतील पुढाऱ्यांच्या आज्ञा तुम्हांला अपमानास्पद वाटतात म्हणून त्यांच्यावर किटाळें आणून त्यांला खालीं पाडण्यासाठीं तुम्ही अतुल स्वार्थत्याग करण्यांत स्वतःस धन्य मानतां. पण परक्यांच्या परकी न्यायापुढें माना तुकवून परदास्याचें एकनिष्ठ व्रत आचरण्यांत शारीरिक, मानसिक व सांपत्तिक शक्तीचाही होम करण्यास न कचरतां त्यांनीं लाथाडलें तरीही आपल्या स्वाभिमानीवृत्तीस त्यांत कमीपणा न वाटतां सेवेचा गौरवच वाटतो. (पण अशा रीतीनें तुम्ही स्वतःबरोबर देशाचा घात करून, आर्यकुलाला कलंक होऊन अगणित पातकांचा संचय करीत आहांत. तुमच्या पूर्वजांच्या पावित्र्यास हरताळ फांसून त्यांच्या आत्म्यास तळमळ लावीत आहांत हें लक्षांत आणा.)

१० देश हाच तुमचा देव आणि तुमच्या देशबांधवांची आराधना हीच तुमची देवपूजा. वैयक्तिक द्वेषानें इरेला पडून देशबांधवांचा घात करण्याची अनुदार वृत्ति टाकून देऊन एक दिलानें अनन्य भावानें या आर्यजननीची आराधना करणें हीच तुमची इतिकर्तव्यता. या जगज्जननीच्या ठिकाणीं सारख्या भावानें, उत्कट श्रद्धेनें लीन होण्यांतच तुमच्या आर्यत्वाचें सार्थक आहे.

आत्मविश्वास

११ श्रद्धा आपल्या हृन्मंदिरांतून केव्हांच निघून गेली आणि ज्या क्षणांत तुम्ही आत्मविश्वासाला पारखे झालांत, श्रद्धेला अंचवलांत, श्रद्धेच्या अभावीं तुमच्या अंतःकरणांत चैतन्य नाहींसें झालें, त्याच क्षणापासून तुमच्या दास्यत्वास आरंभ झाला. जर माझ्यावर तुमचा विश्वास असेल तर मी खात्रीनें सांगतों कीं आंग्लदेशांतील युवकांत आणि युवतींत, प्रत्येक आंग्लहृदयांत, सर्व आर्यपुत्रापेक्षां हजार पटीनें बलवान् अशी आत्मश्रद्धा वसत आहे. आत्मत्वाला मुकलांत, श्रद्धेला फांटा दिलांत म्हणून तुमच्या हातांतील अधिकारसूत्रें तुमच्या गळ्याभोंवतीं फांसाऐवजीं आवळून घेतलींत. आपल्या हातांनीं स्वातंत्र्य गमावून बसलांत. राजवाड्याच्या तटाला हातानें सरबत्ती लावून स्वतःचा चुराडा करून घेतलांत, आपल्या पायानें राजसिंहासनाला लाथ मारून परक्या पाहुण्यास हातानें त्यावर बसविलेंत, धन्याचे दास होऊन दासाला धनी केलेत.

१२ आज तेहतीस कोटी हिंदूंवर एक हजार वर्षांपासून वाटेल त्या देशाचे मूठभर लोक बेगुमानपणानें अधिकार चालवताहेत याचें कारण काय

याचा विचार करा. पाय ठेवतील त्या जागेवर आपल्या मालकीचा हक्क सांगून ते धन्याला नागवून अधिकार चालवीत आहेत. इतकेंच काय पण तुमच्या उरावर पाय देऊन सांष्टांग प्रणिपाताला लाथाडून तुमच्या मालकीला–तुमच्या जन्मसिद्ध हक्काला कवडीमोल मानून स्वैरसंचार करीत आहेत याचा तुम्ही कधीं विचार केलांत काय ?

याची कारणमीमांसा शोधण्यांत तुम्हांला कधीं महत्त्व वाटेल तर तुम्हांला एकच कारण आढळेल कीं, आत्मश्रद्धेच्या जोरावर ते तुमच्या श्रद्धेच्या अभावीं निर्जीव अशा देशावर दंडुक्यानें राज्य करीत आहेत. त्यांच्या आत्मश्रद्धेच्या दांडगाईपुढें तुमचे श्रद्धाविहीन प्रयत्न फोल ठरतात. अंतःकरणांत उत्कट श्रद्धा बाळगा, आत्मश्रद्धेची दांडगाई रोमारोमांतून उसळूं द्या आणि मग देशोद्धारार्थ प्रयत्न करा. भावी स्वराज्यमंदिराचा पाया पोलादी निश्चयानें भरून काढा. तेहतीस कोट जीवांनीं एकदिलानें अनन्य श्रद्धेनें आळवल्यावर भारताच्या सहाय्यार्थ तो भगवंत अणूरेणूंत आपल्या कर्तुमर्तुं शक्तीची प्रेरणा करील. विश्वास ठेवून प्रयत्न करा. भगवद्गीतेवर श्रद्धा ठेवा.

१३ चैतन्य हेंच जीवन, श्रद्धा हेंच जीवित आणि तिचा अभाव हाच मृत्यु ! आपण आत्मज्योतीची प्रभावळ आहांत. तुमच्या अंतःकरणांत अविनाशी शुद्धत्तम अशी आत्मज्योत तेवत आहे. त्या दिव्य प्रकाशांत आत्मश्रद्धेच्या पवित्र वातावरणांत पातकाला वाव तरी मिळेल का ? असत्याचरणाची विचार–छाया तरी पडेल का ? छे ! त्रिवार अशक्य ! इतकी दिव्यतम श्रद्धा आज पाहिजे आहे. श्रद्धेचा सूर्य तुमच्या हृदयांत उगवला पाहिजे. मग तो श्रद्धारूपी चैतन्यस्वरूपी—

दिनमणी येतां उदयाला । तिमिर पळे पाताळाला ।
इतकी उज्वल श्रद्धा नराला नारायण करते. त्या नारायणमंदिराचीच वाट बुजवून स्वराज्यमंदिराच्या मार्गावरला हा श्रद्धामय दिवा मालवला गेला म्हणूनच आर्यपुत्रांनो ! आपण अंधःकारांत ठेंचाळत ठार होत आहांत.

'कर्तृत्वशक्ति'

१४ आपण उच्च महत्त्वाकांक्षेच्या विचारांतच भ्रमण करीत आहांत पण आर्यभूमीवर अद्याप पायही टेकला नाहींत. पोपटपंचीप्रमाणें विचारसरणी हाच आपला स्वभाव होऊं पहात आहे. परक्यांच्या बढाईप्रमाणें बढाया मारण्यांत आपण गुंग आहांत. पण कार्य करण्याचें पूर्ण विसरलांत. साम्राज्याधिकारी आपल्या सामर्थ्याच्या जोरावर प्रौढी मिरवतात, उच्च महत्त्वाकांक्षा बाळगतात पण तुम्ही त्यांच्याबरोबर येण्यासाठीं वाऱ्यावर मनोरे रचण्यांतच शक्तिसर्वस्व खर्च करून त्यांची बरोबरी करण्याचा आत्मघातकी खुळेपणा करीत आहांत. भावनाप्रधान अंतःकरणांत कार्य करण्याची कुवत नसते. मनोरथाच्या वेगाबरोबरच कार्यभूमीचें आक्रमण केलें पाहिजे. म्हणून विचारसामर्थ्याबरोबर कर्तृत्वशक्तीही संपादिली पाहिजे.

१९ प्रत्यक्ष कृतीपेक्षां महत्त्वाकांक्षेनेंच तुम्ही हैराण होत आहांत. कृतीपेक्षां बोलण्यांतच आयुष्याचा व्यय होत आहे. तुमच्या ज्ञानशक्तीची अनावश्यक वाढ कर्तृत्वशक्तीच्या आड येत आहे. याचें कारण येवढेंच कीं, परिस्थितीच्या वाऱ्याबरोबर हेलकावे खाणारें दुर्बल अंतःकरण आणि पाण्याप्रमाणें वाहवणारें रक्त हेंच होय. नेटानें चढाव चढण्या-

ऐवजीं उताराबरोबर वाहत खड्डयांत गाडलें जाणें अशीच तुमच्या शक्तीच्या ओघाची दिशा झाली आहे. शरीर, विचाराबरोबर हुरळून जाण्याइतकें–मनोरथाबरोबर वाहण्याइतकें निःशक्त झालें आहे. पण **शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्** । म्हणून देशभक्तीचा धर्म पूर्णतेस नेण्यासाठीं कर्तृत्वशक्तीची जोपासना व वाढ करा. शारीरिक शक्तीचा ओघ बदलला पाहिजे. मानसिक शक्तीच्या प्रगतीबरोबर शारीरिक प्रगती झाली पाहिजे. ज्ञानाची व शरिराची फारकत होऊं देऊं नका. दिवा व ज्योत वेगळी करण्यांत प्रकाशाला मुकाल. तेलांत ज्योत बुडाल्याशिवाय प्रकाश कसा मिळणार ? नुसत्या तेलांत किंवा स्नेहरहित कोरड्या वातींत प्रकाशशक्ती नाहीं तर त्यांच्या एकीकरणांत आहे.

१६ देशभक्ती हा गप्पांचा विषय झाला आहे. देशभक्तीच्या बाष्कळ कार्यहीन बडबडीनें वातावरण दुमदुमून गेलें आहे. स्वतःच्या योग्यते-विषयींच्या फाजील कल्पनेनें आपणास मोठें समजणें हा शुद्ध मूर्खपणा नाहीं काय ?

मनोदौर्बल्य

१७ जीवितांतील नैराश्यभावना आयुष्याला वैतागल्यासारखी निवृत्ति हा राष्ट्रीय शक्तीचा क्षय आहे. " आमच्या हातून काय होणार आहे ? " असें रडगाणें गात बसून आयुष्याची माती करणें हा पुरुषार्थ नव्हे. कर्मफलाविषयीं श्रद्धेचा अभाव हा राष्ट्ररूपी पुरुषाला क्षयरोगासारखा मरणकाळच्या जवळ नेत असतो. भेसूर कल्पनांनीं माघार न घेतां मर्दासारखे, वीरासारखे, विश्वाला आव्हान करीत श्रद्धेनें पुढें याल तरच जगांत दोन दिवस तरी जीवंत जगल्यासारखे माणुसकीनें जगतां येईल.

म्हणून हा भित्रेपणा आपण एकदम सोडला पाहिजे. जन्मसिद्ध हक्काबद्दल भीक कसली मागतां ? अंगांत धमक असेल तर हक्क हक्कानें मिळवा. श्रद्धापूर्ण अंतःकरणानें, विजयाची खात्री बाळगून सत्यसंकल्पाच्या दात्याला त्या कृपावंत भगवंताला साक्ष ठेवून रणांगणांत उतरा. 'हरहर महादेव,' गर्जना करा कीं, विजयश्री माळ घेऊन धांवत पाठीस लागेल. पण श्रद्धा पाहिजे. धमक पाहिजे. तुम्ही नरकेसरी आहांत हें विसरूं नका. [केसरी जर कोल्ह्यासारखा लपत छपत वनांत भटकूं लागला तर दोन दिवसाचें लांडग्याचें पोर त्याची लांडगेतोड करील. पण त्या वनराजाला आत्मसामर्थ्याची पूर्ण जाणीव असते. अतुल शक्तिमान् अशा गजपुंगवालासुद्धां नेत्रकटाक्षाबरोबर ' दे माय धरणी ठाय ' करावयास लावण्याचें सामर्थ्य आपल्या पराक्रमाविषयीं पूर्ण निष्ठा असल्याशिवाय कोठून येणार ?]

विश्वबंधुत्व.

१८ आज आर्यधर्माचा क्षणोक्षणीं कुठें लोप होत असेल तर तो स्पृश्यास्पृश्यत्वाच्या भावनेंतच होय. आपण कोणत्याही एका ग्रंथाचे कट्टे अनुयायी नाहीं. धड ना वेदांती, धड ना पुराणाभिमानी, धड ना तांत्रिकही ! आपण जगाचा विटाळ होण्याच्या भीतीनें स्वतःला मात्र अस्पृश्य ठरविणारे आहांत. सैंपाकघर हेंच तुमच्या धर्माचें विशाल साम्राज्य, अन्नाचें ताट हाच देव आणि ' मला शिवूं नको ' हें तुमचें आद्य धर्मतत्त्व ? ' मी सोंवळ्यांत आहें, ' ही तुमच्या धर्माचरणाची परमोच्च कल्पना. यापेक्षां आणखी धार्मिक ऱ्हास तो कोणचा ? आणखी एक शतकपर्यंत याच सोंवळ्यांत तुम्ही जगापासून अस्पृष्ट राहिलांत तर आर्यावर्त म्हणजे एक वेड्याचें इस्पितळ होईल.

१९ इतरांना अस्पृश्य मानून, प्रत्यक्ष देशबांधवांना अस्पृश्य म्हणून दूर लोटून जगांत एक दिवसभरही जिवंतपणानें जगतां येणार नाहीं.

आर्यबंधूंनो ! लक्ष्यांत ठेवा कीं, जोंपर्यंत अस्पृश्य या भावनेचें उच्चाटन झालें नाहीं तोंपर्यंत कोणत्याही चळवळी शतकेंच्या शतकें चालल्या तरीही यशाचें ओझरतें दर्शन सुद्धां होणार नाहीं. उलट हें अस्पृश्यत्त्वाचें भूत तुम्हांला अस्पृश्य बनवून जगांतून लोटून देईल. ज्या दिवशीं 'म्लेंच्छ' या शब्दोच्चारानें ही पवित्र आर्यभूमि अपवित्र झाली, अस्पृश्यत्वाच्या भावनेचें भूत सर्व आर्यावर्तभर नंगा नाच करूं लागलें, विश्वबंधुत्वाला लाथेनें तुडवून स्वतः सोवळ्यांत राहण्यासाठीं विश्वाला दूर लोटण्याची कुबुद्धि आठवली त्याच दिवशीं आर्यावर्ताच्या इतिहासाची इतिश्री झाली. आणि भरतभूमीच्या ललाटरेषा परदास्यांत फिरवल्या गेल्या. [बाग फोंफावत नाहीं म्हणून खतच फेंकून देण्याइतका दुसरा आत्मघातकीपणा कोणचा ? पिकाची नासाडी करणाऱ्या भुरट्या चोराकडे दुर्लक्ष्य करून कुंपणच पीक खातें म्हणून कुंपण काढून टाकून आत्मत्वाची होळी करण्यासारखाच हा मूर्खपणा नाहीं काय ? म्हणून डोकें वाटेल तेवढें उंच करा परंतु पाय एकाच पवित्र भूमिकेवर राहूं द्या.]

२० अंधानुकरण किंवा नक्कल ही सुधारणा नव्हे. ही प्रगतीची दिशाच नव्हे. मी जरी एखाद्या राजाप्रमाणें पोषाख केला तर नुसते राजविलास मला राजपदास पोहोंचविणार नाहींत. सिंहाच्या कातड्याखालीं स्वतःचें गर्दभत्व झांकून गर्दभास कधीं सिंहत्व प्राप्त होईल काय ? पण उलट असल्या नकलेची आवड ही भयप्रद अवनती सुचवीत आहे. परकीय वस्तूंच्या मोहजालांत अडकला जाऊन स्वदेशी वस्तुजात तुच्छ वाटूं लागतात व

तो अशा रीतीनें जेव्हां देशद्रोही व आत्मद्रोही बनतो तेव्हां नक्की लक्ष्यांत ठेवा कीं त्याच्या संपूर्ण अध:पाताचा क्षण जवळ येऊन ठेपला आहे. ज्या वेळीं स्वत:च्या पूर्वजांविषयींच्या संस्काराचा अर्थ न कळवून घेतां त्याविषयीं तिरस्कार वाटून, आर्यत्वाची लाज वाटून तुम्हीं त्यांना धिक्कारून परकीयांचे पाय धरतां त्याच वेळीं हें लक्ष्यांत ठेवा कीं तुमचें प्रत्येक पाऊल मृत्यूच्या भयंकर दरीकडे तुम्हांला नेत आहे. आध्यात्मिक मृत्यूच तुम्ही कवटाळीत आहांत हें ध्यानांत असूं द्या. तुमच्या आर्यत्वाविषयीं तिटकारा मानूं नका. एक क्षणभरही असा विचार मनांत आणूं नका कीं या आर्यधर्माला झुगारून सर्व आर्यावर्त परकीय संस्कृतीप्रमाणें आचारविचार करून परधर्मीय झाला तर आर्यावर्ताचें कल्याण होईल. श्रीकृष्णभगवानाची दिव्यवाणी तुम्हांस काय सांगते—

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।

ही भगवंताची दिव्यवाणी हृदयांत जागृत ठेवा.

संघ निर्माण करण्याची शक्ति.

२१ आपण आळशी आहोंत. कार्य करण्यास दुर्बल आहोंत आपणांमध्यें एकीकरण करण्याची कुवत नाहीं. विश्वबंधुत्वाचें उत्कट प्रेम आपणास एकमेकांविषयीं वाटत नाहीं. स्वार्थपरायणतेची परमावधी करण्यास आपण कचरत नाहीं. आपणांतील तिघे जण सुद्धां परस्पराविषयीं द्वेषरहित शुद्धतम प्रेम बाळगूं शकत नाहींत. एकीच्या अभावीं समाज विस्कळित होऊन देशाचे तुकडे उडाले आहेत. आणि बंधुप्रेमाचा लोप झाला आहे. आपण प्रेमाला पारखे होत आहोंत आणि सुखाला आंचवत आहों.

२२ संघ निर्माण करण्याची शक्ति तुम्हांमध्यें स्वभावतःच नाहीं. पण ती उत्पन्न केली पाहिजे. मुख्य गोष्ट ही आहे कीं, तुमच्या अंतः-करणांत असूयेस बिलकुल स्थान मिळतां कामा नये. समेट करण्यास—दुसऱ्याचें मत स्वीकारण्यास नेहमीं तयार असलें पाहिजे.

२३ आमच्यामध्यें संघटितपणा तर बिलकुल नाहीं. स्वार्थपरायणता आमच्या रोमारोमांत भरली आहे. कपाळावर गंध आडवें लावायचें कीं उभें याविषयीं आम्हांमध्यें शेंकडों वर्षें रणें माजून राहिलीं आहेत! एखाद्या माणसाच्या दृष्टीनें आपलें अन्न दूषित होतें कीं न होतें असल्या क्षुल्लक विषयांवर आमच्यामध्यें मोठमोठे ग्रंथ लिहिले गेले आहेत!!

२४ भावी भारताला अतुल सामर्थ्यवान् करण्याची गुरुकिल्ली म्हणजे शारीरिक, मानसिक व सांपत्तिक शक्तींची संहति करून इच्छाशक्तीचा संघटित स्वरूपानें उत्कर्ष करणें हींच होय. व्यक्तीचें व्यक्तित्व समष्टीच्या जनताजनार्दनाच्या ठायीं लय पावणें हीच समाजाची मूलभूत कल्पना आणि गुह्यतम तत्त्व आहे. सर्वांच्या इच्छाशक्तींचा एकसमयावच्छेद हाच राष्ट्रो-न्नतीचा राजमार्ग आहे. सर्व समाजाच्या आकांक्षा, इच्छा व धर्मव्यवहार एकाच राष्ट्रीय भावनेंत केंद्रीभूत झाल्या पाहिजेत. प्रत्यक्ष डोळ्यासमोरचीं उदाहरणें पहा. प्रत्येक चिनी मनुष्य वैयक्तिक दृष्टीनें समाजाकडे किंवा राष्ट्राकडे पहातो. स्वतःपुरतींच त्याला राष्ट्राची ओळख असते आणि मूठभर जपानी लोक संघटित स्वरूपानें राष्ट्रीय भावनेंत नेहमीं वावरतात व राष्ट्राच्या विशाल स्वरूपांत व्यक्तीस एकरूप करून टाकतात. व्यक्तीचें ध्येय सर्व राष्ट्रास व्यापून टाकण्याइतकें विशाल ठेवतात. दोघांची दृष्टी तीच पण त्यांत सुद्धां केवढा फरक! दोघेही स्वार्थींच. पण एकाला

वैय्यक्तिक स्वार्थ हाच राष्ट्रार्थ वाटतो. व्यक्तीच्या स्वार्थापलीकडे तो राष्ट्रार्थाला ओळखीत नाहीं. तर दुसरा राष्ट्रार्थ हाच वैय्यक्तिक स्वार्थ मानून राष्ट्रार्थापलीकडे राष्ट्राच्या अभ्युदयापेक्षां वैय्यक्तिक स्वार्थाला फारशी किंमत देत नाहीं. दोन विचारसरणीचीं परिणामफलें इतिहास तुम्हाला सद्य:स्थितींतच दाखवीत आहे.

स्वावलंबन.

२५ सर्व हिंदराष्ट्राचा स्वभाव व विचारसरणी हीं एखाद्या अज्ञ अर्भकाइतकी परावलंबी झाली आहे. तान्ह्या मुलाचें अन्न तोंडाशीं नेलें तरच तें त्याचें ग्रहण करूं शकतें. पण याहीपलीकडे एखाद्या अशक्त बालकाला ओठावरचें अन्नही गिळवत नाहीं; ओंठावरचा घांस पोटांत कोणी ढकलला तर ठीक. नाहीं तर तें उपाशींच मरायचें. तसेंच हिंदराष्ट्राचें जीवन आज परावलंबी आहे. पण तुम्हांला जर स्वावलंबनानें उपजीविका करतां येणार नाहीं तर तुम्ही जगण्याइतके सुद्धां योग्य नाहीं. (कारण परोत्कर्षावर जगणें हें मृत्पिंडासमान भूभार वाढवणेंच नाहीं काय ?)

२६ आपण नेहमीं एक तत्त्व ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं प्रत्येक राष्ट्रानें त्याचप्रमाणें प्रत्येक जीवानें स्वसंरक्षणास समर्थ असलें पाहिजे. म्हणून तुमच्या उद्धारार्थ दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करूं नका. '**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्**' हें भगवद्वचन नीट ध्यानीं आणा.

२७ तुमचें राष्ट्र जीवंत राहण्यासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहून कसें चालेल ? परराष्ट्राच्या तोंडाकडे बघण्याची अपेक्षा धरूं नका.

आर्यावर्ताचा उद्धार जपानच्या मशिनरीनें किंवा जर्मनीच्या लढाऊ जहाजांनीं कदापि होणार नाहीं. तो आर्यावर्तानेंच आध्यात्मशक्तीच्या बलावर स्वावलंबनानेंच केला पाहिजे. पित्यानें आत्मोद्धारासाठीं पुत्रपौत्रांच्या प्रपौत्रांकडे पाहणें हा ' **पितृमूलक** ' धर्माचा विध्वंस आणि अनादर आहे. आर्यावर्ताकडे असलेलें विश्वबंधुत्व कायम रहावें असें वाटत असेल तर आर्यावर्तानें आत्मतेजानेंच आत्मोद्धार केला पाहिजे. प्रत्येक जीवाप्रमाणेंच राष्ट्रानेंही सर्वस्वीं स्वावलंबी होणें हा आत्मोन्नतीचा उत्कर्ष आहे.

'यस्मिन्‌ जीवति जीवन्ति बहवः सोऽत्र जीवति'

ही जीवनाची खरी व्याख्या लक्षांत ठेवा. जर एखाद्या राष्ट्राच्या अंगांत आत्मोद्धाराची, स्वावलंबनाची कुवत नसेल तर त्या राष्ट्राचा उदय अद्यापि खास पुष्कळ लांब आहे. तोंपर्यंत त्या राष्ट्रानें परपुष्ट जीवनांतच जगून तोंडावर फेंकलेला तुकडा चघळूनच पोट भरलें पाहिजे !

व्यापारी वागणूक.

२८ व्यापारांत किंवा तसल्याच प्रकारच्या इतर दळणवळणांत—व्यवहारांत नेकीचा अभाव आपणांमध्यें प्रामुख्यानें दिसून येतो. प्रत्येक चळवळींत व सार्वजनिक कार्यांत फंडगुंडाचीं कारस्थानें त्या चळवळीच्या निष्क्रियत्वास कारणीभूत होत आहेत. आपल्या व्यवहारांत व व्यापारांत किंवा कोणत्याही उद्योगांत परिस्थितीची जाणीव ठेवून जगांत डोकें वर काढण्यास आवश्यक अशीं व्यापारी-तत्वें कधींच पूर्णावस्थेस जात नाहींत. आणि म्हणून व्यापारी संघाच्या प्रयत्नाचें पर्यावसान प्रत्यक्ष दृश्य फलांत कधींच झालेलें दिसत नाहीं.

२९ व्यापार म्हणजे मैत्री नव्हे. व्यापारांत हीं सर्व प्रेमाचीं नातीं विसरून सचोटी हा बाणा ठेवावा लागतो. भिडेला बळी पडणारा व्यापारी

कधींच वैभवास चढावयाचा नाहीं. सार्वजनिक संघटित कार्यांत आर्थिक बाबी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट आणि खुलासेवार असल्या पाहिजेत. ज्या उद्दिष्ट कार्यासाठीं जी विशिष्ट साधनसंपत्ति उभारली असेल, जो निधि जमविला असेल, त्यांतील अणुमात्रही, उद्दिष्ट कार्याव्यतिरिक्त इतर कार्यांत खर्च करूं नका. सार्वजनिक पैसा व सामग्री सार्वजनिक सेवेंतच परत गेली पाहिजे. प्राणांतींही त्यांतील एक परमाणूसुद्धां वैय्यक्तिक साहाय्यार्थ उचलूं नका. कारण असला ध्येयविघातकपणा करून जनतेची फसवणूक करून आपली तुंबडी भरणें हें आत्मवंचनेइतकें, सदसद्विवेकबुद्धीचा खून करण्याइतकें अश्लाघ्य व बेगुमानपणाचें आहे. व्यापारांत इतका बाणा असणें यालाच सचोटी म्हणतात. नेकी ती हीच. व्यापाराभिवृद्धीस दुसरी आवश्यक गोष्ट म्हणजे एकांतिक प्रयत्न, अव्याहत खटपट, आटोकाट धडपड ही होय. एखाद्या संघटित सामाजिक कार्यांत त्या कार्याची व्यापकता, महत्त्व आणि परिस्थिति लक्षांत घेऊन हात घातल्यावर शिर तुटेपर्यंत कार्यवाहकत्व सोडावयाचें नाहीं इतकें निश्चयाचें बळ पाहिजे. तें कार्य वाटेल त्या संकटांतून तडीस न्यावयाचें येवढेंच ध्येय कार्यपूर्तीपर्यंत डोळ्यापुढें ठेवलें पाहिजे. सर्व शक्ती त्या कार्याचे ठिकाणींच केंद्रीभूत केल्या पाहिजेत.

२

राष्ट्र–भक्त.

पराकाष्ठेची देशभक्ति आणि देशबांधवांविषयीं व देशाविषयीं जिवंत स्वाभिमान व सहानुभूति हे गुण राष्ट्रभक्तांत अत्यावश्यक आहेत.

अंतःकरणापासून विचार करा. सदसद्विवेकबुद्धि किंवा ज्ञान म्हणजे काय ? ज्ञानाची मर्यादा एका विशिष्ट क्षेत्रापर्यंतच आहे. थोड्याशा टप्प्यापर्यंतच ज्ञानाची दिवटी तेवत रहाते; परंतु पुढें अंधार होतो. तार्किक मनाचा निकाल लागतो. परंतु त्याच वेळीं तर्कातीत मनांत स्फूर्तींच्या लहरी उसळतात. म्हणून माझ्या भावी धर्मसुधारकांनो! माझ्या देशोद्धारकांनो! या तर्कातीत मनाचें साम्राज्य, स्फूर्तींच्या विचारलहरी अंतःकरणांत नेहमीं पसरण्यासाठीं सहानुभूतीचा ओलावा अक्षय्य टिकवा. अंतःकरणास कळकळीचा ठाव काढा. अशा कळकळीचा, अशा सहानुभूतीचा आपणांस कधीं अनुभव आला आहे काय? लाखानें मोजण्याइतके, देवांचे व ऋषिवर्यांचे वंशज आज नरपशूंचें उद्यांचें भक्ष्य होऊन पडले आहेत. निर्घृण कालचक्राच्या येत्या फेऱ्यांत त्यांची आहुति पडायची वेळ आली आहे या विचारानें तुमच्या अंतःकरणास कधीं पीळ पडतात का ? तुमचे लाखों देशबांधव आज उपाशीं मरत आहेत आणि कित्येक हिंदूबांधव एक शतकापासून अर्धपोटीं राहून भुकेनें चरफडत आहेत हा विचार तुम्हांला कळकळीचा उमाळा आणीत नाहीं का ? आज देशभर अज्ञानरात्रीचा काळोख पसरला आहे. आर्यांच्या ज्ञानसूर्याचा प्रकाश अज्ञानपटलानें परावृत्त करून आपण त्या अंधकारांत

ठेंचाळत आहोंत याचा कधीं आपण विचार केलात काय ? ही देशाची दीन स्थिति तुम्हांला अहर्निश तळमळ लावीत नाहीं काय ? कानाकोपऱ्यांतून अन्नांवाचून प्राण सोडणाऱ्या दीनदुबळ्यांच्या आरोळ्या तुम्हांला झोंपेतून दचकवीत नाहींत काय ? देशाच्या दुबळ्या अवस्थेनें उडवलेला हलकल्लोळ तुमच्या शुद्ध रक्तवाहिन्यांतून सळसळत अंतःकरणावर, हृत्पटलावर छातीच्या ठोक्याबरोबर धडक्या मारून तुम्हांला जागे करीत नाहींत काय ? देशस्थितीचाच एक विचार तुम्हांला वेड लावतो का ? तुमच्या मातृभूमीची ही दैन्यावस्था पाहून त्या विचारकल्लोळांत तुमच्या वैय्यक्तिक महत्त्वाकांक्षा जागच्याजागीं ठार होत नाहींत का ? मातृभूमीच्या आर्तस्वराच्या हांकेला ' ओ ' देत धांवण्यासाठीं तुमचे मायापाश, तुमचें पत्नी-प्रेम, बंधुप्रेम, अपत्यस्नेह हीं सर्व आपोआप तटातट तुटतात का ? देहाची सुद्धां फिकीर न वाटण्याइतकी तळमळ तुम्हांला कधीं लागली आहे काय ? ही तळमळ तुम्हीं कधीं अनुभवलीत का ? ही तळमळ हीच देशभक्तीची पहिली पायरी ! देशभक्तीचा उगवता अंकूर या तळमळीनेंच वाढीस लागतो. ही तळमळ हा देशभक्तीचा ' ओनामा ' च आहे.

२ हा प्रेमभाव, हा बंधुभावच शेवटीं विजयी ठरेल.निस्सीम अनिर्वचनीय प्रेमाच्या अंगींच विजयसंपादनाचें सामर्थ्य असतें. तुमच्या बांधवांवर तुम्हीं अकृत्रिम प्रेम करतां का ? परमेश्वराचा शोध लावण्यासाठीं आगमानिगमांचीं वनें कशाला धुंडायला पाहिजेत ? तुमचे गरीब बांधव हीं सर्व परमेश्वराचीं सगुण स्वरूपेंच नाहींत काय ? या तेहतीस कोटी ईशस्वरूपांचीच आराधना तुम्हीं कां करीत नाहीं? शुद्ध गंगोदकाचा प्रवाह वहात असतां कांठावर विहिरी खणण्याची यातायात आणि वेडेपणा कां करितां ? ईशस्वरूपेंच

प्रत्यक्ष पुढें असतां मूर्तीच्या नादीं कां लागतां ? प्रेमाच्या अद्वितीय शक्तीवर विश्वास ठेवा. प्रेम ही ईश्वरी शक्ति आहे. 'अनिर्वचनीयप्रेमस्वरूपी स ईश्वरः।' स्तुतिस्तोत्रांची कोण पर्वा करणार ? वर्तमानपत्रें काय म्हणतील याची मला कधींच पर्वा नसते. तुमच्या अंतःकरणांत निस्सीम विश्वप्रेम असेल तर तुम्हीं सर्व शक्तिमान् आहांत. तुम्ही निस्सीम स्वार्थत्यागी आहांत काय ? जर तुमच्या आत्मोन्नतीचा इतका अद्वितीय उत्कर्ष झाला असेल तर तुम्हीं समर्थ आहांत. जातिवंत स्वभाव, नैसर्गिक गुणांचा विकासच सर्व जगभर प्रभाव पाडूं शकतो. तुमच्या आयुष्याची किंमत तुमच्या कृत्यांवरूनच जग करील. परमेश्वरावर श्रद्धा असेल तर महासागराच्या तळाशीं बुडालांत तरी तेथें सुध्दां तो दीनाचा दयाळू, सत्य संकल्पाचा वाली, भक्ताचा कनवाळू परमात्मा तुमच्यासाठीं धांव घेईल. आज देशाला अशा जातिवंत नरसिंहांची, रणधीर देशभक्तांची गरज आहे. आपण रणधैर्य संपादून नरशार्दूल व्हा. विश्ववंद्य देशभक्त होऊन देशोद्धारक देशसेवक व्हा.

३ कूपमंडूकवृत्ति झुगारून द्या. टीचभर बिळाच्या बाहेर येऊन जगाकडे नीट निरखून पहा. सभोंवार दृष्टि फेंका. आहे त्यांतच संतुष्ट न राहतां आणखी मिळविण्यासाठीं इतर राष्ट्रें किती कसून झटत, किती झपाट्यानें पुढें येत आहेत तें पहा ! विश्वबंधूंवर तुम्हीं प्रेम करतां ? तुमच्या देशाविषयीं तुम्हांला प्रेम वाटतें ? खरे देशभक्त देशाभिमानी असाल तर पुढें या आणि खांद्याशीं खांदा भिडवून आहे यापेक्षां कांहीं तरी श्रेष्ठतम ध्येय गाठूं या. मागें ढुंकूनही पाहूं नका. पुढचें पाऊल पुढें. अत्यंत जिव्हाळ्याच्याही मायापाशांत पडूं

नका. ज्यासाठीं तुम्ही आपलें जीवितही एक वेळ दिलें असतें त्या प्रेममूर्तीकडे आतां कोणच्याही मिषानें मागें पाहूं नका. हे देहबंध तटतट तोडूं शकाल तरच देशाचे दास्यबंध तुम्हीं तोडूं शकाल. म्हणून या मायावी मोहानें ओढले जाऊं नका. देशभक्तीची ओढ जिवाला लागूं द्या.

४ माझ्या प्रिय हिंदतरुणांनो ! प्रेमाचा नेहमीं विजयच होणार. हें लक्ष्यांत ठेवा. आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं तर येत्या युगांत तरी सत्याचा जय झाल्याशिवाय राहणार नाहीं. भक्ति, निस्सीम श्रद्धा फळास आल्याशिवाय राहणार नाहीं. जगदीशाला सुद्धां प्रेमभक्तीच्या प्रभावानें हार घ्यावी लागली. मग एकदां आपल्या अंतःकरणास विचारा कीं, तुमच्या देशबंधूंवर, विश्वबंधूंवर, समाजबंधूंवर, ज्ञातिबंधूंवर अकृत्रिम अनिर्वचनीय प्रेम त्या ठिकाणीं वसत आहे का ?

ईश्वरावर विश्वास आणि अचल आत्मश्रद्धा.

५ श्रद्धामय जगत्, प्रेममय विश्व, भक्तीमय ब्रह्मांड, अव्यभिचारिणी श्रद्धा, निस्सीम भक्ती यांच्या उत्कर्षापुढें आयुष्य कवडीमोल आहे. मरण ही कल्पनाही प्रेमाच्या ठिकाणीं उरत नाहीं. तहानभूक, सुखदुःख सर्व प्रेमाचे ठिकाणीं लय पावतात.

६ अंतःकरणांत श्रद्धेचा ओलावा राखा. प्रेमाचा पाझर फूटून विश्व प्रेममय पूरांत बुडवून टाका.

७ अंतःकरणांत हे शब्द कोरून ठेवा, हृत्पटलावर खोदून ठेवा कीं, माझ्या शूर हिंदपुत्रांनो, अद्वितीय कार्यासाठीं तुमचा जन्म झाला आहे. आर्यजननी अशाच अद्वितीय वीरांना प्रसवते. ती वीरसू आहे.

८ प्रत्येक हिंदपुत्रानें हें लक्षांत आणलें पाहिजे कीं, जगांतील प्रत्येक व्यक्तीनें आपलें कार्य पूर्ण केलें आहे. आणि फक्त प्रत्येक आर्यपुत्रानें करावयाचें पवित्र कार्य, विश्वोन्नतीचें उज्वल कार्य तेवढें करावयाचें राहिलें आहे. तें पूर्ण करण्यासाठीं प्रत्येक आर्यपुत्राचा अवतार आहे. हें अवतार-कार्य विसरूं नका. कार्यपूर्तीची ही जबाबदारी ओळखून हें कार्य शिरावर घेतलें पाहिजे.

९ आर्यपुत्रांनो, निश्चयानें हातीं घेतलेलें कार्य कालांतींही सोडूं नका. इतरांच्या मदतीची अपेक्षाच काय पण पर्वाही करूं नका. ज्या परमेश्वराचें तुमच्या कार्याच्या ठिकाणीं अधिष्ठान आहे त्या जगदीशाची शक्ति केवढ्याही प्रचंड मानवी मदतीपेक्षां अधिक उपयोगी नाहीं काय ? मग पवित्र अंतःकरणानें त्यालाच आळवा. त्याच्या पूज्य स्मृतीनें आरंभिलेला कोणताही मार्ग सत्याचाच असणार. तो जगन्नियंता सत्य संकल्पाचा दाता प्रभुराय तुम्हांला सत्याचाच मार्ग दाखवील. तुम्हीं त्या मार्गावर आहांत तोंपर्यंत तो प्रभुराय तुमचा सहाय्यकर्ता आहे आणि जोंपर्यंत तुम्ही सत्यासाठींच लढत आहां तोंपर्यंत जगांतील कोणतीहि शक्ति तुम्हांला नामोहरम करूं शकणार नाहीं. '**विश्वासः फलदायकः**'। '**श्रद्धावाँल्लभते ज्ञानम् ।**'

१० श्रद्धापूर्ण अंतःकरणानें, भक्तीभावानें त्या दयाघनाला प्रार्थना करूं या कीं, "आम्हांला तूं सत्यपथावर मार्गदर्शक हो." सत्यपथावर असतांना काळ्या गडद अंधकारांत संकटाच्या निबिड अरण्यांतही त्याच्या कृपाकटाक्षाचा सूर्य प्रकाश दाखवील. आणि वैपरीत्याच्या दरींतही

आपणास उद्धरण्यासाठीं तो आपले हात पुढें करील. फक्त पूर्ण श्रद्धा ठेवा. देव भावाचा भुकेला आहे.

११ विश्वेश्वराचा जयजयकार असो, जगन्नियंत्याचा जयजयकार करा. जयनिनादानें बेहोष होऊन चाल करा. तो परमेश्वर आपला राष्ट्रनौकाकर्णधार. तोच आपला सेनापती. मागें कोण ठेंचाळतो आहे, कोण धडपडतो आहे, याची फिकीरही न करतां, मागें न पाहतां, मार्ग आक्रमण करीत राहा. असेंच अगदीं अव्याहत प्रगतीनें आपण एकसारखी चाल करूं या. आपल्यांतला एकादा वीर आयुष्याच्या दोरीचा आधार सुटून पडेल तर त्याच्या अनुयायानें त्याची जागा भरून काढली पाहिजे. पुढच्यांना थांबवून वळवण्यापेक्षां मागच्यानें न थांबतां थकलेल्यांची जागा भरून काढण्याची शिकस्त केली पाहिजे.

१२ आर्यबंधूंनो, आपण दीन हतबल आहोंत. आपणांत व्यक्तित्वहीं नाहीं. पण हें एकच अजस्र अस्त्र घेऊन अत्त्युत्तम शिखराचा मार्ग काढावयाचा असतो. दऱ्याखोऱ्यांतून ठेंचाळत गेल्याशिवाय उन्नत शिखरावर वास करतां येत नाहीं. संकटाशिवाय सुखाचा सोपान सांपडावयाचा नाहीं.

१३ अव्याहत कार्य करा. धीरानें नेट धरा. संघशक्तीचा नेट लावा. वैय्यक्तिक मार्गच अवलंबून हेकेखोरपणानें आर्यावर्ताची ओढाताण करूं नका. कर्मफलाची फिकीर न करतां कर्मयोगाचें एकांतिक तपश्चरण करा कीं सत्याचा पाठीराखा पाठीशींच आहे. विश्वाची वळवणारी महाशक्ति तुम्हांला साह्य करींत आहे.

शारिरिक आणि मानसिक सामर्थ्य.

१४ भारत तरुणांनो, आज आर्यावर्त तुमच्यापासून कशाची अपेक्षा करीत असेल तर फक्त या दोनेच गोष्टींची. मला तुमचीं शरीरें लोखंडासारख्या चिवट शिरांचीं बनलेलीं पाहिजेत. आणि अशाच शरीरांत विद्युत्प्रभावशाली अंतरात्मा वास करीत असतो. म्हणून सामर्थ्य, क्षात्रवीर्य यांबरोबरच ब्रह्मतेज संपादा.

१५ ज्यांच्या इच्छाशक्तीचा जोर लोखंडाच्या साखळदंडाप्रमाणें एकांतिक आहे, आणि ज्यांच्या हृदयाला माघार हा शब्द ठाऊक नाहीं, ज्यांचा धीर भीतीनें कधीं दुभंगावयाचाच नाहीं अशा वीर युवकांची आज जरूर आहे.

१६ जर तुम्ही खरे हिंदपुत्र असाल, आर्यतेजाचा अंश जर तुमच्यांत असेल तर तुम्हाला भीति ही भावना सुद्धां भासावयाची नाहीं. तुमचा गतिविरोध कोणाकडूनही केला जाणार नाहीं. संकटाच्या मेरूपुढेंही तुमचा धीर न खचतां तुमचा मार्ग अव्याहतपणें चालूं द्या. वनराजाप्रमाणें आत्मनिष्ठावान् व्हा. एखादा सत्तामत्त गजेंद्रही पुढें आला तरी तुमच्या आर्यतेजाच्या दृष्टिक्षेपानें त्याची गाळण उडेल. आर्यवीरांनो, भारतसिंहांनो, सिंहगर्जनेनें भारताला हालवून सोडा. आणि जागृतीचा जयनिनाद विश्वभर दुमदुमून जगाला जागें करा.

स्वार्थत्याग शिका, पावित्र्य आणि शांति संपादा,
सत्य आणि सेवाधर्म यांचें निष्ठापूर्ण आचरण करा.

१७ स्वार्थसंन्यास ही मुख्य गोष्ट आहे. अशा सन्यासाशिवाय लोकसेवेकरितां तनमनधन वाहणें मनुष्यास शक्य होणार नाहीं. त्यागी

मनुष्य हा सर्वत्र समदृष्टि असतो. आणि सर्वांच्या सेवेस सारख्याच कळकळीनें स्वतःस वाहून घेतो.

१८ सत्य, प्रेम आणि कळकळ या भावनात्रयीपुढें कोणत्याही शक्तीचा टिकाव लागणार नाहीं. तुमचें अंतःकरण दयार्द्र आहे काय? आमरणांत विश्वसेवा करीत असतांना तुम्ही स्वतांविषयीं पूर्ण निरपेक्ष आहांत काय? देहाची अहंता गळाली आहे काय? तुमच्या मृत्युसमयींही निष्काम लोकसेवेंतच तुमच्या आत्मतेजाचा लय होईल इतकी तयारी असेल तर निधड्या छातीनें मृत्यूची पर्वा न करतां निष्काम लोकसेवेंत आत्मोन्नतीचा उत्कर्ष करा.

१९ जगांत वाटेल त्या वस्तू संपादन करतां येतील. भारताची विजयसामुग्री सर्व तयार होईल. पण शक्तिमान्, वीर्यमान्, विश्वासू, प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, आपल्या ब्रीदाला जागणारे असे हिंदतरुण आज पाहिजे आहेत. त्यांची उणीव त्यांनींच भरून काढली पाहिजे. असे वीर्यशाली शंभरच तरुण पुढें येऊं द्यात कीं सर्व जगांत प्रचंड खळवळ उडालीच म्हणून समजा.

२० स्वतः नास्तिक बनूं नका. बेपर्वाई न करतां, लोकमताला धुडकावून न लावतां, त्याबरोबरच स्वतः माघारही न घेतां सर्वांना संतुष्ट करा. स्वतःच्या तत्त्वांवर पूर्ण श्रद्धा ठेवून, पवित्र तेजानें त्यांचें संरक्षण करा. आणि मग तुमच्या तत्त्वप्रतिपादनाच्या मार्गांत प्रचंड विरोध झाला तरी शेवटीं सर्व जग तुमच्या तत्त्वांपुढें, तुमच्या आज्ञेपुढें मान तुकवील. तुमच्या पवित्र तेजापुढें सर्व जग नम्र होईल.

२१ परम गहन अशा सेवाधर्माचें संपादन करा. आज्ञापालन अंगीं बाणून घ्या. पण त्याबरोबरच आत्मश्रद्धेचा लय होऊं न देण्याची खबरदारी घ्या.

सेवाधर्माचें आचरण करतांना आत्मत्वाचा होम करूं नका. वंदनीय अशा राष्ट्रपुरुषांच्या आज्ञा सर्व राष्ट्रानें शिरसावंद्य मानल्याशिवाय समाजाचें किंवा राष्ट्राचें एकीकरण होणें शक्य नाहीं. एकीकरणाच्या अभावीं राष्ट्रीय शक्ति केंद्रीभूत झाल्याशिवाय सर्वांच्या इच्छाशक्तींचा एकसमयावच्छेद झाल्याशिवाय कोणतेंही मोठें कार्य जगांत पूर्ण होणार नाहीं.

२२ शक्तिसंपन्न देहानें आणि श्रद्धापूर्ण अंतःकरणानें प्रयत्नाची शिकस्त करा. सत्यप्रीति, प्रामाणिकपणा, विश्वाचा विश्वास आणि पावित्र्याचें तेज संपादा. हीं अभेद्य कवचें आहेत.

२३. जनसेवेचें व्रत अखंड चालूं द्या. या व्रताचें आचरण करीत जसे जसे तुम्ही पुढें पुढें जाल तसतसी ज्ञानमार्गांतहि तुमची प्रगति होत जाईल.

२४ कार्याला हात घाला. कार्यक्षेत्रांत वज्रनिश्चयानें उडी फेंका कीं तुमच्या ठिकाणीं इतका जोम, इतकी शक्ति उत्पन्न होईल कीं, तुमच्या शरीरांत ती मावेनाशी झाली आहे असें तुम्हांला आढळून येईल. यःकश्चित् स्वरूपाची जरी विश्वसेवा केलीत तरी अंशात्मक विश्वसेवेनेंही तुमच्या अंतर्हित शक्तीस चेतना मिळेल. दुसऱ्याचे श्रेयचिंतनांतसुद्धां हळुहळु अंतःकरणांत सिंहशक्ति जागृत होत असते. मी प्रत्येक भारततरुणावर पराकाष्ठेचें प्रेम करतों. पण आपण परोपकारार्थ देहाचा लय करावा अशी माझी इच्छा आहे. फार काय पण परोपकारार्थ देह ठेवाल तरच मी तुमच्यावर प्रेम करीन. परोपकारार्थ तुम्हांला मरतांना पाहून माझ्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंचा पूर लोटेल.

२५ कोणाजवळही कसल्याही प्रसंगीं आपल्या शांतवृत्तीचा भंग होऊं देऊं नका.

२६ सत्ताधीश होण्याची कधींही इच्छा करूं नका. सेवाधर्माचें एकांतिक आचरण करणारा योगी विश्वाचा साम्राज्याधिपति असतो.

२७ वादविवादांत व भांडणाच्या आवेशांत निकरावर येऊन क्रोधाग्नि भडकवून चित्ताच्या शांतवृत्तीचा होम कां करितां ? प्रत्येकाच्या मतविभिन्नत्वाचे ठिकाणीं शांतता बाळगा. शांतता, पावित्र्य आणि सहनशीलता हींच शेवटीं विजय संपादण्यास कारणीभूत होतील.

२८ मी मरेपर्यंत एकसारखा कार्य करीन. आणि मेल्यावर अज्ञात स्वरूपांतही माझा आत्मा जगाच्या कल्याणार्थच विश्वसंचार करीत राहील. सुजनत्वाप्रमाणेंच सत्य हें असत्यापेक्षां केव्हांही श्रेष्ठ ठरणार. तुम्ही त्यांचा आश्रय कराल तर त्यांच्या श्रेष्ठत्वाचा परिणाम तुम्हांला दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. सत्य हेंच जगांत शेवटीं विजयी ठरेल.

२९ तुमची इच्छा असेल तर माझ्या मागून या. मात्र तुम्हीं अगदीं निरलस, पूर्णपणें आत्मनिरपेक्ष आणि विशेषतः सर्वतः शुद्ध बनलें पाहिजे.

३० धैर्यवान् व्हा. शांतीचे पुरस्कर्ते व्हाल तर शांततेचें साम्राज्य कल्पनेच्या बाहेर विस्तार पावेल. प्रत्येक कार्य पूर्ण यशस्वी होण्यापूर्वीं हजारों संकटांतून तडीस न्यावें लागतें. जे नेटानें धीर धरतील, प्रारब्ध कार्य आमरणान्त सोडणार नाहींत, त्यांनाच यश मिळेल. संकटाच्या काळोखांतही जे धीरानें मार्ग काढूं शकतील तेच यशाचा सूर्योदय पाहण्यास जिवंत राहतील. जे न डगमगतां शांतचित्तानें व दुर्दम

चिकाटीनें सारखा प्रयत्न चालू ठेवतील त्यांना आज नाहीं उद्यां यश हें मिळालेंच पाहिजे. लवकर किंवा उशिरां पण केव्हां तरी एकनिष्ठेनें केलेल्या कार्याचें यश त्यांनांच मिळेल कीं जे न डगमगतां प्रयत्न करीत राहतील.

३१ आत्यंतिक शांतता, पराकाष्ठेचें धैर्य, उज्वलतम पावित्र्य आणि असामान्य कार्यक्षमता हीच सद्धेतुप्रेरित सत्कार्यपूर्तीची गुरुकिल्ली होय.

३२ आळस झाडून कार्याला लागा. चैनीचे मोह झुगारून द्या. आतां या क्षणींच कार्यक्षेत्रांत उडी घ्या. ज्या पावित्र्यानें विश्वोद्धार होईल, ज्या पावित्र्यानें जनता जनार्दनस्वरूपाप्रत पावेल, ज्या तेजानें विश्वाच्या अज्ञानावस्थेस ज्ञानाचा उजाळा मिळेल त्या तेजोग्नींत विश्वोद्धारासाठीं उडी घ्या. इतक्या जोरानें धांव ठोका, इतक्या तडफीनें उडी फेंका कीं, त्या उसळत्या तेजोरसानें सर्व विश्वावर प्रकाशकिरण पसरतील. सर्व विश्वावर प्रभा फांकेल.

३३ तुमच्या देशबांधवाचे मार्गदर्शक होण्याची, नेते होण्याची हांव धरूं नका. त्यांचे सहाय्यक, देशाचे देशसेवक व्हा. नेतृत्वाच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेनें आतांपर्यंत हजारों राष्ट्रनौका आयुष्याच्या वाटेवरच कलहाच्या वादळांत ठार बुडाल्या आहेत. म्हणून स्वार्थी आकांक्षा उत्पन्नही होणार नाहीं अशी खबरदारी घ्या. लोकसेवा निष्काम झाली पाहिजे. कोणीं अमरत्व देऊं केलें तरी त्यासाठीं लोकसेवा सोडून, आपल्या निःस्वार्थी बाण्यास कलंक लागेलसें करूं नका. निष्काम लोकसेवा हाच आत्मोन्नतीचा उत्कर्ष !

३४ सेवाधर्म आचरीत असतांना त्या लोकसेवाव्रताची भंग करणारी लोकसत्तेची राक्षसी महत्त्वाकांक्षा कधीं चित्तांतही येऊं देऊं नका. जगाचे सेवक व्हा कीं, जग तुम्हाला तुम्हीं न मागतां मालकी देईल.

३५ दोन गोष्टींविषयीं नेहमीं सावध रहा. सत्तेची हांव आणि परोत्कर्षासहिष्णुता यांचा वासही तुमच्या निष्काम लोकसेवाव्रताचरणाचे ठायीं येणार नाहीं याबद्दल काळजी घ्या.

३६ जर स्वतःच लोकांचे पुढारी झालांत तर कोणीही तुमचें शिष्यत्व पत्करणार नाहीं. म्हणून ही आत्मप्रभावाची हांव प्रथम जागच्या जागीं जिरवा. विजय संपादावयाचा असेल तर प्रथम विजयाची हांव सोडा. अहंभाव सोडा कीं विश्वाचे तुम्हीं मालक आहांत.

३७ उच्च विचारभ्रमणांतच हुरळून जाऊं नका. कार्याचे मार्ग आंखतांना मोठमोठे अवजड भाग हातीं घेऊन फशीं पडूं नका. तर प्रथम यथाशक्ती सुरवात करा. तुम्ही ज्या भूमिकेवर कार्य करीत आहांत, ज्या वातावरणांत तुमचें कार्यक्षेत्र आहे त्याची पूर्ण जाणीव करून घ्या. आणि मग कार्यास सुरवात करा. अशी एकदां कार्यास सुरुवात झाली कीं, अव्याहत पुरोगामी धोरण ठेवा. पुढचें पाऊल मृत्यूच्या फांसानेंही मागें घेण्याची पाळी येणार नाहीं इतक्या नेटानें धीमेधीमे कार्य करावयास पाहिजे.

३८ हिंदपुत्रांनो, उदारहृदयांनो, उदात्त आत्म्यांनो, कार्याची पूर्ण कल्पना ध्यानांत आणा. चक्रनेमीचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवा. पुढें गेलेला चाकाचा भाग कदापि मागें फिरावयाचा नाहीं, त्याचप्रमाणें राष्ट्ररथाचें चाक परदास्यपंकांतून उचलण्यासाठीं सर्व जण खांद्याशीं खांदा

लावून नेट करा आणि राष्ट्राचें रथचक्र मार्गावर आणून अशी खबरदारी घ्या कीं, कदापि गति खुंटणार नाहीं. कार्यास सुरवात झाली कीं, नांवलौकिकासाठीं किंवा कोणत्याही मोठ्या महत्त्वाकांक्षेच्या लोभानें मूर्खपणानें मागें पाहूं नका. पाऊल पुढें टाका. यश मागोमाग धांवत येईल. नेहमीं स्वतःला पुढें फेंका आणि कार्य करा.

३९ अंतःकरणाची विशालता, मनाचा विकास आणि यशाविषयीं पूर्ण विश्वास हीं विश्वाला व्यापून टाकण्याइतकीं वाढूं द्या.

४० आध्यात्मिकांचें उच्चत्व आणि आधिभौतिकांचें अत्यंत विशालत्व यांचा हृदयंगम मिलाफ होऊं द्या. अध्यात्मवादी अंतःकरणाची पराकाष्ठेची श्रद्धा, अप्रतिम चिकाटी आणि आधिभौतिकवादी हृदयाचा विश्वव्यापी आत्मविश्वास यांचा तुमच्या ठिकाणीं एकभाव होऊं द्या. सागराइतकें खोल व गंभीर आणि अनंत आकाशाइतकें विशाल अंतःकरण आपणांस पाहिजे आहे.

४१ समतोलवृत्ति राखा. प्रगतीचेंच धोरण ठेवा. दुसऱ्यांवर मतवैचित्र्याविषयीं टीका न करतां समतोल वृत्ति ठेवून सर्वांचें प्रेम संपादा. आणि आपलें सुधारणा आणि प्रगतीचें धोरण कायम राखा. आपला चित्संदेश प्रत्येक जीवात्म्यास ऐकवा. आपल्या कार्याविषयीं प्रत्येकाला पूर्ण जाणीव करून द्या आणि मग आपली कार्यसमाप्ति करा. प्रत्येक जीवात्म्यास तुम्ही आपला चित्संदेश ऐकवलात, जाणवलात आणि पटवलात कीं शिल्लक कार्य परमात्म्याच्या प्रेरणेनेंच होईल. पण आपण मात्र पराकाष्ठेचे प्रयत्न करून स्वकार्यामध्यें सतत व्यापृत असा.

प्रकरण ३ रें.

१

आंतर्राष्ट्रीय कार्य.

समाजसेवक तयार करणें. स्वयंसेवक होणें.

ज्यांच्या अंतःकरणांत पावित्र्याच्या स्फूर्तीनें चेतना उत्पन्न झाली आहे, ईश्वराच्या ठिकाणीं अचल श्रद्धा हेंच कवच ज्यांनीं धारण केलें आहे, दुःखाच्या डोंगराच्या कोसळीखालीं चिरडलेल्या दीन दुबळ्या जीवाच्या हालांची कींव येऊन त्यांच्या सहानुभूतीनें ज्यांचा शांतिसमुद्र हेलावला गेला आहे आणि सिंहाच्या धैर्यानें ज्यांच्या रोमारोमांत अप्रतिहत शक्ति संचारली आहे असे एक शंभर हजारच स्त्रीपुरुष आत्मोद्धाराच्या कथा सांगत, सामाजिक उन्नतीचे धडे देत, ऐक्यभावाचीं बीजें पेरीत, उपदेशकांचें, धर्मसेवकांचें कार्य करीत ब्रह्मांडावर साम्राज्य चालवूं शकतील. अशीं माणसें आज पाहिजे आहेत.

२ जीं स्वदेशासाठीं स्वार्थाला लाथ मारून फकिरी बाणा स्वीकारण्यास कचरणार नाहींत, जीं आर्यसंस्कृतीचा पूर्ण अभिमान बाळगून आपल्या कुलकीर्तीस उज्वल करणारीच कृति करून ब्रीद राखतील अशीं कार्यकर्तीं माणसें पाहिजे आहेत, अशीं माणसें निपजावयास लागलीं, म्हणजे भारताची हां हां म्हणतां सर्वांगीण उन्नति होईल.

३ कार्यकर्त्यांच्या चांगुलपणावरच कोणत्याही चळवळीचें—मग ती राजकीय असो वा सामाजिक असो—सर्व यशापयश अवलंबून असतें. कार्यकर्त्यांची कळकळ हाच चळवळीचा पाया होय. कोणत्याही देशाचें श्रेष्ठत्व त्या देशाच्या राज्यकर्त्या संस्थेच्या कायदेकानूंवर किंवा पार्लमेंटच्या ठरावांवर अवलंबून नसून त्यांतील माणसांच्या श्रेष्ठत्वावर व सुजनत्वावर अवलंबून असतें.

४ आज जर कोणाची राष्ट्रकार्यास जरूर असेल तर ती धार्मिक पावित्र्यानें स्फूर्ति पावणाऱ्या धर्मप्रसारकांची व प्रचारकांचीच आहे. आपल्या उज्ज्वल आचरणानें आणि प्रतिभाशाली वाणीनें धर्माचें पुनरुज्जीवन करणारे धर्मवीर महात्मे आज पाहिजे आहेत.

जे जे सत्कीर्तीचे पुरुष ॥
कीं ते परमेश्वराचे अंश ॥
धर्मस्थापनेचा हव्यास ॥ तेथेंचि वसे ॥ १ ॥

५ मला यशापयशाची फिकीर नाहीं. मला माझी चळवळ अत्यंत सद्धेतुप्रेरित आणि विशुद्ध ठेवली पाहिजे. नाहीं तर इतक्या पावित्र्याखेरीज मला एकही अनुयायी मिळावयाचा नाहीं.

६ जगांतल्या सर्व संपत्तीपेक्षां मानवी प्राण्यांची योग्यता फार मोठी आहे. अशा धर्मवीरांवरून सर्व जगांतील संपत्ति कुरवंडून टाकावी.

७ आज हिंदुस्थानांत संपदेची अवकृपा झालेली असली, दुर्दैवाचा जबर तडाखा बसला असला, सर्वत्र दास्यत्व पसरलें असलें, अवनतीची पराकाष्ठा झाली असली, सर्व देशभर उपासमार होत असली, द्वेषानें आणि भांडणानें देशाचे तुकडे उडाले असले तरी सुद्धां हे महाभाग

हिंदुस्थाना, माझी मनोदेवतासुद्धां मला खात्री देत आहे कीं, इतक्या अवनतीस पोहोंचलेल्याही मातृभूमीवर, हिंदुलोकांवर निःसीम प्रेम करणारा, या दुर्दैवी समाजाविषयीं तळमळणारा जर एखादा महात्मा आज जन्मास येईल, त्याचें प्रेम इतकें उदात्त आणि विश्वव्यापक असेल तर भारताचा अभ्युदय खास होणार. जेव्हां उदार हृदयाचे हजारों स्त्रीपुरुष आपल्या सर्व महत्त्वाकांक्षा, आपल्या सर्व संपत्तीचे उपभोग देशाचे कल्याणार्थ बाजूला ठेवून दिवसेंदिवस संपूर्ण अवनतीस जाणाऱ्या आपल्या लाखों देशबांधवांसाठीं अत्यंत नेटानें आणि कळकळीनें प्रयत्न करतील तेव्हांच हिंदुस्थान उदयास येईल.

८ आपल्या देशबांधवांच्या उन्नतीचा जेव्हां त्यांस ध्यास लागेल तेव्हांच त्यांच्या देशाला ऊर्जितकालचे उन्नतीचे दिवस दिसतील.

९ जे हिंदुपुत्र देशोद्धाराच्या पवित्र कार्यासाठीं आपल्या कायिक, वाचिक व मानसिक शक्ती अर्पण करण्याचा निश्चय करतील, या एका पवित्र कार्यासाठींच ज्यांचीं अंतःकरणें तळमळत असतील, हजारों हिंदूंचा उद्धार हाच ज्यांच्या अंतःकरणाचा एकच प्रियतम विषय झाला आहे, त्या तेजस्वी तरुणांना जागृत करून त्यांच्या संहतींत आपण कार्य करा. धर्माच्या पुनरुज्जीवनाच्या ध्येयानें त्यांच्या अंतःकरणांतील चैतन्य उद्दीपित करा. देशोद्धाराची सर्व जबाबदारी फक्त हिंदतरुणांवरच आहे. आणि तेच भारताचा उद्धार करण्यास समर्थ आहेत.

१० हिंदतरुणांना आर्यधर्माचे प्रचारक करण्यासाठीं हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थानाबाहेर आर्यधर्मांतर्गत सत्यतत्त्वें आणि पुराणें यांच्या श्रेष्ठत्वाचें प्रवचनानें शिक्षण देणारे प्रचारक उत्पन्न करणाऱ्या संस्था जागोजाग स्थापाव्या अशी माझी योजना आहे.

११ संघस्थापना करून समाजसुधारणेच्या कल्पनेचा प्रसार करा. मध्यवर्ती विश्वविद्यालय स्थापून त्यांत असे प्रचारक उत्पन्न करा, आणि अशा विद्यालयांतून तयार होणाऱ्या प्रचारकांकरवीं धर्मभावनांचें बीजारोपण करणारें शिक्षण गरीबगुरिबांच्या झोंपड्यांत जाऊन दिलें पाहिजे तरच धर्माचें पुनरुज्जीवन होईल. कारण धर्माचा अंश अद्यापि जर कोठें शिल्लक असेल तर तो पाश्चात्य संस्कृतीच्या परिणामापासून अलिप्त अशा खेड्यापाड्यांतील शेतकऱ्यांच्या आणि साध्या राहणीची आवड असलेल्या हृदयांतच आहे. म्हणून तेथें जाऊनच तो मरता अंकुर पुन्हां फोंफावेल असें केलें पाहिजे. शहरापेक्षां खेड्यापाड्यांत धर्माचें पुनरुज्जीवन जास्त यशस्वी होईल.

२

अध्यात्मविचारांच्या पूरानें सर्व देश भरून काढा.

अत्यंत महत्त्वाच्या आद्य कर्तव्याकडे आपलें लक्ष वेधलें पाहिजे. तें पवित्र कार्य म्हणजे उपनिषदें, पुराणें, वेद इत्यादि पवित्र ग्रंथांतून जीं अत्यंत चमत्कृतिपूर्ण सत्यें, सिद्धांत अज्ञातावस्थेंत आहेत तीं ग्रंथरूपानें बाहेर काढून तीं अमूल्य रत्नें सर्व जगभर उधळविलीं पाहिजेत. त्या सत्यसिद्धांतांचा उज्वल प्रकाश उद्दीपित केला पाहिजे.

२ हिंदुस्थानांतील प्रत्येक चळवळीचें धार्मिक पुनरुज्जीवन हें आद्यतत्त्व आहे. धर्म हा आपल्या प्रत्येक हालचालीचा आत्माच आहे. सामाजिक किंवा राजकीय भावनांनीं वातावरण दुमदुमून सोडविण्या-

पूर्वी धार्मिक भावनांनीं सर्व देशभर जागृति झाली पाहिजे. प्रत्येक अंतःकरणांत सामाजिक किंवा राजकीय तत्त्वांचें बीजारोपण करण्यापूर्वी धार्मिक भावनांना भरती येऊं द्या.

३ या धर्मभूमींत आपण प्रथम धर्मतेजाची संपादना करूं या. आध्यात्मिक ज्ञानाचें अध्ययन व पुनरुज्जीवन करूं या. आणि त्या आध्यात्मिक ज्ञानाचा प्रभाव भारताच्या चतुःसीमेंतच मर्यादित होणार नाहीं तर सर्व विश्वभर पसरेल.

४ एकीकरणाचे सर्व प्रयत्न, संहतीचे सर्व सिद्धांत आत्मतत्त्वाच्या पायावरच उभारण्याचा प्रयत्न आज सर्व समाजसुधारक करीत आहेत आणि अशी नवीन भूमिका वेदांत ही एकच आहे.

राजकारणानें कार्यभाग होणार नाहीं.

५ कितीही मोठी सेना, केवढेंही प्रबल सरकार, कितीही निर्घृण अशा लोकनियुक्त संस्थेचे कायदे हिंदुस्थानची सामाजिक स्थिति सुधारूं शकणार नाहींत. तर आध्यात्मिक ज्ञानाच्या प्रसारानेंच धार्मिक भावनांच्या पुनरुज्जीवनानेंच समाजांतील वेडगळ समजुतीचें निरसन होईल. आणि अज्ञानमूलक रूढी बंद होऊन समाजोन्नति होईल.

६ कोणत्याही राजकारणावर माझा विश्वास नाहीं. ईश्वर व सत्य हेंच जगाचें राजकारण. बाकी सर्व तत्त्वें सब झूट है.

७ ज्या राजकारणाच्या विशिष्ट पद्धतीसाठीं, राजकीय हक्कांसाठीं आपण हिंदुलोक आज झगडत आहोंत त्याच पद्धती युरोपखंडांत आज अनेक शतकांपासून अनुभवल्या जात आहेत. आणि अनुभवांतीं

त्या सर्व पद्धती दोषपूर्ण आणि अपरिपक्कच ठरल्या आहेत. एकामागून एक सर्व संस्था, पद्धती आणि राजकर्त्या सरकारशीं जोडलेली प्रत्येक क्रिया कुचकामाची म्हणून दोषार्ह ठरली आहे, आणि त्या पद्धतींत कसा बदल करावा हें न समजल्यामुळें सर्व युरोपभर अस्वस्थता व बेबंदशाही माजली आहे. मानवी प्राण्यावर तरवारीच्या बलावर राज्य चालविणें अगदीं अशक्य आहे. तुम्हांला असें आढळून येईल कीं, "सत्तेच्या जोरावर राज्यकारभार," या कल्पनेचा उदय ज्या राजकीय केंद्रांतून झाला, तींच केंद्रें अवनतीचीं, धुळधाणीचीं आणि बेबंदशाहीचीं आद्यकेंद्रें झालीं आहेत. या कल्पनांच्या उत्पादक संस्थाच प्रथम छिन्नविच्छिन्न झाल्या. युरोप ही आधिभौतिक सामर्थ्याची जननीच झाली आहे. परंतु जर युरोपनें—ही एकांगी उन्नति—ही परिस्थिति बदलण्याकडे दुर्लक्ष्य केलें, भूमिका शुद्ध करण्याची हयगय केली, आणि सर्व चळवळींची उभारणी आध्यात्मिक बलाची पर्वा न करतां आधिभौतिक सामर्थ्यावरच केली तर या आत्मतत्त्वाचा तिरस्कार करण्यानें येत्या पन्नास वर्षांत—एक अर्धशतकाच्या आंत युरोपची धुळधाण उडालेली दिसेल.

८. जगाच्या प्रत्येक अंगाच्या परिवर्तनाकडे तुम्ही पहाल तर तुम्हांला सहजच दिसेल कीं त्या परिवर्तनाचा अर्थच असा दिसतो कीं—जगांत लवकरच एकछत्री अमलाचा शेवट होणार. आणि सार्वजनिक राज्यपद्धति, लोकनियुक्त राज्यसंस्था किंवा—तुम्ही त्या पद्धतीला कांहींही नांव द्या—पण अशी एक राज्यपद्धति जगांत अमलांत येणार आहे. जनता आपल्या आधिभौतिक गरजांच्या पूर्तीसाठीं हक्कानें मागणी करील. कमी काम, जुलुमाचा जोरानें निषेध, युद्धांच्या कारणांचा, भांड-

णांच्या भावनेचाच बींमोड आणि पोट भरून जास्त अन्न या मागण्या जनता हक्कानें पुऱ्या करून घेईल. दुसऱ्या कोणत्याही सुधारणा धार्मिक भावनांच्या आधाराशिवाय, माणसांतील सुजनत्वाच्या सहाय्याशिवाय, चिरकालिक होऊं शकतील असें कोणीं सांगावें ? असें जाहीर करण्यास कोण समर्थ आहे ? जर या सुधारणाचा साद्यंत इतिहास तुम्ही पहाल तर शेवटीं तुमच्या अनुभवास येईल कीं, धर्म हेंच सर्व कार्यांचें आदितत्त्व आहे, सर्व सुधारणेचें बीज आहे. जर धर्म सुरक्षित असेल तर सर्व सुखच आणि सुरक्षितताच आहे. त्या सुधारणा जर शुभफलदायी ठरल्या तर खास समजा कीं त्या धार्मिक भावनांवरच उभारलेल्या आहेत.

९ " साम्राज्यांतील सर्व वस्तुजात सद्गुणी झालें पाहिजे असा पार्लमेंटनें नियम करून जनता कधींही सद्गुणी होत नसते, " ही म्हण फार अर्थबोधक आहे. आणि याच कारणास्तव राजकारणापेक्षां धर्म हा अत्यंत जिव्हाळ्याचा आणि गहन विषय आहे. कारण धार्मिक भावनांचें बीजारोपण अंतःकरणाच्या पवित्र भूमिकेंत होत असल्यानें धर्म हा मानवी स्वभावाचा नियंत्रणकर्ता आहे. धार्मिक भावना हींच मानवी स्वभावाचीं आद्यतत्त्वें असतात व मनोरचनेशीं धर्माचा अत्यंत निकट संबंध येत असतो. (कायदा फार तर बाह्य व्यापारावर नियंत्रण घालूं शकतो परंतु धर्माचें नियंत्रण अंतरंगावरही असतें.)

१० प्रत्येक व्यक्तीस कबूल करावें लागेल कीं कायदा, राजकारणाचीं तत्त्वें, सरकार हीं विकारशील आहेत. त्यांच्या स्वरूपांत बदल

हा व्हावयाचाच. त्यांचें स्वरूप (धर्मतत्त्वाप्रमाणें) चिरकालिक कधींही असणें शक्य नाहीं. [बाह्यांगावर उभारलेल्या संस्था अंतरंगा-शिवाय, अंतःशक्तीच्या अभावीं, अंतःकरणाच्या सहानुभूतीच्या अभावीं, चिरस्थायी होत नसतात.] परंतु कायदा किंवा पार्लमेंट यांच्या नियंत्र-णापलीकडे असें परमोच्च श्रेय आहे आणि तेंच धर्मानें प्राप्त होणारें कल्याण होय.

११ येशु ख्रिस्तानें हेंच जाणलें कीं कायदा हा मानवी शक्तीचा किंवा संस्कृतीचा पाया नसून मानवीसंस्कृतीचें चक्र नीति आणि पावित्र्य याच शक्तिद्वयानुसार फिरत आहे. कायद्याच्या अंगीं नियंत्रणशक्ति नसून ती नीति आणि पावित्र्य यांच्या ठिकाणीं आहे.

१२ इंग्लंडला हिंदुस्थानासाठीं जर काहीं सहाय्य करणें असेल तर तें एकच आहे कीं आत्मोद्धार करणें हें होय. अवनतीच्या गर्तेकडे झुलणारा राष्ट्राचा झोल सांवरून नाशापासून स्वतःचें रक्षण करणें हें हिंदुस्थानच्या अभ्युदयार्थ मदत करण्यासारखेंच होईल. ज्यांनीं आपलें शस्त्र हिंदुस्थानावरच रोखलें आहे, ज्यांचा हात हिंदुस्थानच्या मानेवर आहे त्यांच्या सूत्रचालकत्वाखालीं होणारी सुधारणा ही सुधारणा नसून अवधारणा आहे अशी माझी खात्री आहे. सत्तेच्या हुकुमाबरहुकूम होणारी प्रगति कवडीमोल आहे.

१३ आज ज्या हक्कांची तुम्ही मागणी करीत आहांत त्या गरजा खरोखर तुमच्या आहेत कीं तुमच्या सत्ताधीशांच्या आहेत ? हिंदुस्थानाला स्वराज्य मिळवावयाचें तें हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं कीं इंग्लंडच्या

सुखासाठीं ? स्वराज्याची तहान कोणाला लागली आहे ? जर भारताला लागली असेल तर ती भारतीयांनींच आत्मसामर्थ्यानें भागविली पाहिजे कीं भारतीय सत्ताधीश ती भागविण्यास येतील ? जन्मसिद्ध हक्कांची भीक मागून ते कधीं मिळत नसतात.. भिकाऱ्याच्या इच्छा कधीं कोणी पुऱ्या केल्या आहेत काय ? समजा कीं उद्यां साम्राज्यससरकारनें हिंदुस्थानची स्वराज्याची मागणी पुरी केली तर त्या जन्मसिद्ध हक्काचें जतन करण्यास समर्थ असे स्वराज्यसंरक्षक तुमच्यांत कोठें आहेत ? म्हणून आधीं अशीं कार्यक्षम माणसें तयार करा. हक्कानें हक्क संपादण्याची व संपादित हक्कांचें संरक्षण करण्याची धमक असलेले पुरुष आज पाहिजे आहेत. आणि अंतःकरणांत आत्मविश्वास असल्याशिवाय व श्रद्धा असल्याशिवाय, कार्यक्षमता अंगीं येणार कशी ? आणि आत्मनिष्ठावान् पुरुषसिंह निपजणार कसे ?

१४ आध्यात्मिक ज्ञानाच्या प्रसाराचें कार्य करा कीं त्या पवित्र कार्याच्या अनुषंगानेंच आधिभौतिक ज्ञान आणि पाहिजे त्या विषयाचेंही ज्ञान तुम्हांस प्राप्त करून घेतां येईल. पण अध्यात्माचा आलंब सोडून ऐहिकज्ञानप्राप्यर्थ तुम्ही कितीही प्रयत्न केलेत तरी मी अगदीं स्पष्ट सांगतों कीं ते प्रयत्न आर्यभूमींत निष्फलच ठरतील. त्या प्रयत्नांचा—त्या ज्ञानाचा—जनतेच्या अंतःकरणावर अंशमात्रही चिरस्थायी संस्कार होणार नाहीं.

धर्मप्रवचनाचें ध्येय.

(अ) सार्वत्रिक धर्माची स्थापना.

१५. भावी हिंदी स्वराज्याच्या—हिंदराष्ट्राच्या घटनेंत पहिला शिलाकोन, युगायुगाच्या कालपहाडांत शिखरावर चढण्यासाठीं खोदावयाची

पहिली पायरी म्हणजे सार्वत्रिक ज्ञान हीच होय. आपणांपैकीं प्रत्येक हिंदमात्राच्या अंतःकरणांत अशी जाणीव झाली पाहिजे—अशी शिकवण मिळाली पाहिजे कीं सर्व हिंदूंना कांहीं ध्येयें सार्वत्रिक—राष्ट्रीय अशीं आहेत. आपल्या पाठीमागें कांहीं राष्ट्रीय भावना आहेत. आणि त्या राष्ट्रीय ध्येयपूर्तीची वेळा, आत्मोद्धाराची वेळा, समजोन्नतीची सुवर्णघटिका अगदीं जवळ येऊन ठेपली आहे. अशा मंगलप्रसंगीं क्षुद्र भांडणें, वैमनस्यें आणि मतांमतांचा भेदाभेद पार विसरून जाऊन अंतःकरणें प्रेममय करून सारख्याच उत्सुकतेनें त्या अभ्युदयकालाची वाट पाहूं या.

१६ इतस्ततः पसरलेल्या इच्छाशक्ती, इतस्ततः प्रकाशित होणारीं अध्यात्मतेजें एकसमयावच्छेदेंकरून राष्ट्रीय स्वरूपांत येऊन मिळतील तेव्हांच भारतवर्षांत खरी संहति घडून येईल. प्रत्येक हिंदु म्हणविणारी व्यक्ति हिंदमातेच्या विराटस्वरूपांत आत्मतेजासह व्यक्तित्वाचा लय करील. हिंदुस्थान हें राष्ट्र म्हणजे एकाच आध्यात्मिक ध्येयाचें चिंतन व अनुगमन करणाऱ्या सर्व आत्म्यांच्या तेजांचा तेजोगोल, त्या एकाच ध्येयासाठीं तळमळणाऱ्या हृदयांचा हृदयंगम संगम होय. आणि अशीच राष्ट्रीय संहति कार्यसाधिका असते.

(आ) एकांतिक ध्येयाच्या राष्ट्रैक्यभावनेचें बीजारोपण.

१७ या एकांतिक ध्येयाच्या भावनेचें कार्यांत रूपांतर केल्याशिवाय, राष्ट्रीय ध्येयाविषयीं सक्रिय सहानुभूति अंतःकरणांत बिंबल्याशिवाय, प्रत्येक हिंदूच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण राष्ट्रीयत्वांत लय

पावल्याशिवाय, प्रत्येक हिंदु हिंदुस्थान झाल्याविना, आर्यसंस्कृतीचा अभ्युदय कोणालाही करतां येणार नाहीं.

(इ) दुर्बलता नाहींशी करणें.

हीं सर्व, राष्ट्रीय संहति आणि राष्ट्रीयत्वाची घटना घडवून आणतील.

१८ आज सर्व राष्ट्रभर शारिरिक आणि मानसिक दौर्बल्य दिसत आहे. आज लोखंडासारखे स्नायू आणि अचाट शरीरसंपन्नता यांची जरूर आहे. बलवान् शरीरांत वसत असलेल्या प्रचंड महत्त्वाकांक्षेला अप्रतिहत इच्छाशक्तीची जोड पाहिजे आहे. असल्या शरीरबलापुढें, असल्या शक्तिसंपन्न राष्ट्रीय विराटपुरुषापुढें केवढ्याही राक्षसी शक्ती हतबल होतात. असलाच राष्ट्रीय देह सृष्टींतील चमत्कृती व रहस्यें उलगडूं शकतो. पाताळाच्या आणि महासागराच्या तळावर धडक्या मारून किंवा वेळ पडल्यास अक्राळ स्वरूपात्मक काळाच्या बरोबर दोन हात करूनही वाटेल त्या प्रचंड महत्त्वाकांक्षा असल्याच राष्ट्राकडून पुऱ्या होतात. हिंदराष्ट्र इतकें प्रचंड शक्तिसंपन्न तेव्हांच होईल, दुर्बल हिंदुस्थान इतका सामर्थ्यवान् तेव्हांच होईल कीं, जेव्हां अद्वैतभाव राष्ट्रीयत्वास पोहोंचेल प्रत्येक हिंदुमात्राचें अंतःकरण राष्ट्रीय भावनांनीं, अद्वैततत्त्वानें ओतप्रोत होईल व राष्ट्रांतून द्वैताचें समूळ उच्चाटन होईल.

१९ उपनिषदांतर्गत सत्यतत्त्वें तुमच्यापुढें आदर्शवत् आहेत. त्यांचें आकलन करा. तीं तत्त्वें आमरणांत पाळा. म्हणजे भारताचा उद्धार पुढल्याच क्षणीं झालेला तुम्हांस दिसेल.

२० मी तुम्हांस त्रिवार सांगतों कीं, आज राष्ट्रीय दौर्बल्याचा नाश करून शक्ति कमवा. मानसिक व शारिरीक शक्तीची आवश्यकता आहे. सर्वांगीण सामर्थ्य संपादन करा. सर्व उपनिषदें हीं शक्तीची खाण आहेत. उपनिषदें हीं शक्तिस्वरूप आहेत. विश्वाला चैतन्य देऊन पुनरुज्जीवित करण्याचें सामर्थ्य उपनिषदांत (उपनिषदांतर्गत ज्ञानवल्लींत) आहे. उपनिषदें विश्वाला खडबडून जागें करीत आहेत. उपनिषदांनीं फंकिलेली तुतारी दुर्बलांना चैतन्य देत आहे. दु:खी जीवांना सुखाचा वारा घालीत, संकटांनीं जर्जर झालेल्यांची मुक्तता करीत, मागासलेल्यांना पुढचा मार्ग दाखवीत ' आत्मानं उद्धरेत् ' 'आत्मानं नावसादयेत् ' असा आत्मोद्धाराचा डंका गर्जवीत आहे. आपल्या पायावर उभे राहून आत्मशक्तीच्या जोरावर आत्मोद्धार करण्याचा मंत्र सांगत आहे. स्वातंत्र्य—शारिरिक स्वतंत्र, राष्ट्रीय स्वातंत्र्य, आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवून मुक्त व्हा हीच उपनिषदांची शिकवण प्रतिध्वनित झालेली तुम्हांला प्रत्येक शब्दांत ऐकूं येईल.

२१ एखाद्या बॉंबगोळ्याप्रमाणें तुमच्या आज्ञानांधकारांत स्वतःच्या स्फोटानें प्रकाश पाडून मायापाशाचें मोहजाल धुडकावून धडाडणारा असा एखादा प्रचंड ध्वनि जर उपनिषदांतून सारखा घुमत असलेला तुम्हाला ऐकूं येत असेल तर तो ध्वनि ' अभय व्हा, ' ' मुक्ति मिळवा ' हाच होय. हा एकच नाद साऱ्या शब्दब्रम्हांत दुमदुमत असलेला तेथें दिसेल. आणि जर कोणच्या धर्माचें अभ्युत्थान आज करावयाचें असेल, जर कोणच्या धर्माचा आज प्रसार करावयाचा असेल तर तो धर्म म्हणजे निर्भयता हा होय. जीवन्मुक्तावस्था—विदेहावस्था—हीच परमोच्च स्वतंत्रता आणि हाच धर्म आज विश्वभर पसरला पाहिजे.

२२ उठा, जागे व्हा. मनोदौर्बल्याच्या झोंपेंतून जागे व्हा. कोणताही जीवात्मा जगांत दुर्बल नाहीं. आत्मा हा अनाद्यनंत, सर्वभावी, सर्वव्यापी आणि सर्वशक्तिमान् आहे. ईश्वरी तेजाचा अंश प्रत्येक जीवन्मात्रांत आहेच आहे. म्हणून त्या आत्मतत्त्वासह जागे व्हा. आत्मतत्त्वाचा जयजयकार करा. आणि अंत:स्थ ईश्वरांश जाहीर करा. हृत्कमलस्थ परमेश्वराला जागृत करा. त्याला विसरूं नका. आज हिंदु-समाजावर पराकाष्ठेचें आलस्य, कमालीचें दौर्बल्य आणि आत्यंतिक मोहवशता यांचें दडपण पडलें आहे. हिंदतरुणांनीं हें मायापटल दूर करून जीवन्मुक्त व्हा. जितेंद्रिय व्हा.

२३ आत्मोद्धार करा. स्वत:ला ज्ञानसंपन्न करा. आत्मज्ञानी व्हा. आणि प्रत्येकाला त्याच्या स्वस्वरूपाची, सत्यस्वरूपाची ओळख पटवून निद्रावश आत्म्याला जागें कसें करतां येईल, जेणेंकरून आत्मज्योत, विझती ज्योत तेवत राहील, मार्गावरील अंधार दूर होईल अशी काळजी घ्या. आत्मतेजाचा स्वयंस्फूर्तीनें अंत:करणांत प्रकाश पडला म्हणजे त्या स्वयंभू स्फूर्तीनें सामर्थ्य उत्पन्न होईल, वैभवसंपन्न व्हाल, सुजनत्वास पावाल, पवित्र व्हाल, फार काय जगांत जें जें असेल तें तें साध्य होईल. केवळ आत्मजागृतीनेंच जगांत जें जें चांगलें म्हणून आहे त्याचे तुम्ही स्वयंभू अधिष्ठाते व्हाल. म्हणून,

उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्यवरान्यबोधत।
उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्।

२४. '**सोऽहं**'. मी परमेश्वरस्वरूप आहें. '**शिवोऽहं शिवोऽहं शिवः केवलोऽहं**' या आत्मस्वरूपाची नेहमीं जाणीव ठेवा. '**सोऽहं**' ही

जागृतीची नौबत गर्जना करितांच, ही आत्मज्योत उद्दीपित होतांच अंतःकरणांतील अज्ञानांधकार पाताळांत दडी मारील. आत्मज्ञानाचा लखलखाट होऊन हृत्कमल विकास पावेल. या शब्दोच्चारानें, या नादब्रम्हानेंच अंतःकरणांत अतुल स्फूर्ति उत्पन्न होईल. सुषुप्तावस्थेंत असलेली ईश्वरी शक्ति जागृत होईल, अंतःस्थ चैतन्य जागृत होईल. अज्ञानरुपी अंगार ' **सोऽहं** ' या शब्दोच्छ्वासानें झडून अंतःस्थ चैतन्याग्नि प्रज्वलित होईल.

२५ गतकालचें सिंहावलोकन करा. अगदीं प्राचीनतम युगापर्यंत दृष्टि फेंका. ज्या कालीं तुमचे पूज्य पूर्वज सशक्त, चैतन्यपूर्ण आणि आत्मनिष्ठावान् होते ज्यांची कृतीच काय पण प्रत्येक शब्द चैतन्यपूर्ण होता, शापवचनानें विश्वाला भस्म करून टाकण्याइतकें त्यांचें तपोबल होतें त्या कालापर्यंत दृष्टी फेंका. आणि सिंहावलोकन करून या दौर्बल्याचें सीमोल्लंघन करा. पुन्हां एकदां तें सामर्थ्य प्राप्त करून घ्या. जितेंद्रियत्वाचा अभ्यास करा. ब्रह्मचर्याश्रमाचें एकांतिक आचरण करा. आणि अशी जीवन्मुक्तावस्था हीच एक भारतांतील आयुःस्थिति आहे. या जीवनमुक्तावस्थेखेरीज कोणासही भारतांत जिवंतपणें जगतांच येणार नाहीं.

२६ मी असें प्रतिपादन करतों कीं हिंदीसमाजाचा उद्धार करण्यासाठीं कोणत्याही धर्मतत्त्वांचा विध्वंस करण्याची जरूर नाहीं. कोणच्याही धर्मांच्या नाशावर हिंदसमाजाची उभारणी नाहीं. हिंदसमाजाचा अभ्युदय इतर धर्मांच्या विध्वंसावर उभारण्याइतका राक्षसी कोटींतला नाहीं. आज हिंदसमाजाची जी निकृष्टावस्था झालेली दिसत आहे

त्याचें कारण धर्मांत कांहीं वैगुण्य आहे असें मुळींच नसून धर्माचा अवलंब सोडल्यामुळें हिंदसमाज दीनावस्थेस गेला आहे. समाज आणि धर्म यांची ताटातूट झाली आहे. माझ्या सांगण्याचें प्रत्येक अक्षर सत्याला धरून आहे हें आपल्या प्राचीन ग्रंथांवरून सहज सिद्ध करतां येईल. माझें सांगणें हेंच आहे कीं स्वतःच्या अवनतीचें खापर धर्मावर फोडूं नका. आणि हा सुटलेला आलंब पुन्हां धरण्यासाठीं आपण आपलीं आयुष्यें खर्च केलीं पाहिजेत. समाजाचें वळण बदलण्यासाठीं आपण झटलें पाहिजे. कारण धर्म हें जगाचें धारणातत्त्व आहे.

३

सामाजिक सुधारणा—त्यांची पद्धति.

जर तुम्हांला खरोखर समाजसुधारणा करावयाची असेल तर तुम्हांला तीन अत्यावश्यक गोष्टी संपादिल्या पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे कळकळ. तुमच्या देशबांधवांविषयीं तुम्हांला सहानुभूति वाटते का? जगांतील सुखदुःखांविषयीं आणि अज्ञानमूलक समजुतींविषयीं आणि वेडगळ रूढींविषयीं तुम्हीं अंतःकरणपूर्वक विचार करतां का? विश्वबंधुत्वाची भावना तुमच्या अंतःकरणांत वसत आहे का? ही एकच भावना तुमचें विशाल अंतःकरण व्यापून टाकते का? तुमच्या नाडीच्या ठोक्याबरोबर या एकाच बंधुप्रेमाचा ध्वनि निघतो आहे का? सर्व शरीरभर प्रत्येक रोमारोमांत ही विश्वबंधुत्वाची परमोच्च प्रेमळ भावना खिळली आहे का? त्या सहानुभूतीच्या भावनेनें तुम्ही ओतप्रोत

भरला आहांत का? जर या भावनेनेंच तुमचे सर्व आचारविचार व्यापून टाकले असतील तर ती केवळ पहिली पायरी आहे. त्या सर्वव्यापी भावनेला प्रत्यक्ष योजनात्मक स्वरूप देण्याविषयीं तुम्ही विचार केला पाहिजे.समाजाच्या अवनतीला तरणोपाय शोधून काढला पाहिजे. जुन्या पिढीतील धार्मिक, सामाजिक व्यावहारिक समजुती वेडगळ असतील कदाचित् परंतु त्या सुद्धां सत्यावरच उभारलेल्या आहेत. त्या समजुतीच्या अंतरंगांत हेतू सत्यमयच आहेत; हें तुम्हांला विसरून चालायचें नाहीं. कालवशात् त्या सत्यावर, त्या सुवर्णावर, जरी अज्ञानमलाचें पटल चढलें असलें, भ्रांतीचीं पुटें चढलीं असलीं तरी तीं केवळ पुटेंच आहेत. त्याच्या सत्यत्वास मुळींच बाध आलेला नाहीं. तेव्हां त्या सत्यत्वाचा एक अंशही नाश न पावूं देतां तीं अज्ञानपुटें कशीं काढतां येतील याविषयीं तुम्ही कांहीं योजना केली आहे काय? सुवर्णाचा रजही न जळूं देतां तें शुद्ध करण्याचा उपाय शोधलांत? [समाजवृक्षाला अज्ञानमूलक कल्पनांची कीड लागली आहे, पण त्या किडीनें, वृक्षमूलाचा (ज्या सिद्ध सनातन तत्त्वावर समाजाची उभारणा झाली त्या तत्वाचा) नाश केला नाहीं तोंच वृक्षाच्या मूलांस धक्का न लावतां, समाजाच्या अंतःकरणास धक्का न लावतां, कीड तेवढी नाहींशी होऊन वृक्ष तगला पाहिजे.] याखेरीज आणखी एक गोष्ट आवश्यक आहे. तुमच्या ध्येयाची रूपरेखा काय आहे? तुमच्या अंतःकरणाची अशी बालंबाल खात्री आहे काय कीं, सुवर्णराशीच्या लोभानें किंवा कीर्तीच्या हांवेनें किंवा अधिकाराच्या इच्छेनें तुम्ही या कार्यास प्रवृत्त झालां नाहीं किंवा आरंभिलेल्या कार्यापासून परावृत्तही केले जाणार नाहीं? तुमचें

समाजसुधारणेचें ध्येय या कसल्याही लोभानें मलीन होणारें नसून अत्यंत पवित्र व समाजसेवा निर्हेतुक असली पाहिजे.

२ व्यासपीठावरून वक्तृत्वपूर्ण भाषणें आजपर्यंत हजारों वक्त्यांनीं केलीं आहेत. लाखों उपदेशकांनीं सौजन्यशील हिंदुजातीवर आणि हिंदुधर्मावर शिव्यांचा भडिमार केला, त्यांच्या दोषाबद्दल त्यांच्यावर गहजब केला. त्यांचीं अंतःकरणें दुखवलीं आहेत. "तुम्ही संपूर्ण अवनतीला गेला आहांत आणि तुमच्या चुकांमुळेंच तुमचा पूर्णनाश होणार." असल्या शापांचेही उपाय झाले तरी कांहींही फायदेशीर परिणाम झाला नाहीं. समाजसुधारणेचा हेतु अंशतःही पुरा झाला नाहीं. आणि याचें कारण दुसरें काय असणार ? त्या कारणाचा शोध लावणें फारसें कठीण नाहीं. समाजावर शिव्यांचा वर्षाव हेंच त्याचें कारण. समाजावर कोरडे ओढून, त्यांच्यावर गहजब करून समाजसुधारणा होत नसते. समाजाची अवधारणा करून कधींच तो उन्नतीस येणार नाहीं. कोणाच्या अंतराला धक्का लावूं नका. अत्यंत खेदाची गोष्ट आहे कीं, आधुनिक समाजसुधारकांचे मार्ग, सुधारणेच्या चळवळी, अंधानुकरणानें पाश्चात्य वळणावर जाऊन पाश्चात्य साधनांचा अवलंब करीत आहेत. परंतु पाश्चात्य कार्यपद्धतीनें आर्यसमाजसुधारणा केव्हांही होणार नाही. या अंधानुकरणानें उन्नतीच्या ऐवजीं अवनति मात्र होत आहे. हा परपुष्टपणा आत्मघात करणारा आहे.

३ असल्या 'सुधारणे'च्या ठिकाणीं माझा मुळींच विश्वास नाहीं. उन्नतीप्रत नेणारा सुधारणेचा मार्ग असेल तरच माझा त्यावर विश्वास

आहे. ' मी ' या व्यक्तीला परमेश्वर समजून उपदेश करण्याचें साहस माझ्याच्यानें कधींही होणार नाहीं. स्वतःकडे विश्वाचें नियंत्रणत्व घेऊन समाजाला या मार्गानें जा आणि या मार्गानें जाऊं नका असा अधिकारवाणीनें उपदेश करण्याचें अधिकारित्व मी कधींच करूं शकणार नाहीं. माझ्या मनुष्यत्वाला ' ईश्वरत्व ' समजण्याचा अमानुषपणा आणि अकृतज्ञ विचार मी कधींच करणार नाहीं. तो माझा अधिकारही नाहीं.

४ माझें ध्येय म्हणजे राष्ट्रीय मार्गावरील प्रगति, राष्ट्राची सर्वांगीण उन्नति, राष्ट्रीय भावनांची व्यापकता हेंच होय.

९ मानवी समाज ज्या अवस्थेप्रत गेला आहे, ज्या ठिकाणीं आज उभा आहे तेथूनच कार्यास आरंभ करा. त्या भूमीकेवरून समाजाला उन्नतीचा झोला द्या [पडक्या इमारती उकरण्यांत सामर्थ्याचा अपव्यय करूं नका.] तुम्ही आणि मी काय करूं शकणार आहोंत ? एकाद्या अर्भकाला तरी सुसंस्कृत व सुशिक्षित करण्याइतकें तरी सामर्थ्य आपल्यांत आहे काय ? कदापि नाहीं. तें अर्भक स्वतःचेंच अध्यापक असतें. त्याची आत्मशक्ति त्याची वाढ करीत असते. तुमचें कार्य फक्त बाह्यसंरक्षणात्मकच असतें. त्याच्या वाढीला वाव देण्यासाठीं वाटेवरील अडथळे दूर करण्याचेंच कार्य तुम्ही करीत असतां. एकादा वृक्ष बीजस्वरूपांतून ' वृक्ष ' स्वरूपाप्रत जात असतो पण त्याची वाढ मानवी शक्तीच्या आटोक्याबाहेर असते. त्याच्या वाढीस सर्वात्मक ईश्वरी शक्तीच कारणीभूत होते. तुम्ही त्याच्या वाढीस फक्त दुय्यम सहाय्य करीत असतां. तुमचें कर्तव्य म्हणजे त्या वृक्षाला संरक्षक कुंपण बांधून कोणच्याही प्राण्याच्या भक्ष्यस्थानीं तें पडत नाहीं येवढें पहाण्याचेंच

होय. त्याच्या ठिकाणीं बीजरूपानें वास करणारी ईश्वरी शक्ति त्याला वाढवीत असते. तुम्ही फक्त संरक्षक आणि प्रतिपालक. उत्पादकत्वाचा आणि जीवनशक्तीचा मान त्या सृष्टिकर्त्याचाच.

६ राष्ट्रीय जीवनाचा भरपूर पुरवठा करा. जीवनाला आवश्यक अशा वस्तू पुरवून राष्ट्राला जीवंत ठेवा. जीवनाच्या पुरवठ्यानंतर राष्ट्राची वाढ आपोआप होईल. अभ्युदय स्वयंभू आहे. मानवी प्रयत्न हे त्याच्या स्वयंभावास सहाय्यक होतात. कोणतीही मानवी शक्ती राष्ट्राच्या वाढीचें, समष्टीच्या स्वयंभावाचें नियंत्रण करूं शकणार नाहीं.

७ अवनतीप्रत पोंचलेल्या समाजाला शिव्या देऊन उपमर्द करून अंतःकरणें दुखवूं नका. झाडाची कीड कुऱ्हाडीच्या घावानें निघत नसते. जुन्या पिढींतील अज्ञानमूलक समजुतीच्या लोकांना, अगदीं अडाणी आणि वेडगळ कल्पना धरून बसलेल्या दुराग्रही लोकांना सुद्धां त्यांच्या अज्ञानाबद्दल तिरस्कारूं नका. त्यांची अवधारणा करूं नका. कारण त्यांनीं सुद्धां गतकालांतील कांहीं तरी सत्यें शोधून काढलीं आहेत. कांहीं तरी सत्यांश त्यांच्या भावनांत वसत आहे. त्या सत्यांशाचें जतन केल्याबद्दल तुम्ही त्यांचे ऋणी आहांत.

८ जगांत असा एकही देश नाहीं व एकही समाज नाहीं, कीं ज्यांतील संस्थांचीं ध्येयें, ज्यांचीं राष्ट्रीय ध्येयें व उद्दिष्ट कार्यें हिंदुस्थानांतील संस्थांपेक्षां ज्यास्त उच्च आणि पवित्र आहेत. ही भारताची थोरवी लक्ष्यांत ठेवा.

९ आज जे आचार मूर्तिमंत नाशकारकच दिसत आहेत, तेच आचार भूतकालांत जीवनास मदत करीत होते. आज ज्या वेडगळ सम-

जुती समाजाच्या नाशास कारणीभूत झाल्याशा वाटतात त्याच समजुतींवर समाज भूतकालापासून वर्तमानकालापर्यंत जिवंत राहिला आहे. म्हणून त्या समजुतींतील वेडगळ भ्रामकपणा दूर करावयाचा मार्ग त्यांच्या अनुयायांवर शिव्या शापांचा वर्षाव करणें हा नसून, त्याच कल्पनांतील सत्यत्व समाजाचें जीवन आहे याबद्दल कृतज्ञ होणें हाच आहे. आज हिंदसमाज जिवंत तरी ठेवण्याबद्दल, आर्यसंस्कृतीचे आचार विचार जिवंत राखण्याबद्दल—या त्यांच्या पवित्र कार्याबद्दल—त्यांचे आपण ऋणी आहोंत.

१० राष्ट्राचा उपमर्द करणारे, मातृभूमीची अवधारिणा करणारे शब्दच नाहींत. मी मागील पिढीला येवढेंच सांगेन कीं तुम्ही आपली कामगिरी उत्तम रीतीनें बजावलीत. तुमच्या काळच्या इतिहासाचा प्रवाह तुम्ही वर्तमानकालापर्यंत आणून पोंचविण्यांत तुम्ही अत्यंत पवित्र कार्य बजावलें आहे. फक्त आतां वर्तमानकाळीं त्यापेक्षांही उज्ज्वल कार्य करण्यासाठीं झटून प्रयत्न करा.

११ प्रत्येक व्यक्तीला आत्मोद्धार करावयाचा आहे. आत्मोद्धाराशिवाय तरणोपाय नाहीं. आणि हीच स्थिति प्रत्येक राष्ट्राची आहे. राष्ट्रोद्धाराचें कार्य आत्मोद्धाराच्याच तत्त्वावर केलें पाहिजे. जोंपर्यंत उच्च ध्येयानुगामी संस्था निघाल्या नाहींत तोंपर्यंत जुन्या संस्थांचा बींमोड करणें घातुक होईल. धर्महीन असण्यापेक्षां वेडगळ धर्म बरा. उन्नति, वाढ ही नेहमीं पायरीपायरीनेंच होत असते. म्हणून जोंपर्यंत नव्या चालीरीती सुरू झाल्या नाहींत, समाजसुधारणेचे नवे उपाय योजनेंतून घटनेंत आले नाहींत तोंपर्यंत जुन्या रीती व जुने विचार सोडतां कामा नयेत. नव्या मिळविण्यासाठीं जुन्यांचेंच अनुकरण केलें पाहिजे.

१२ हिंदुस्थानांत सामाजिक सुधारणांचा उपक्रम अशा रीतीनें केला गेला पाहिजे कीं नव्या पद्धतींच्या योगानें किती आध्यात्मिक तेज समाजांत वाढत आहे हें स्पष्ट दिसलें पाहिजे. नव्या पद्धतींचा हितकर परिणाम त्यांचा उपक्रम होत असतांनाच पटत जाईल अशाच मार्गानें समाजसुधारणांस सुरवात केली पाहिजे. नव्या पद्धती हितकर आहेत असा विश्वास समाजांत उत्पन्न झाला पाहिजे. आणि राजकारणाचीं तत्त्वेंसुद्धां त्यायोगें राष्ट्राच्या आध्यात्मिक तेजाची कशी वाढ होईल, राष्ट्रांत राजकारणाच्या योगानें कसा जिवंतपणा येईल हें स्पष्ट दाखविलें जाईल अशा रीतीनें उपदेशिलीं पाहिजेत. ज्याच्या योगानें होणारी वाढ व येणारें सामर्थ्य राष्ट्रास जाणवूं लागेल अशाच मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

१३ ' सामाजिक-सुधारणा ' म्हणून ज्याला हल्लीं जग म्हणत आहे त्याच्याशीं संबंधही ठेवूं नका. कारण आध्यात्मिक सुधारणा प्रथम झाल्याशिवाय कोणतीहि सुधारणा होत नाहीं हें जग विसरत आहे हें लक्ष्यांत ठेवा.

१४ प्रत्येक गोष्टीच्या अंतःस्वरूपाचा ठाव काढा. कोणत्याही कार्याचा उगम कोठून आहे याचा विचार करा. प्रत्येक कार्याच्या उगमाचा ठाव काढल्याशिवाय राहूं नका. तीच खरी सामाजिक सुधारणा होय. अंतःकरणांत चैतन्याग्नि उद्दीपित करा. सर्व कृतींच्या उगमस्थानाशींच नवजीवनाचा वर्षाव करा. हृदयस्थ चैतन्याग्नि जोरानें भडकला कीं प्रत्येक भारतपुत्राचें अंतःकरण राष्ट्राएवढें व्यापक होईल.

त्याच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा राष्ट्राएवढ्या मोठ्या होतील. व्यक्तित्वाचा विसर पडून प्रत्येक आर्य आर्यावर्त बनेल.

१५ ओठांची चळवळ बंद करा. वाचाळता **एकदम पुरे**. आपलीं अंतःकरणें खुलीं करा. आपल्या मातृभूमीचा आणि सर्व जगाचा उद्धार करण्याचें पवित्र आणि महत्त्वाचें कार्य तुमच्या प्रत्येकाच्या खांद्यावर आहे अशा भावनेनें कार्य करा. राष्ट्रोद्धार आणि विश्वोद्धार हाच अत्मोद्धार अशी जाणीव ठेवून कार्य करा. हिंददेवीच्या विराटस्वरूपांत व्यक्तित्वासह विलीन व्हा.

१६ रोगाला जागच्या जागीं दाबून टाकणें ही माझी औषधी योजना नव्हे; हें रोगाचें निदानही नाहीं, तर रोगाचीं पाळेंमुळें उपटून फेंकून देणें व देह रोगमुक्त करणें हें माझें निदान आहे. रोग जागच्या जागीं जिरवणें हें रोगयुक्त होण्यासारखेंच आहे.

१७ समाजांत होणारे श्रेयस्कर फरक, सामाजिक स्वरूपांत होणारी श्रेयस्कर उत्क्रांति ही समाजांतर्गत आध्यात्मिक बलाचें दृश्य फल आहे. जर हें आध्यात्मिक तेज जास्त प्रखर आणि सुसंगत असेल तर समाज सुध्दां त्या तेजविभवानुसार आत्मोध्दाराचा मार्ग त्वरेनें आक्रमील. तो आध्यात्मिक दीप जितका प्रकाशमान असेल तितका समाजोध्दाराचा मार्ग सुलभ व बिनधोक होईल.

४

शिक्षण—सामाजिक संकटांचा त्रैलोक्यचिंतामणि.

राष्ट्राच्या आध्यात्मिक आणि व्यावहारिक शिक्षणावर आमचाच अधिकार पाहिजे. तुम्हांस याचा अर्थ समजला काय ? असल्या सर्वांगीण शिक्षणासाठीं तुम्हांला ध्यानीं मनीं स्वप्नीं ध्यास लागला पाहिजे. व्याख्यानांतून असल्याच शिक्षणाचा प्रसार तुम्ही केला पाहिजे. आणि असलेंच शिक्षण राष्ट्रास मिळवून देण्यासाठीं तुम्ही अहर्निश झटलें पाहिजे. जोंपर्यंत समाजाचीं सर्व अंगें सुशिक्षित व सुसंस्कृत करणारें शिक्षण समाजास मिळत नाहीं, जोंपर्यंत आध्यात्मिक आणि आधिभौतिक भावनांचा मेळ ज्या शिक्षणपद्धतींत आहे असें शिक्षण समाजांत सुरू झालें नाहीं तोंपर्यंत समाजसुधारणा होणें अशक्य आहे. कोणत्याही ज्ञातीस किंवा राष्ट्रास अशा सर्वांगीण शिक्षणपध्दतीशिवाय तरणोपाय नाहीं.

२ राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या घरीं दारीं उदात्त भावनांचें वातावरण उत्पन्न करून, त्यांना स्वतःच्या नशिबाचा निकाल कर्मयोगानें लावून घेण्याचें सामर्थ्य उत्पन्न करणारी एक प्रचंड तांत्रिक शक्ति निर्माण करणें हीच माझ्या आयुष्याची महत्त्वाकांक्षा आहे. आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाच्या व गहन प्रश्नांवर आपल्या पूर्वजांचें व इतर राष्ट्रांचे विचार काय आहेत व होते हें त्यांना कळलें पाहिजे. वर्तमान काळीं जग काय करीत आहे हें त्यांना स्पष्ट दिसूं द्या. आणि मग जगाच्या विचारप्रवाहाच्या सूक्ष्म निरीक्षणानंतर स्वतःचा मार्ग त्यांना ठरवूं द्या. रसायनांची

सिद्धता करून त्यांचें एकीकरण करणें येवढेंच आपलें कार्य. मग त्या रसायनांचें संघटित स्वरूप करणें (स्फटिकासारखे कांचमाणि तयार करण्याचें) निसर्गाचें कार्य निसर्गनियमानुसार निसर्गतःच होईल. भावनारसांचें मिश्रण करून ठेवा कीं, त्या भावनाभावनांचा मेळ बसतांच, हृदयां-हृदयांची ओळख होतांच त्यांचें संघटन आपोआप होईल. प्रत्येक हिंदमात्राचें हृदय भावनांच्या रसायनानें एक होऊं द्या. म्हणजे इच्छाशक्तीची संहति त्वरित घडून येईल.

३ अर्थात् स्त्री-वर्गापुढें बरेचसे गहन प्रश्न असले तरी त्यांपैकीं एकही इतका गहन नाहीं कीं, जो शिक्षणाच्या चमत्कृतिजन्य संस्कारानेंही सुटण्यासारखा नाहीं. शिक्षण ही एक अशी अजब शक्ति आहे कीं, त्याचा संस्कार होतांच वाटेल तेवढीं गहन कोडीं आपोआप उलगडूं लागतात.

आधुनिक शिक्षणपद्धति.

४ ज्या शिक्षणपद्धतीला अनुसरून हल्लीं तुम्हांला शिक्षण मिळत आहे त्या पद्धतींत थोडेसे कांहीं गुण आहेत. पण ते गुण त्या पद्धतींतील घातुक परिणामांच्या मानानें इतके अल्प आहेत कीं, त्या दोषांच्या दडपणाखालीं त्या गुणांचा विध्वंस होत आहे. त्या शिक्षणांत मर्दानीपणा उत्पन्न करण्याचें सामर्थ्य मुळींच नसून, तें नेभळट बनविणारें, अभावात्मक, मारक आणि कमकुवत असें आहे. जें शिक्षण अंतःकरणाचा विकास करण्याऐवजीं विकास थांबवून दौर्बल्य उत्पन्न करतें तें शिक्षण प्रत्यक्ष मृत्यूपेक्षांही भयंकर विघातक होय. आज प्रत्येक हिंदतरुणाला शाळागृहांत प्रवेश करतांच

पहिला 'ओनामा' कोणचा मिळत असेल तर त्याचे बापजादे मूर्ख आणि अडाणी होते, आणि त्याचे आजेपणजे, पूर्वज तर माथेफिरू आणि दुराग्रही होते हा होय. हे दोन धडे पक्के रुजल्यानंतर त्याचे उपदेशक सर्व दांभिक ढोंगी आहेत ही तिसरी शिकवण त्याला येऊं लागते. इतकी तयारी झाली म्हणजे प्राचीन पुराणें, वेदकालीन ग्रंथ असत्यमय आणि असंभाव्य अशा भरमसाट कल्पनांचीं भारुडें आहेत हा चौथा पाठ लवकरच त्याच्या चित्तांत ठसविला जातो. या चारी पाठांचें अध्ययन हाडींमासीं खिळण्याइतकें होईपर्यंत तो हिंदयुवक निस्तेज, निर्जीव, संस्कृतीहीन, ज्ञातिभ्रष्ट अस। निरीश्वरवादाभिमानी सोळा वर्षांचा हिंदतरुण होतो. राष्ट्रांचा आधारस्तंभ म्हणून त्याची गणना केली जाते.

९ केवढी ही साधुवृत्ति ! काय अलौकिक औदार्य आणि नेकी ! विश्वविद्यालयांतून पदवी मिळविण्यासाठीं केवढा हा खटाटोप आणि केवढा व्याप. आणि पदवीग्रहणानंतर ही सर्व ज्ञानलालसा, सर्व खटाटोप, महत्त्वाकांक्षा जागच्याजागींच विलयास जातात. इतका त्रास घेऊन शरीराचे रक्ताचें पाणी करून जो ज्ञानसंग्रह होतो तो एकढाच कीं आपल्या चालीरीती, संप्रदाय, धर्म सर्व मूर्खत्वाचे आणि रानटी आहेत आणि पाश्चात्यांचे सर्व आचारविचार अगदीं अणुरेणूचा व्यापारसुद्धां स्तुत्य, अनुकरणीय, सर्वमान्य व वंदनीय आहेत ! इतक्या प्रचंड ज्ञानसंग्रहाची जोड मिळवूनसुद्धां त्यांना स्वतःची उपासमार टाळतां येऊं नये इतके ते पंगू व परावलंबी बनतात. या अशा उच्च शिक्षणाचा विध्वंस

झाला पाहिजे. या अशा उच्च शिक्षणपद्धतीचा नायनाट झाला, बींमोड झाला तर भारताचें काय मोठें प्रचंड नुकसान होणार आहे ? उलट या शिक्षणापेक्षां लोकांना औद्योगिक शिक्षण मिळालें तर अत्यंत हितकर होणार आहे; कारण त्यायोगें त्यांना पोटभर अन्न तरी मिळेल व कामाची ददात पडणार नाहीं. बेकारी कमी होऊन हा नोकरीसाठीं होणारा टाहो कमी होईल ! सर्वस्वाचा व्यय करून सुद्धां सेवावृत्तीसाठीं टाहो फोडण्याचा केविलवाणा प्रसंग खास टळेल.

६ गाढवाला घोडा बनवण्यासाठीं एका मूर्खानें लोकांच्या चिथावणीच्या नादीं लागून गाढवाला मरेपर्यंत मारला. तसला प्रकार हल्लींच्या शिक्षण-पद्धतींत होत आहे. अशाच ध्येयाचें शिक्षण आज हिंदतरुणांना मिळत आहे. ती घातुक शिक्षणपद्धति एकदम बंद होणेंच अत्यंत हितकारक व अत्यावश्यक आहे.

खऱ्या शिक्षणाचा अर्थ.

७ ज्या शिक्षणाच्या योगानें मनुष्याचे ठिकाणीं असलेल्या पूर्णत्वाचें प्रकटीकरण होतें, नराचा नारायण होतो तेंच खरें तेजस्वी शिक्षण होय.

८ शिक्षण म्हणजे भाराभर माहितीचें मेंदूवर लादलेलें ज्ञानाचें ओझें नव्हे कीं जें ओझें सर्व आयुष्यभर डोक्यांत अर्धवट शहाण-पणाचा गोंधळ माजवून आयुष्याचा बोजवारा उडवतें. आज अशा शिक्षण-पद्धतीची जरूर आहे कीं जिच्यायोगें तुम्हीं कार्यक्षम आणि मर्द व्हाल व तुमच्या आयुष्यक्रमास सुसंगत घटना प्राप्त होईल. तुमच्या मनोवृत्तींचा हृदयंगम विकास होईल. तुमच्या ठिकाणीं असलेल्या सद्गुणांचा, सद्भा-वांचा पूर्णोदय होऊन सर्व भावनांचें एकीकरण होईल. तुम्ही आयुष्यभर

पांचच सत्यें शिकलांत, येवढे पांचच धडे गिरवलेत, या पांच तत्वांच्या नितांत अध्ययनानेंच तुमचें सर्व आयुष्य व्यापून टाकलें, तुमचा स्वभाव त्या पांचच तत्त्वांच्या पंचीकरणानें झाला, तर त्या तेवढ्याच अध्ययनानें सुद्धां, एकाद्या प्रचंड वाचनालयांतील सर्व ज्ञानाचा गड्डा डोक्यांत कोंबणाऱ्या विद्वानापेक्षां तुम्हीं जास्त सुशिक्षित आणि सुसंस्कृत व्हाल.

९ ज्यायोगें आयुष्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, आयुष्याचें अंतिम ध्येय सुलभ केलें जाईल, जीवितकलह यशस्वी होईल तेंच खरें उच्च शिक्षण होय. आयुष्याच्या उन्नतावस्थेंत ज्ञान वृध्दावस्थेस पोहोंचवणें हाच उच्च शिक्षणाचा खरा उपयोग आहे. आणि या एकाच विचारानें सुधारलेल्या जगांतील विद्वानांचें लक्ष्य वेधलें आहे. या एकाच प्रश्नाच्या सुलभ स्पष्टीकरणांत सर्व विद्वज्जनांचे मेंदू व्यापले आहेत. पण हाच प्रश्न हजारों वर्षांपूर्वीं अगदीं सुलभ पद्धतीनें आमच्या पूर्वजांनीं सोडविला होता. आर्यकालीन शिक्षणपद्धति तेजस्वी होती व त्याच शिक्षणपद्धतीच्या योगानें आर्यांचें ज्ञानतेज विकास पावलें होतें.

१० आज आपणास असें शिक्षण पाहिजे आहे कीं, ज्यायोगें अंतःकरणावर सुसंस्कार घडून आचरणास वळण लागेल, मानसिक शक्तीची वाढ होईल, बुद्धीचा विकास होईल आणि जें शिक्षण तुम्हांस पूर्ण स्वावलंबी व स्वयंप्रकाशी बनवील.

११ मनुष्यत्वास लायक करणें, नराचा नारायण करणें हेंच सर्व शिक्षणपध्दतीचें ध्येय असलें पाहिजे. पण या दृष्टीऐवजीं बाह्यांगेंच सुशिक्षित, सुशोभित करण्याचा (बहाणा करून) आपण प्रयत्न करीत आहांत.

अंतरंगच नसेल, अंतरंगावर कांहींही संस्कार झाले नसतील तर नुसत्या बाह्यांगाची छानछोकी व बडेजाव हीं कवडीमोल आणि प्रेताच्या शृंगाराइतकींच फोल आहेत.

तेजस्वी शिक्षणपद्धति.

१२ गुरुगृहीं राहून अध्ययन करणें आणि तसल्याच प्रकारच्या दुसऱ्या प्राचीन पद्धतीनें अध्ययन करणें अशा शिक्षणपद्धतीची आज गरज आहे. [आत्मविश्वास, श्रद्धा, ब्रम्हचर्य हेंच जीवितध्येय; या तत्त्वांचा विकास करणाऱ्या आणि पाश्चात्य आधिभौतिक ज्ञानाचा वेदांताशीं मेळ घालणाऱ्या शिक्षणपद्धतीची आज जरूर आहे.] शास्त्रीय ज्ञानाबरोबर आध्यात्मिक ज्ञानाचेंही अध्ययन झालें पाहिजे. ब्रह्मचर्याचें उज्वल जीवनध्येय डोळ्यांसमोर असलें पाहिजे आणि आत्मविश्वासात्मक श्रद्धा अंतःकरणांत उत्पन्न झाली पाहिजे.

१३ जेव्हां अध्यापकाच्या ठिकाणीं मी अध्यापक आहें व अध्यापन करीत आहें अशी भावना उत्पन्न होते, विद्यार्थ्यांच्या अंतःकरणांशीं एकरूप न होतां द्वैतभाव त्याच्या ठिकाणीं जागृत होतो तेव्हांच शैक्षणिक तत्त्वांचा विपर्यास होतो. वेदांत सुद्धां हेंच सांगतो कीं अर्भकावस्थेंत सुद्धां मनुष्याच्या ठिकाणीं पूर्ण ज्ञान असतें. फक्त त्या ज्ञानशक्तीला जागृत करण्याची आवश्यता असते. आणि ती अंतःस्थ ज्ञानज्योत प्रज्वलित करणें एवढेंच अध्यापकाचें मुख्य कार्य असतें. अंतःस्थ ज्ञानतेज उद्दीपित करून त्या तेजाच्या विनियोगाला योग्य दिशा लावणें, ज्ञानांकुराला वाढीस लावणें येवढेंच शिक्षकाचें कार्य, ती ज्ञानज्योत तेवत ठेवण्यास शिकाविणें हेंच शिक्षणाचें ध्येय.

आचार्यांकडून येवढ्याच उद्दीपनाच्या कार्याची आवश्यकता असते. तेवढें कार्य होतांच (राहिलेल्या) त्या ज्ञानतेजाच्या विकासाचें कार्य निसर्गतःच घडून येतें.

१४ एखादा वृक्ष उत्पन्न करणें हें जितकें अशक्य कोटींतील आहे तितकेंच एखाद्या बालकास शिकविणें हेंही मानवी कोटींच्या आटोक्याबाहेरचें आहे. तुम्ही करतां तें एवढेंच कीं त्या बालकाच्या विकासास मदत करतां. संरक्षणात्मक प्रतिक्रियाच फक्त आपणांकडून होत असते. प्रत्यक्ष विकासाचें कार्य अंतःस्थ चैतन्यानेंच होत असतें. वृक्षाप्रमाणें अर्भकाची वाढ हृदयस्थ परमेश्वरशक्ति–[प्रेरणा] ही करीतच असते. तुम्ही करूं शकतां तें फक्त विकासास दुय्यम सहाय्यच होय. विकासाच्या मार्गांत येणारे अडथळे दूर करून संरक्षण करणें एवढेंच मानवी साह्य त्या बालकाच्या विकासास सहायभूत होतें.

१५ आपणांस आपल्या देशाविषयीं आधिभौतिक आणि आध्यात्मिक असें पूर्ण ज्ञान आपल्याच गुरूकडून मिळालें पाहिजे. तें शिक्षण पूर्ण राष्ट्रीय पद्धतीचें सक्रिय विवेचनात्मक असें असलें पाहिजे.

१६ तुम्हांस जाणवतच असेल, आज जर प्रचलित शिक्षणांत कशाची उणीव असेल तर ती, परकीय नियंत्रणाशिवाय, आर्यज्ञानाच्या नानाविध शाखांचें आणि त्याबरोबरच आंग्लभाषा आणि पाश्चात्य शास्त्रांचें अध्ययन होईल अशा शिक्षणपध्दतीसाठीं आवश्यक अशी अध्ययनस्वातंत्र्याचीच होय. औद्योगिक शिक्षणाची व उद्योगधंद्याच्या अभिवृध्दीस मदत करणाऱ्या शिक्षणाची आज आवश्यकता आहे. कां कीं, त्यायोगें शिक्षित तरुण नोकरीसाठीं वणवण करीत न भटकतां स्वावलंबनानें उपजीविका करून

अभिमानानें जगूं शकतील. संकटास तोंड देण्याची तडफ त्यांच्यांत उत्पन्न होईल. स्वावलंबी जीवनानें त्यांचा आत्मविश्वास वृध्दिंगत होईल.

१७ ज्या सद्गुरूची चित्तवृत्ति अग्नीसारखी प्रज्वलित, उज्वल आणि नष्टसंदेह आत्मसाक्षात्कारी आहे, आणि जो दिव्यतम शैक्षणिक ध्येयाचें साक्षात् सगुण स्वरूपच आहे अशा सद्गुरूच्या सेवेंत आजन्म राहिलें पाहिजे.

१८ 'असत्यभाषण हें पाप आहे' या वाक्याच्या पारायणानें जसा कांहीं उपयोगच होत आहे ! उलट आत्मवंचनेचें पाप मात्र घडतें. तसेंच नुसतीं वेदांततत्त्वें तोंडपाठ असून तीं निष्फळ ठरतील. प्रत्येक छात्राला ब्रह्मचर्याश्रमाचें वळण लागलें पाहिजे. तो एकनिष्ठ ब्रह्मचारी झाला पाहिजे. आणि केवळ असल्या एकनिष्ठ व्रताचरणानें त्याच्या ठिकाणीं आत्मविश्वास, भक्ति, श्रद्धा आणि ब्रह्मवर्चस्वाचें पावित्र्य उत्पन्न होईल. ज्याच्या अंतःकरणावर सत्याचें उज्वल प्रतिबिंब उमटलें नाहीं, ज्याच्या मनोवृत्तींना सत्याचें वळण लागलें नाहीं, ज्याच्या अंतःकरणांत श्रद्धा नाहीं त्याच्या वाक्पांडित्याचा काय उपयोग ? श्रद्धा नसेल, तर त्या अपवित्र, असंस्कृत चित्तांत असत्याचा मोह उत्पन्न होणारच. ज्याच्या चित्तवृत्ती सत्यपथावर स्थिर नाहींत त्याची वाणी पुढल्याच क्षणीं असत्य भाषेनें भ्रष्ट होणार नाहीं हें कशावरून ?

१९ आजपर्यंत लहान मुलांनीं अध्ययन करण्यास योग्य असें एकही पुस्तक तयार झालें नाहीं. म्हणून ज्या पुस्तकांत रामायण, महाभारत, उपनिषदें इत्यादि ग्रंथांतील प्रसंग, कथा अगदीं सोप्या आणि सुरस भाषेंत सुबोधपध्दतीनें सांगितल्या असतील अशा पुस्तकांचा स्वभाषेंतून आणि इंग्लिश भाषेंतूनही संग्रह केला पाहिजे.

८

मागासलेल्या ज्ञातींचा उद्धार.

त्यांच्या मागासलेल्या स्थितीचीं कारणें.

मागासलेल्या ज्ञातींना तुच्छ लेखून आमच्या अमिरी पूर्वजांनीं बेदरकारपणें त्यांना इतक्या दीनावस्थेस नेलें आहे कीं, ते आज अगदीं असहाय व गरीब होऊन, त्यांच्यावर कित्येक शतकापासून होत असलेल्या जुलुमामुळें, 'आपण मनुष्यच होतों' या भावनेचा सुद्धां त्यांस विसर पडला आहे.

२ जंगल तोडण्यासारखीं आणि विहिरी खोदण्यासारखीं मजूरीचीं कामें त्यांना करावयास भाग पाडून इतक्या निष्ठुरतेनें त्यांना वागविण्यांत आलें कीं, जणूं काय 'मनुष्य' या नात्यानें आपणांस जनावरांपेक्षां काहीं विशेष हक्क आहेत याची त्यांस जाणीवही उरली नाहीं. आपण गुलामच आहोंत आणि परदास्यवृत्ति हेंच आपलें जीवन अशा भावना त्यांच्या हाडींमासीं खिळून गेल्या.

३ हिंदुधर्माखेरीज जगांतला कोणचाही धर्म मानवी प्राण्याचें श्रेष्ठत्व इतक्या उच्च स्वरांत प्रतिपादीत नाहीं. आणि दुर्दैवाची गोष्ट हीच कीं याबरोबरच हिंदुधर्माखेरीज एकही धर्म मागासलेल्या ज्ञातींवर इतक्या निर्दयपणानें जुल्म करीत नाहीं. हिंदुधर्माखेरीज एकही धर्म मागासलेल्या ज्ञातींच्या मनुष्यत्वाची इतक्या बेगुमानपणें पायमल्ली करीत नाहीं. आणि त्यांना अस्पृश्य ठरविण्यासारख्या अमानुष पध्दतीचें समर्थनही दुसरा कोणचाही धर्म करीत नाहीं.

४ हिंदुस्थानांतील त्या हीन दीन आणि ‘ पापी ’ म्हणून गणलेल्या लोकांना गणगोत, बंधु कोणी नाहीं. ते कितीही प्रयत्न करोत, त्यांचा उद्धार होणें शक्य नाहीं. त्यांना उन्नतीला जातांच येत नाहीं. दिवसें-दिवस ते अवनतीच्या खड्डयांतच खोल खोल गाडले जात आहेत. आणि पुढें आलेल्या समाजाचे प्रहार ते मुकाट्यानें सहन करीत आहेत. कोणत्या दिशेनें आणि कां प्रहार होत आहेत येवढेंही भान त्यांना न राहण्याइतके ते बेभान आणि हैराण झाले आहेत. ‘ आपणही माणसेंच आहोंत ’ ही जाणीवच त्यांची बुजली आणि त्याचा परिणाम म्हणजे पिढ्यानपिढ्या चालत आलेली वाढती गुलामगिरी हाच होय. (परंतु ज्याप्रमाणें खताचा नाश हा पिकाच्याही नाशास कारणीभूत होतो, त्याचप्रमाणें मागासलेल्या जातींवर श्रेष्ठ वर्णाच्या ज्ञातींची उभारणी होते. त्यांच्यावर होणारा जुलूम हा आपल्या पायावरच आपण हातानें कुऱ्हाड घालण्यासारखें आहे. त्यांची अवनति हीच देशाची अवनति. सर्व राष्ट्राला, सर्व ज्ञातींना बरोबर घेतल्याशिवाय ते अवनतीच्या खड्डयांत एकटेच गाडले जाणार नाहींत. पाया बसला कीं इमारत कोसळणारच हें लक्षांत ठेवा.)

‘ वर्णश्रेष्ठ ’ ज्ञातींवरील जबाबदारी.

५ आज हिंदुस्थानांत असे किती लोक आहेत कीं जे लाखों दीन दुबळ्यांच्या दु:खांबद्दल आणि हालअपेष्टांबद्दल हळहळत आहेत ? आपण तरी मनुष्यच आहात का ? जर असाल तर त्या हतभाग्यांसाठीं, त्यांच्या उद्धारार्थ आपण काय करीत आहांत ? त्यांना नुसता स्पर्शही करण्यास तुमची तयारी नाहीं. त्यांना

तुम्ही तुमच्यांतून बाहेर काढीत आहांत. तुमच्या विश्वबंधूंनाच अस्पृश्य मानणारे, मानवांचाच तिटकारा करणारे, तुम्ही तरी माणसेंच आहांत का ? आपणांस मानवी हृदय आहे का ?

६ पण मी दीन आहें आणि माझें प्रेमही दीनांवरच आहे. आपण त्यांना दीन म्हणतां. आपणांपैकीं किती जणांना त्या दीनांविषयीं कळकळ वाटते हें मी जाणतों. हिंदुस्थानांत केवढा हा प्रचंड भेदभाव ? केवढी प्रबल द्वैतभावना ? कोणाच्या मनांत कल्पना तरी येईल काय कीं, आज या आर्यावर्तांत सहा कोटी मानवी जीव दारिद्र्याच्या आणि अज्ञानाच्या पंकांत कायमचे रुतले आहेत ? त्यांतून वर येण्याचा मार्ग तरी कोणता ? त्यांच्याविषयीं दया तरी कोणाला येते आहे ? त्यांना उत्तेजक असा सहानुभूतीचा शब्द, दयेचा बिंदु किंवा ज्ञानाचा गंधही मिळत नाहीं. त्यांना हात कोण देणार ? त्यांच्या घरोघरीं, रानावनांत झोंपड्यांत हिंडून त्यांना ज्ञानामृत वाटीत त्यांच्यासाठीं कळकळीनें कार्य करण्यास कोण तयार होणार ?

७ ध्यानांत ठेवा, कीं, राष्ट्राचें राष्ट्रीयत्व, राष्ट्राचें चैतन्य, देशाचें जीवन रानावनांतल्या झोंपड्यांतूनच वसत असतें. राष्ट्राच्या जीवनाचा झरा दऱ्याखोऱ्यांत उगम पावतो. पण अरेरे ! त्यांच्याकडे कोणी ढुंकूनही पाहिलें नाहीं.

८ राष्ट्राचें संपन्नत्व, राष्ट्राचें महत्त्व त्या राष्ट्रांतील पुनर्विवाहित विधवांच्या व नवरदेवांच्या लठ्ठ संख्येवर अवलंबून नसतें. घरोघरीं पुनर्विवाह केवळ झाले म्हणजे राष्ट्राचा पुनरुध्दार कधींच होत नसतो. तर राष्ट्राचें उज्वल भवितव्य त्यांतील मागासलेल्या समाजाच्या सुस्थितीवरच अवलंबून असतें.

पिकाचें वैभव खताच्या चांगुलपणावर आणि शेताच्या मशागतीवरच अवलंबून असतें. आज त्या ‘ अस्पृश्य ’ मानलेल्या लाखों हिंदूंचा उध्दार करण्याची धमक तुमच्यांत आहे का ? त्यांचें हिरवलेलें व्यक्तित्व, लुबाडलेले जन्मसिद्ध मानवीदर्जाचे हक्क, त्यांच्यांतील अंतस्थ अध्यात्म-वृत्तीला धक्का न लावतां तुम्ही त्यांना परत देण्यास समर्थ आहांत काय ? त्यांच्यांतील चैतन्यदीप न मालवतां उद्दीपित करण्याइतकें तेज तुमच्या ठिकाणीं आहे का ?

९ जोंपर्यंत हिंदुसमाजांतील मागसलेला प्रचंड जनसमूह उपासानें व्याकूळ होत आहे, लाखों जीवांना जगण्याइतकें देखील अन्न आणि अंगापुरतें सुध्दां वस्त्र मिळण्याची ददात पडत आहे, तोंपर्यंत सुशिक्षित हिंदूंनो, तुमचें सुशिक्षितत्त्व, तुमची सुस्थिति त्यांच्या श्रमानें मिळालेली असतांना, त्यांच्याकडे बेफिकिरी दृष्टीनें, तिऱ्हाइती बाण्यानें वागणारे आपण ‘अकृतज्ञ’ आहांत हें लक्षांत ठेवा. त्यांच्या ऋणाची फेड न करण्यांत तुम्ही अमानुषपणा दाखवीत आहांत अशी माझी खात्री आहे.

१० जोंपर्यंत त्या मागासलेल्यांच्या स्वत्त्वापहारावर त्यांच्या जीविताच्या कवडीमोल विक्रयावर हे अकृतज्ञ सुशिक्षित स्वतःच्या सुशिक्षितत्वाची बडेजाव मिरवीत आहेत, आणि जोंपर्यंत त्या सहकोटी हिंदूंसाठीं कांहींही करण्याचा त्यांचा मानस नाहीं, त्यांच्या उद्धाराचा विचारही त्यांना अस्पृश्य वाटत आहे, तोंपर्यंत हे सुशिक्षित म्हणविणारे लोक म्हणजे दुसऱ्याच्या जीवितापहारावर उपजीविका करणारे रानटी पशूच आहेत असें मला वाटतें.

११ त्या मागासलेल्या वर्गाच्या स्वत्वापहारावर जे अकृतज्ञ सुशिक्षित त्या दीन जीवांना पिळवटून मिळविलेल्या वैभवावर ऐट मिरवीत मोठा दिमाख दाखवीत आहेत, इतक्या दीर्घकालपर्यंत त्यांना लुबाडून त्यांची उपासमार आणि गळचेपी करूनही अद्याप त्यांच्यासाठीं कांहीं तरी कार्य करण्याचा विचारही ज्यांना शिवत नाहीं, त्या हिंस्रवृत्तीच्या सुशिक्षितांना, अकृतज्ञांना मी इशारा देऊन जागें करीत आहें. त्यांना आव्हान करण्यासाठींच मी उभा आहें.

त्या मागासलेल्या समाजाविषयीं आपलें कर्तव्य.

१२ आपणांपैकीं प्रत्येकानें त्या, दारिद्र्यानें गांजलेल्या, तुंबडी भरणाऱ्या पोटार्थी लोकांच्या डावपेचांत गवसलेल्या अनन्वित छळानें जर्जर झालेल्या लाखों ‘ अस्पृश्य ’ अस्पृष्ट हिंदूंसाठीं ईशप्रार्थना केली पाहिजे.

१३ आपण परमेश्वराच्या शोधार्थ आगमानिगमांचीं वनें कशाला धुंडतां ? जपतपाची खटाटोप उगाच कां करतां ? ते दीन हतबल गरीब लोक तरी परमेश्वरच नाहींत का ? त्यांची, त्या प्रचंड समाजाची सेवा कां करीत नाहीं ? ती जनताजनार्दनाचीच सेवा नाहीं का ? गंगेच्या स्फटिकोदकाचा दोन हातावरचा प्रवाह सोडून कांठावर विहिरी खोदण्याचा आणि डबकीं उपसण्याचा व्यर्थ निरर्थक उपक्रम करण्यांत शक्तीचा अपव्यय कां करितां ? त्या दीन-हीन अस्पृश्यांच्या ठिकाणींच परमेश्वरस्वरूपाचें अधिष्ठान करा. त्यांच्याविषयीं कळकळीनें विचार करा. त्यांच्या उद्धारार्थ खटखट करा. त्यांच्यासाठीं त्या दीनदयाघन

प्रभूला अहर्निश आळवा कीं तो भक्तवत्सल प्रभुराय तुमच्या मार्गांत तुम्हांला सहाय्य करून तुमचा वाटाड्या होईल.

१४ गरिबासाठीं ज्यांचें अंत:करण तळमळत आहे, गरिबासाठीं जो हळहळत आहे, गरिबांचे हाल पाहून ज्याच्या हृदयाला पीळ पड-तात, त्याच आत्म्याला, त्याच शक्तीला मी ' महात्मा ' म्हणतो. नाहीं-तर आत्मोद्धाराचीच पर्वा करणार महान् तपस्वी सुद्धां 'दुरात्माच' होय.

१५ आपले मागासलेले हिंदू बांधव खरोखर ' सुजन ' आहेत. ते गरीब आहेत म्हणून त्यांना कमी लेखूं नका. गरीबी हा त्यांचा दोष नाहीं. त्यांची वृत्ति तापट नसून ते किती तरी सहनशील आणि साधुवृत्त आहेत. पाश्चात्य देशांतील कमी दर्जाच्या लोकांपेक्षां मागासलेले हिंदु खास सुसंस्कृत आहेत. त्यांना आधिभौतिक ज्ञान देणें हें आपलें कर्तव्य आहे. आपण त्यांना ऐहिक कर्तव्यें करण्यास वाव दिला पाहिजे. आपल्या परमपूज्य ऋषिवर्यांनीं घालून दिलेला मार्ग आपण अनुसरला पाहिजे. तो मार्ग म्हणजे मागासलेल्या हिंदसमाजांत हळूहळूं उच्च तत्त्वांचा परमोच्च ध्येयाचा प्रसार केला पाहिजे. त्या परमोच्च ध्येयाची त्यांना ओळख करून दिली पाहिजे. त्या अस्पृश्य हिंदूंना हळुहळू जागे करा. त्यांना उन्नतीला आणा. आणि समानतेचे सर्व हक्क देऊन त्यांचा अभ्युदय करा. धार्मिक शिक्षणांतूनच व्यावहारिक शिक्षणाचेही धडे द्या.

१६ त्या हिंदबांधवांची खात्री पटवून द्या कीं, ब्राह्मणांला स्वत: हिंदू म्हणवून घेण्याचा जितका अधिकार आहे तितकाच तुम्हांलाही हिंदुधर्माविषयीं अभिमान बाळगण्याचा अधिकार आहे. तुमच्या तेजस्वी मंत्राचें तेज त्या मागासलेल्या चांडाळाच्याही वाटयास येऊं द्या. आयु-

ष्यांतील आवश्यक कर्माविषयीं त्यांना आकलन करतां येईल असा उपदेश करा. आणि व्यापार, शेती इत्यादि त्यांच्या वर्णाश्रमधर्मांत त्यांची प्रगति होण्यासाठीं प्रयत्न करा. जर एवढेंही तुम्ही करूं शकलां नाहीं, ' अध्यापन हें तुमचें परमपवित्र कर्तव्य करण्याचीही तुमच्यांत ताकद नसेल तर तुमच्या सुसंस्कृतत्वाला धिःक्कार असो. तुमच्या वेदांच्या पारायणाला आणि वेदांताच्या अध्ययनाला—त्या पल्लवग्राही पांडित्याला धिःक्कार असो.

१७ कर्मयोगाचें आचरण प्रथम आवश्यक आहे. कर्मयोग ह्याच परमेश्वराचा अवतार आहे. कर्मयोग परमेश्वरस्वरूप आणि विश्वाचें जीविततत्त्व आहे. जोंपर्यंत ' तृषाक्षुधा ' रूपी परमेश्वराचें तुम्ही सांत्वन करीत नाहीं तोंपर्यंत तुमच्या धर्मतत्त्वांच्या प्रवचनाची कोणीही पर्वा करणार नाहीं. ज्या लोकांसाठीं तुम्ही प्रवचन करीत आहां त्यांना पोटभर अन्न मिळत नसेल, जीवनाची मुष्कील असेल, त्यांच्या ठिकाणीं असणाऱ्या क्षुधातृष्णादि भावना शांत झाल्या नसतील, ' खाणें पिणें ' हेंच जीवन या जीविताविषयींच्या क्षुद्रकल्पनांचा क्षुधातृष्णादिकांच्या शांतीनें बींमोड झाला नसेल तोंपर्यंत तुमचीं प्रवचनें हीं सर्व निष्फल होतील. कोरडा वेदांत निरुपयोगी ठरेल. म्हणून अंतरात्मा प्रथम थंड करावयास पाहिजे.

१८ सर्व देश तामसी भावनांच्या वातावरणांत गुरफटलेला आहे. आज राजसी शक्तीच्या प्रचंड जागृतीची जरूर आहे. त्यांच्यांत जागृति उत्पन्न होण्यासाठीं त्यांच्या ठिकाणच्या तामसी वृत्तीच्या धुंदी उतरल्या पाहिजेत. अन्नवस्त्राभावीं आलेली ग्लानी दूर झाली पाहिजे. त्यांना

जीवन देऊन अन्नाचा घांस घालून चैतन्य उत्पन्न करा. मालवती जीवितज्योत जीवनाच्या पुरवठ्यानें जागवून उद्दीपित केली पाहिजे.

१९ त्यांना जगाचें ज्ञान प्राप्तकरून देण्यासाठीं एक द्रव्यनिधि जमवा. त्यांतून मॅजिक लॅंटर्न, नकाशे, पृथ्वीचे गोल इत्यादि उपकरणें, शिवाय शास्त्रीय रसायनें इत्यादि जमवा. आणि या उपकरणांसह प्रत्येक दिवशीं सायंकाळीं त्या गरीब दीन लोकांच्या वस्तींत जा. त्या समुदायांत कोणालाही मज्जाव नसावा. त्या जमलेल्या समुदायापुढें प्रथम धर्मतत्वांचें प्रवचन करून त्यांच्यांत धर्मतेज जागृत करा. नंतर ह्या उपकरणांच्या साह्यानें त्यांना त्यांच्या देशीभाषेंतून भूगोल खगोल इत्यादिकांविषयीं शिक्षण देऊन अशा रीतीनें त्यांना आध्यात्मिक आणि आधिभौतिक जगाची ओळख करून त्यांचा उद्धार करा.

२० बाह्य जगांत, पाश्चात्यदेशांत जीं तत्वें, ज्या कल्पना, जीं ध्येयें मानवी समाजांत परिपूर्णावस्थेस गेलीं आहेत, त्या ध्येयांची ओळख अत्यंत हीन-दीन झालेल्या गरीब दुबळ्यांना, त्यांच्या झोंपडीच्या दाराशीं रानावनांत हिंडून करून दिली पाहिजे. त्यांच्या दारावर जागृतीची थाप मारली पाहिजे. या कल्पनेवर याच शिक्षणपद्धतीवर माझा विशेष भर आहे.

त्यांच्या धर्मभावनास न दुखवतां त्यांचा उद्धार करणें हें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून कार्य करा.

६

हिंदी स्त्रियांचा उद्धार.

त्यांची गतकालीन व सद्यःस्थिति.

कित्येक शतकांपासून, आर्य स्त्रियांच्या संरक्षणाची जबाबदारी परिस्थितीनें आपणांवर [पुरुषवर्गावर] टाकली आहे. परंतु म्हणून पुरुषवर्गापेक्षां स्त्रियांची योग्यता हिंदुसमाजांत कमी लेखली जाते असा आमच्या चालीरीतीचा अर्थ नसून पुरुषवर्गावर त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी आहे हाच त्या रूढींतील अर्थ आहे.

२ हिंदुस्त्रियांची वाढ, हिंदस्त्रियांच्या आयुष्याचें परिवर्तन अशाच परिस्थितींत होत असतें कीं, त्या पूर्ण अबला, आर्जवी, परावलंबी बनून केवळ संकटाच्या सुगाव्याबरोबर रडून रडून डोळे कोरडे करण्या-इतक्याच योग्यतेच्या होत आहेत.

३ संसारांतील दक्षता, व्यावहारिक वळण, या बाबतींत आमच्या हिंदी स्त्रियांची शिक्षणपद्धति सर्वांपेक्षां जास्त आहे असें ग्रथित करण्यास मला मोठा अभिमान वाटत आहे.

४ ज्या वंशांत सीतेसारख्या साध्वी जन्मास आल्या, निदान त्या कुलांत सीतेसारख्या साध्वींच्या तेजांशाचा तरी उदय झाला, त्या कालीं आर्यसमाजांत स्त्रियांविषयीं जितका आदर होता तितका जगांत कोठेंही नव्हता. तत्कालीन समाजांत आर्यसमाजांत स्त्रियांची जी योग्यता होती त्या योग्यतेपर्यंत जगांतील कोणचाही स्त्रीसमाज पोहोंचला नाहीं.

९ विद्यार्थी आणि विद्यार्थिनी एकाच पवित्र आश्रमांत अध्ययन करीत होत्या. या शैक्षणिक संहतीपेक्षां शिक्षणाची आणखी निर्दोष पूर्णावस्था दुसरी कोणची असणार ? संस्कृतनाटकांचें अवलोकन करा. शकुंतलेचें कथानक वाचा आणि मग टेनिसनची ' प्रिन्सेस ' शकुंतलेपेक्षां कांहीं जास्त शिकविते कीं काय तें पहा. शकुंतला श्रेष्ठ कीं प्रिन्सेस श्रेष्ठ तें ठरवा.

हिंदुस्त्रियांचा प्रश्न सोडविण्याचा मार्ग.

६ मला लोक वारंवार विचारतात कीं, "विधवांच्या परिस्थितीबद्दल आणि स्त्रियांच्या प्रश्नांवर तुमचीं काय मतें आहेत ?" आणि त्या सर्वांना उत्तरादाखल एकच सवाल करतों कीं, मी स्वत: विधवा आहें का ? कीं मी स्त्री आहे तर मला मूर्खासारखे असे प्रश्न विचारतां ? स्त्रीसमाजाविषयीं प्रश्न विचारण्याचा आणि त्याच्या स्पष्टीकरणाविषयीं मत देण्याचा मला काय अधिकार आहे ?

७ स्त्रियांपुढें आज कित्येक गहन प्रश्न आहेत परंतु त्यांतला एकही प्रश्न इतका गहन नाहीं कीं जो शिक्षणाच्या चमत्कृतिपूर्ण संस्कारानेंही सुटणार नाहीं.

८ स्त्रियांपुढें असलेल्या अडचणींविषयीं विचार करण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे ? तुम्ही सर्व सत्ताधारी विश्वप्रतिपालक परमेश्वरच आहांत कां ? कीं त्या श्रेष्ठत्वानें प्रत्येक हिंदस्त्रीवर आणि विधवेवर तुम्ही इच्छेस येईल तीं बंधनें लादावींत. आर्यसंस्कृतींत जन्मास आलेल्या हिंदस्त्रिया आपल्या पावित्र्यतेजानें स्वसंरक्षण करण्यास आणि

त्यांच्यापुढील गहन प्रश्न सोडविण्यास समर्थ आहेत. त्यांना तुमच्या अमानुष निर्बंधाची आणि सत्तेच्या जुलमाची मुळींच आवश्यकता नाहीं.

९ हिंदुस्थानांतील सर्व स्त्रीसमाजापेक्षांसुद्धां प्रत्येक अमेरिकन स्त्री जास्त ज्ञानसंपन्न असते. मग आमच्या आर्यस्त्रियांस तसलेंच शिक्षण मिळून त्यांची कर्तृत्वशक्ति त्या दर्जापर्यंत कां वाढू नये ? आपल्या देशभगिनी तितक्या सुसंस्कृत आणि स्वावलंबी कां नसाव्यात ? आपल्या भगिनींना तितकें सुशिक्षित करणें हें आपलें कर्तव्य नाहीं का ? अलबत हें कर्तव्य आपण बजावलेंच पाहिजे.

१० अमेरिकन समाजांत प्रत्येक स्त्रीस सदिच्छात्मक व्यक्तिस्वातंत्र्य असतें. आणि म्हणूनच स्वावलंबनानें त्या इतक्या सुसंपन्न आणि कार्यक्षम होतात. परंतु आज आपणांत इतकी परदास्यवृत्ति, विषण्णता आणि दौर्बल्य असण्याचें कारण काय ? कारण अगदीं उघडच आहे कीं मातेचें संगोपन आणि मानसिक शारिरिक वाढ जर परदास्यवृत्तीच्या वातावरणांत झाली असेल तर तिची संततीसुद्धां त्याच वृत्तीची आणि नेभळट निघाली तर त्यांत नवल काय ?

स्त्रीशिक्षण.

११ प्रत्येक आर्यस्त्रीला 'पावित्र्या'ची परिपूर्ण जाणीव असते. पावित्र्य व पातिव्रत्य हा त्यांचा वंशपरंपरेपासून संस्कारच आहे. म्हणून हिंदस्त्रियांच्या साठीं होणाऱ्या शिक्षणघटनेंत असें ध्येय ठेवा कीं, त्या शिक्षणाच्या योगानें त्यांच्यांत धैर्य उत्पन्न होऊन, त्या पावित्र्यस्फूर्तीनें आपल्या पातिव्रत्यतेजासाठीं, आयुष्याच्या वाटेल त्या अवस्थेंत (विवा-

हित असोत किंवा त्यांची सदिच्छा असेल तर अविवाहित राहोत.) पण कसल्याही अवस्थेंत एक क्षणभरही आपला तेजोभंग होऊं न देतां त्या देहाचा होम करण्यास, 'जोहार' करण्यास कचरणार नाहींत. पातिव्रत्यापासून एक निमिषमात्र न ढळतां प्रसंगीं काळाच्या खाईंत सुद्धां उडी घेण्यास त्या तयार होतील. इतकें प्रचंड मनोधैर्य त्यांच्याठिकाणीं उत्पन्न करणारें शिक्षण द्या.

१२ अशा अपरिपक्वावस्थेंत स्त्रियांपुढील गहन प्रश्न त्यांना सुचतील तसे सोडविण्याची जबाबदारी केवळ स्त्रियांवर टाकतां कामा नये. अशा अज्ञानावस्थेंत त्यांना राहूं देणें श्रेयस्कर होणार नाहीं.

१३ भारतभूच्या उद्धारार्थ या आपल्या मातृभूमीच्या उदरीं अत्यंत पवित्र अंत:करणाचीं, निर्मल, ब्रह्मचारी, आणि ब्रह्मचारिणी अशीं नररत्नें निपजलीं पाहिजेत. असल्या पावित्र्यतेजानें स्वयंप्रकाशित होणाऱ्या रत्नांची आज मातृभूमीच्या तेजास उजाळा देण्यासाठीं जरूर आहे.

१४ अर्वाचीन युगाच्या गरजा लक्षांत घेतां, कालाच्या प्रवाहाची दिशा विचारांत घेतां, असल्या पावित्र्यतेजानें दीप्ति धारण करणाऱ्या, आजन्म ब्रह्मचर्यव्रताचें एकनिष्ठ पालन करणाऱ्या, वेदकालीन पूर्वजांपासून चालत आलेला पावित्र्याचा जो अखंड प्रवाह त्यांच्याही हाडीं मासीं भिनला आहे. त्या पावित्र्यानेंच ज्यांची पिंडधारणा झाली आहे त्याच पावित्र्यानेंच दैदीप्यमान होत्सात्या, पातिव्रत्यशक्तीचें तेजोवलय धारण करणाऱ्या योगिनी आपल्या हिंदभगिनींत तयार व्हावयास पाहिजेत. असल्या तेज:पुंज योगिनींची अत्यंत आवश्यकता आहे हें लक्ष्यांत येईलच.

१५ या शिक्षणाबरोबरच त्यांना आधिभौतिकशास्त्रीय विषयांचेंही शिक्षण दिलें पाहिजे. आणि इतरही अंगांचें शिक्षण जें त्यांनाच व्यक्तिशः नव्हे तर इतरांनांही उपयोगी होईल तें मिळालें पाहिजे.

१६ या देशांतील पुरुषवर्गाला मला जें सांगावयाचें आहे तेंच मी स्त्रियांनाही सांगेन. भारताच्या ठिकाणीं पूर्ण भक्ति आणि श्रद्धा ठेवा. भारतीय श्रद्धेचें व संस्कृतीचे जतन करा. सशक्त, समर्थ, आशावादी आणि धीट व्हा. जगांतील कोणतीही गोष्ट संपादन करणें असेल तर विनिमयार्थ असा अमूल्य सांठा, जगांतील कोणत्याही जातीपेक्षां हिंदू-जवळ लाखोंपटीनें जास्त आहे. हिंदूची ही दातृत्वशक्ति जागृत ठेवा. या दातृत्वाची जाणीव राहूं द्या.

१७ ज्याप्रमाणें बारावर्षांपर्यंत ब्रह्मचर्यव्रताचें पालन केल्यानंतरच पुत्रांचा विवाह व्हावा त्याचप्रमाणें कन्यासुध्दां आयुष्याच्या परिपक्वावस्थे-पर्यंत ब्रह्मचारिणीच राहिल्या पाहिजेत. व त्यांना त्यांच्या पितृजनांनीं सुशिक्षित व कार्यक्षम करणें हें त्यांचें कर्तव्य आहे.

१८ आज क्षणोक्षणीं आपल्या अनुभवास येत आहेच कीं आधुनिक शिक्षणपद्धतींत श्रीसीतादेवीच्या पवित्र ध्येयापासून त्यांना फिरविण्याचा आटोकाट प्रयत्न होत आहे पण तो पदोपदीं फोल ठरत आहे. असल्या प्रयत्नाच्या सुरवातींतच अवनतीचा आरंभ झाला आहे असें अनुभवास येत आहे.

१९ श्रीसीतादेवीच्या पवित्र अयुष्याचें एकांतिक आचरण पावलांवर पाऊल ठेऊन हिंदस्त्रियांनीं केलें पाहिजे. त्याहून दिव्यतर असा मार्गच त्यांना सांपडावयाचा नाहीं.

२० हिंदस्त्रियांच्या सुधारकांना सवाल करून मी विचारतों कीं, आपणांमध्यें आपल्या भगिनींचा उद्धार करूं शकाल तरच आपणांस आत्मोद्धाराची आशा आहे. नाहीं तर आज आपण आहांत तसेच युगांतापर्यंतही जगाच्या पाठीमागें रहाल हें लक्ष्यांत आणा.

२१ तुम्हीं कोणत्या महान् पुरुषास खरा शक्तिउपासक समजतां? माझी अशी श्रद्धा आहे कीं ईश्वराच्या सर्व व्यापकत्वाची साक्ष ज्याला पटते आणि आपल्या हिंदभगिनीच्या ठिकाणीं, विश्वभगिनीच्या ठिकाणीं अखिल ब्रह्मांडांत वास्तव्य करणाऱ्या सर्व भावात्मक ईशसत्तेचें प्रकट ज्याला स्वरूप [illegible] दिसतें तोच एक दिव्य पुरुष खरा शक्त्युपासक म्हणतां येईल.

७

जातिभेद.

वर्णाश्रम-भेद आवश्यक आहे.

ज्ञातिभेद हा शुभपरिणामी आहे. आयुष्याचा प्रश्न सोडविण्यास जीवित कलहांत जिवंत राहण्यासाठीं जातिभेदात्मक वर्णाश्रम धर्मपालन हाच एक निसर्गसिद्ध मार्ग आहे. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी असून मनुष्यांचे ज्ञातीसंघ झालेच पाहिजेत. समाजांतून निघून जाऊन संघाशिवाय जगणें अशक्य होईल. जगांत कोठेंही जा. वर्णाश्रमभेद हा असणारच.

२ वर्णाश्रम धर्माचा लोप होतां कामा नये. प्रसंगानुरूप फक्त त्यांना सुसंघटित स्वरूप द्यावयास पाहिजे. जुन्या रूढींचा लोप न करतां ज्ञातीच्या नियमित आचारांत वर्णाश्रम धर्माच्या क्षेत्रांतच सहा कोटी लोकांच्या जीवनाची सोय झाली पाहिजे. चातुर्वर्ण्याश्रमाच्या आचारांचें अतिक्रमण न करतां तेवढ्या क्षेत्रांतच सहा कोटी जीवांचा सुखोत्पादक यथोचित समावेश झाला पाहिजे. जातिभेद नाहींसा करून वर्णाश्रमव्यवस्थेचा बींमोड करून सबगोलंकार करूं पहाणें हा शुद्ध मूर्खपणा आहे.

३ चातुर्वर्ण्याश्रमानुसार झालेल्या ज्ञातिसंस्था राष्ट्रीय संरक्षणास अत्यंत आवश्यक आहेत. आणि जेव्हां राष्ट्र आत्मप्रभावावलंबी, प्रत्येक हिंदू पूर्ण स्वावलंबी होईल तेव्हां हीं साधनें आपोआप ढिलीं होतात. आत्मप्रभावाच्या उत्कर्षानंतर सर्वात्मभावाच्या उदयानंतर आपपरभाव आपोआप नाहींसा होईल. हे भेदाभेद उरणार नाहींत.

४ हिंदुसमाजांतील चातुर्वर्ण्याची व्यवस्था अमेरिकेंतील किंवा युरोपीय समाजांतील वर्णव्यवस्थेपेक्षां पुष्कळ बरी. आमची वर्णव्यवस्था पूर्ण निर्दोष आहे असा माझ्या म्हणण्याचा आशयच नाहीं. परंतु विचार करण्यासारखी गोष्ट आहे कीं आज जर वर्णाश्रमव्यवस्था नसती, जातिभेद नसते तर तुमची काय अवस्था झाली असती ? तुमचा समाज कोठें राहिला असता ? तुमचें वर्णश्रेष्ठत्व वर्णभेदाभावीं कोठें उरलें असतें ? तुमचें वेदाध्ययन आणि आत्मज्ञान हीं श्रेष्ठत्वें; ज्ञातिभेद उरला नसता, वर्णाश्रमव्यवस्था राहिली नसती तर कवडी मोलाचीच झालीं नसती का ? परंतु त्या वर्णश्रेष्ठत्वाच्या कल्पना, इतर ज्ञातींना अग्राह्य असे अधिकार आतां उरले नाहींत. **"तेहि नो दिवसा गताः ।"**

.५ अर्वाचीन ज्ञातिभेद हा भारताच्या अभ्युदयास प्रतिबंधक होत आहे. राष्ट्राच्या उन्नतीस हीं ज्ञातिबंधनें मार्गे खेंचीत असून राष्ट्रपुढाऱ्यांना नाउमेद करीत आहेत. राष्ट्रांतील विभक्तता वाढवून ज्ञातिभेदाच्या रूढीच्या बंधनांनीं राष्ट्रैक्यास अडथळा करून राष्ट्राच्या नाड्या आखडल्या जात आहेत. उन्नतीच्या भावनाविकासापुढें या ज्ञातिबंधनांचा बोजवारा उडेल.

६ आधुनिक कालांतील चढाओढीकडे नुसत्या चढाओढीच्या प्रस्तावाकडेच पहाल तर जातिभेदाचा किती झपाट्यानें लोप होत आहे, रूढीचीं बंधनें किती तडफेनें तुटत आहेत हें तुम्हांस सहज दिसेल.

त्यांच्या नाशासाठीं कोणत्याही धर्माच्या उच्छेदाची गरज नाहीं. ब्राह्मण चर्मकार झाले आहेत. चर्मकार्य आणि मद्यविक्रय हीं तर उत्तरहिंदुस्तानांतील पदोपदीं सर्वसाधारण दिसणारीं दृश्यें आहेत. यांतलें इंगित हेंच कीं कमालीची चढाओड आणि जीवितकलहाची कठीण अवस्था.

७ हल्लींच्या साम्राज्यांत कोणत्याही धर्माच्या मनुष्याला उपजीविकेच्या नांवाखालीं वाटेल तो धंदा करण्यास मुळींच मज्जाव नाहीं. आणि त्याचा भयावह परिणाम म्हणजे एकालाही पोटभर न मिळून विस्कळित समाजांत शेरास सवाशेर अशी गळचेपी करणारी चढाओढ आणि अशा रीतीनें हजारों लोक प्रारब्धकार्याच्या फलवृक्षाच्या अंकुराचीही वाट न पाहतां एकदम उच्च आकांक्षा पुरी करण्यासाठीं धडपडत आहेत. झाडाचें बीजारोपण केल्याशिवाय झाडाच्या शिखरावर जाण्याचा मार्ग शोधीत आहेत. पायाशिवायच इमारती उठवूं पहात आहेत.

८ इतरांना बुध्दिवैभवानें आणि आत्मप्रभावानें मागें टाकून, विशिष्ट व्यक्तित्व संपादून, इतरेतर सत्तेचा उपभोग आणि विशिष्ट हक्कांचा अधिकार गाजविण्याचे ब्राह्मकालाचे दिवस भारतांतून जणूं काय कायमचेच गेलेत. आणि ब्रिटिश अमलांतील चांगल्या फायद्यापैकीं एका अर्थी भारतांत झालेला हा एक अत्यंत श्रेयस्कर फायदा आहे.

उपरिनिर्दिष्ट प्रश्नांचें पृथक्करण.

९ जातीजातींतील वैमनस्यें, कलह हीं निरर्थक आहेत. त्यांपासून कांहींही हित होणार नाहीं. उलट असले कलह विकोपास जाऊन एकी बिघडवतात, विभक्तपणा वाढवतात, देशाच्या दौर्बल्यांत भर टाकतात, एकंदरींत राष्ट्रीय अवनतीसच कारणीभूत होतात.

१० उच्चवर्गीय हिंदूंना खालीं ओढून ब्राह्मणवर्गाला अवनतीला पोहोंचवून समानता उत्पन्न करण्याचा आत्मघातकी प्रयत्न करून जातीजातींल कलहाचा व तदंतर्गत अनिष्ट परिणामाचा कधींच शेवट व्हावयाचा नाहीं. हा मार्ग सोडून खालच्या वर्गाच्या लोकांनींच आत्मोन्नति करून घेऊन उच्चवर्गीय लोकांबरोबर योग्यता मिळविणें, अशानेंच हा प्रश्न सुलभ रीतीनें सुटणार आहे.

११ हिंदसमाजाचें एक उन्नत टोक ब्राम्हणवर्ग आहे आणि अवनत टोंक असें अत्यंत दीनावस्थेस पोहोंचलेला ‘ चांडाल ’ वर्ग हें होय. आणि समाजोन्नतीचा अर्थ एवढाच कीं अवनतीस गेलेल्यांना उद्धरून ब्रह्मत्वास नेणें. सांप्रतकाळीं ब्राह्मणवर्ग आपल्या ब्रह्मवर्चस्वानें उन्नतीस जात आहे तर दुसरे अवनतीच्या दरींत बुडल्याचा पाय खोलांत या

न्यायानें दिवसेंदिवस खोल खोल जात आहेत. ही समाजाची परस्पर विरुद्ध ओढाताण समाजांतील विस्कळितपणा वाढविते म्हणून सर्व समाजानें एकदिलानें, उन्नतावस्थेस येण्यासाठीं एकाच संघटित मार्गाचें आक्रमण केलें पाहिजे.

१२ 'बडे' लोकांच्या आधिपत्याच्या दृष्टीनें त्यांचें कर्तव्य एवढेंच उरलें आहे कीं आपल्या बडेजावीला बाजूस ठेवण्यांतच शहाणपणा आहे. समाजांतील श्रेष्ठवर्गानें आपल्या श्रेष्ठत्वानें लोकांवर होणारा जुलूम आणि ही अरेरावी बडेजावी जागच्याजागीं गाडलीं पाहिजे. नाहीं तर त्या अहंकारापायीं श्रेष्ठत्वाचा जुलूम असह्यावस्थेस गेला कीं, त्यांना समूळ नाशास जावें लागेल. वर्णश्रेष्ठांनीं, आपल्या वर्चस्वाचा विचार बाजूस ठेऊन, मागासलेल्यांना धि:क्कारलें तेवढा धि:कार पुरे करून त्यांच्या उद्धारार्थ झटण्यांत शहाणपणा ओळखला नाहीं तर त्यांची केंविलवाणी अवनति होईल.

१३ म्हणून आज हिंदुस्थानांतील ब्राह्मणेतर वर्गाच्या उद्धारासाठीं ब्राह्मणवर्गानें एकदिलानें सहाय्य करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. आपलें उच्चस्थान सोडून खालच्या वर्गाच्या उद्धारार्थ अवतार घेतला पाहिजे.

१४ ब्राह्मणेतरांनींही हें ध्यानांत ठेवावें, मी त्यांना एवढेंच सांगतों कीं, अभ्युदयाच्या कल्पनेनेंच हुरळून जाऊन माथेफिरू होऊं नका. ब्राह्मणांशीं दोन हात करून, त्यांना खालीं ओढण्याचा प्रयत्न करून आर्यधर्माचा लोप करण्यासाठीं टपून बसणें हीं हिंस्रवृत्ति तुम्ही सोडलीच पाहिजे. निरर्थक वादविवादांत आणि वर्तमानपत्रांतील भांडणांत लक्ष्य घालून घरांतल्या घरांत एकमेकांचा नि:पात करण्यांत सर्वशक्तींचा अपव्यय करूं नका. पापाचरणांत, धर्मउच्छेदनच्या नीच प्रयत्नांत

कालापव्यय न करतां, ब्राम्हणांच्या इतक्या सुसंस्कृतावस्थेस पोहोंचण्यासाठीं आपल्या सर्वशक्ती केंद्रीभूत करा कीं सर्व प्रश्न आपोआप सुटेल. आणि कलहबीजांचा समूळ उच्छेद होईल.

८

भारतीय श्रेष्ठत्वाची जोपासना आणि अभिवृद्धि.

अनाद्यनंत कालाचा आरंभ झाला त्या कालारंभीं एक प्रचंड प्रवाह उगम पावला. आणि तो प्रवाह युगायुगांच्या इतिहासगंगेंतून वहात आहे. त्या कालप्रवाहावर नियंत्रण करण्याची, इतिहासाचें वळण बदलविण्याची आणि त्या प्रवाहास नगराज हिमालयाच्या उत्तुंग व अनंत शिखरापर्यंत परत फिरविण्याची तुमची इच्छा आहे काय ? परंतु एवढीही प्रचंड महत्त्वाकांक्षा हिंदुत्वाच्या जोरावर आर्यत्वाच्या प्रभावानें तुम्ही पुरी करूं शकाल. अशक्य आणि अमानुष अशाही गोष्टी शक्य झाल्या तरी सुद्धां आर्यत्वाचें स्वरूप बदलून आर्यसंस्कृतींना आंग्लदेशीय करूं म्हणाल तर तें त्रिकालीं ही शक्य नाहीं. आर्यसंस्कृतीचा लोपच काय पण रूपांतरसुद्धां विश्वाच्या अंतापर्यंत देखील होणार नाहीं. उद्यां युरोपियन देश आपल्या पाश्चात्य संस्कृतीचा त्याग देखील करतील. त्यांच्या संस्कृती नष्ट झालेल्या तुम्हांला दिसतील. परंतु ते संस्कृतिभ्रष्ट झालेले आढळले तरी देखील दोन हजार वर्षांच्या कालानंतरही आज ज्या तेजोविभवानें तुम्ही जगूं शकला आहांत त्या अत्यंत उज्वल अशा आर्यसंस्कृतीचा त्याग तुम्ही करूं शकाल का ?

२ हिंदसमाजाच्या सुधारणेच्या मार्गांत वेडगळ धर्मसमजुतींचें दुर्निवार प्राबल्य व पाश्चात्य सुधारणांचा मोह हे दोन अत्यंत दुस्तर अडथळे ‘ आ ’ करून उभे आहेत. हे दोन ब्रह्मसमंध एकामागून एक असे राष्ट्रनौकेच्या प्रवाहांत उभेच आहेत. एकाच्या तडाक्यांतून बचावलें तर दुसरा तरी राष्ट्राचा स्वाहाकार करणारच. वेडगळ धर्मसमजुतींच्या माऱ्यांतून जीवितनौका कशी-बशी बचावून निघते तोंच पाश्चिमात्य सुधारणांच्या मोहबंधाच्या भोंव-ऱ्याकडे ती झुलूं पाहात आहे. आणि त्या मोहपाशाच्या आकर्षणास बळी पडून बेफाम दर्यात भडकून खडकावर आपटूं पहात आहे. एक वेळ वेडगळ धर्मसमजुती बऱ्या परंतु संस्कृतीसुद्धां राष्ट्रास भ्रष्ट करून पाश्चात्य संस्कृतीच्या वळणावर जाण्याचा विघातक मोह नको. कारण वेडगळ धर्मसमजुती झाल्या तरी त्यासुद्धां मानवी स्वभावाला धरूनच असतात. कारण त्यांचा उदय तरी आर्यधर्मांतर्गत तत्त्वांतूनच होतो. त्या समजुतींत अज्ञान, अपरिपक्वता असली तरी त्या ठिकाणीं निस्सीम श्रद्धा, उत्कट सामर्थ्य आणि पराकाष्ठेचें व्यक्तित्व वास करीत असते. हीं मनुष्यत्वाचींच दिग्दर्शक आहेत. परंतु पाश्चात्य संस्कृतीस बळी पडलेला, आर्य संस्कृतीस मुकलेला, संस्कृतिहीन हिंदू सर्वस्वीं अधःपाता-सच प्राप्त होतो. त्याच्या धर्मभावना वाटेल त्या संस्कृतींतील भरमसाट आणि विजातीय कल्पनांनीं असंबंध असतात; त्याचीं धर्मतत्वें त्याच्या बुद्धीच्या आटोक्याबाहेरचीं आणि अपरिपक्वावस्थेंतच ग्रहण केल्यानें बुद्धीभ्रंश करणारीं असतात त्यांचे विचार संस्कृतिहीनत्वामुळें अर्धवट आणि बहकलेले स्वेच्छाचारी असतात. तो विचारांना बळी पडतो त्याचें

कारण कोणत्याही एका संस्कृतींचीं बंधनें त्याच्या अंतःकरणावर नियंत्रण करीत नसतात.

३ आपल्यांतील कांहीं रूढींना आपण घातुक म्हणतां. परंतु त्या घातुक कां आहेत आणि खरोखरच घातुक आहेत कीं नाहींत याचा विचार आपण केलात का ? आमच्या रूढींना युरोपियन लोक घातुक म्हणतात म्हणून त्या घातुक असल्याच पाहिजेत हाच तुमचा स्वयंनिर्णय. पाश्चात्य संस्कृतीच्या मोहास बळी पडलेला हिंदू, अशाच तर्कशास्त्रानें आपल्या धर्मविहीनत्त्वाचें समर्थन करतो. परंतु माझ्या धर्माची योग्यता, त्यांतील तत्त्वांची युक्तायुक्तता ठरविण्यासाठीं मला इतर संस्कृतीच्या मानवांची जरूरच नाहीं. साहेब म्हणतो तें वेदवाक्य मानण्यास मी बांधलेला नाहीं. माझ्या धर्माची योग्यता मी हिंदू असल्यानें माझा मीच ठरवणार. परक्यांच्या अभिप्रायाची मला परवा नाहीं. आपणही अशी स्वयंनिर्णयाची पद्धति स्वीकारा. धर्मस्फूर्तीनें जागे होऊन उभे रहा आणि स्वधर्मांतच स्वावलंबनानें अभिमानाचें मरण मरा. परक्यांच्या तोंडाकडे धर्मासाठीं बघण्याची मला मुळींच जरूर नाहीं.

४ या अर्धवट अप्रबुद्ध जीवांना अद्याप व्यक्तित्वाची सुद्धां ओळख पटलेली नाहीं. वैयक्तिक असें त्यांना जगांत अद्याप कांहींच मिळालें नाहीं. सदसद्विवेकबुद्धीसह आत्मत्वाचा विक्रय करून गुलाम झालेले हे धर्महीन मानव—यांना आपण कोणच्या नांवानें संबोधणार ? पुरुष कीं स्त्रिया कीं मानवेतर प्राणी ?

५ कल्याणासाठीं असो किंवा अकल्याणासाठीं असो, आपली आत्मशक्ति, आपलें आत्मतेज आर्यधर्मांतच केंद्रीभूत झालें आहे. त्या

आत्मतेजाचा, सनातन धर्माचा ओघ तुम्हांला कधींही बदलतां येणार नाहीं. "**स्वधर्मे निधनं श्रेयः**" । त्या सनातन धर्माचा नाशही कधीं काळीं होणार नाहीं. त्याच्या सनातन स्वरूपांत अणुरेणूमात्रही बदल होणार नाहीं. त्या आध्यात्मज्ञानौघाच्या उगमस्थानीं दुसरा कोणताही ओघ उदय पावणार नाहीं आणि केवढ्याही प्रचंड ओघास त्या ओघाचें वळण बदलण्याची शक्ति नाहीं. तो प्रवाह एकमेक आणि त्याचें उदय-केंद्रही 'एकमेवाद्वितीय'च रहाणार. हजारों युगांच्या एकाद्या प्रचंड वृक्षाला मुळापासून उपटून दुसऱ्या जमिनींत त्याचें कधीं तरी बीजारोपण होईल का ? [त्याचप्रमाणें आज तेहतीस कोटी जीवांच्या पवित्र भूमींत रोंवलेल्या त्या जीवांच्या आत्मतेजाच्या प्रचंड जीवनावर फोफावलेल्या हिंदुधर्माच्या वृक्षाचें उच्चाटन करून दुसऱ्याच वाटेल त्या अपवित्र भूमीकेंत तो जगेल का ? असला प्रयत्न म्हणजे भूगोलावरील 'हिंदुस्थान' हा प्रदेश उचलून युरोपच्या जागीं ठेऊं पाहण्याचा, भूगोलाची उलथापालथ करण्यासारखा असमंजस, अमानुष असाच नाहीं का ? आर्यसंस्कृतीचीं पाळेंमुळें थोडीं फार जगांतील प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणापर्यंत पोहोंचलीं आहेत.]

६ उद्यां जर कोणी एखादा परद्वीपस्थ, परसंस्कृतीचा परकीय हिंदुस्थानांत येऊन खाणें पिणें, आणि आधिभौतिक सुखाचीच संपादना करणें यांतच जीवित कर्तव्यता आहे असें प्रतिपादन करूं लागेल तर त्या पाखंडवाद्यास, त्या असत्याचरणीं मानवास, या पवित्र भूमींत आश्रय मिळावयाचा नाहीं. या आधिभौतिक जगालाच परमेश्वर समजून, जड वस्तूलाच देवत्व देववून, कार्यालाच कारण समजून, मर्त्य

मानवालाच परमेश्वर मानणाऱ्या त्या पाखंडयाचा उपदेश ऐकण्यास एकाही हिंदूचें अंतःकरण तयार होणार नाहीं. त्याच्या उपदेशाची हिंदु अंतःकरणास पर्वा नाहीं.

७ इतर धर्मांना दोष देण्याची माझी इच्छा नाहीं. त्या संस्था, ते धर्म त्या त्या धर्माच्या अनुयायांना श्रेयस्कर असतील. परंतु आमच्या धर्माला विघातक आहेत. जें त्यांना अमृताप्रमाणें प्रिय असेल तेंच आमच्या ठिकाणीं हालाहलाप्रमाणें परिणाम करील. (गोहत्या मुसलमानांना प्रिय वाटत असेल परंतु गोमाता ही आमच्या हिंदुधर्माची उपास्य देवता आणि पावित्र्याची खाण आहे.) हाच पहिला धडा [परकीय धर्माचा स्वधर्मावर विघातक परिणाम कसा होतो] ही जाणीव अद्यापि आमच्यांत व्हावयाची आहे.

८ कोणताही समंजस मनुष्य हिंदुस्थानला 'विलायत' बनविण्याचा प्रयत्न करणार नाहीं. आर्यधर्माला ख्रिश्चन करूं इच्छिणार नाहीं. पौर्वात्य संस्कृतीची शिकवण अशीच होती. पौर्वात्यांनीं एकदा जगास आपल्या आत्मज्ञानाचा अनुभव जाहीर केला होता कीं, पृथ्वीवरील सर्व वस्तूंचा संग्रह करून सर्व जगाचें आधिपत्य मिळविलें तरी जर आध्यात्मशक्तीची संपादना केली नसेल तर त्या आधिभौतिक सामर्थ्याचा कोण केवा ? पौर्वात्य आयुष्याचें ध्येय हेंच होय. आणि उपरिनिर्दिष्ट तें पाश्चिमात्य संस्कृतीचें ध्येय या प्रत्येक ध्येयांत वैयक्तिक श्रेष्ठत्व आणि तेज हें आहेच. अर्वाचीन कालांतील पुनर्घटनात्मक कार्य म्हणजे या दोन्हीं ध्येयांचें हृदयंगम एकीकरण करणें हें होय. पौर्वात्यांना आध्यात्मिक विश्व जितकें प्रिय आणि सत्यमय वाटतें तितकेंच आधिभौतिक विश्व पाश्चात्यांना रहस्यमय वाटतें. पाश्चिमात्यांना पौर्वात्य लोक स्पप्नसृ-

ष्टींत वावरत आहेत असें वाटतें. आणि पौर्वात्यांच्या दृष्टीनें पाश्चिमात्य जीवित ध्येय म्हणजे असत्य वस्तूंचा बाजार आहे असें वाटून तें आयुष्य म्हणजे अविनाशी वस्तूंशीं विहार करण्यांत कालापव्यय करणें आहे असें वाटतें. विद्वान् आणि विदूषीही असल्या ध्येयाचा अनुवाद करून ज्या वस्तू आज ना उद्यां सोडाव्या लागतील त्यांचाच संग्रह करतांना पाहून मर्त्याविषयींचा एवढा बडेजाव माजविलेला पाहून त्यांना हंसूं लोटतें. प्रत्येकजण दुसऱ्यास स्वप्नमय सृष्टीमागें पळणारा समजतो परंतु माझी खात्री आहे कीं मानवी जीवांच्या उन्नतीसाठीं आधिभौतिक व आध्यात्मिक, पौर्वात्य आणि पाश्चात्य, अशीं दोन्हीं ध्येयें [redacted] आवश्यक आहेत, किंबहुना पौर्वात्य ध्येय पाश्चात्य ध्येया-इतकेंच अत्यावश्यक आहे.

९ राष्ट्राचें स्वरूप, राष्ट्रपुरुषाचा–देह त्याच्या पाठीशीं असलेल्या भावनाप्रवाहानुसार, विचारसरणीप्रमाणेंच धारण केला जातो. राजकारण हें इंग्लंडचें स्वरूप त्याच्या राष्ट्रीयभावनांचें, राष्ट्रीयध्येयाचें दिग्दर्शकच आहे. आध्यात्मविचार हाच भारताचा आत्मा आहे. त्या आध्यात्म-विचारसरणीला अनुसरूनच हजारों वर्षांपासून हिंदुस्थानची घटना होत आहे. आधिभौतिकवादी युरोपीयांना भारतीय लोक आध्यात्मवादी, मूर्ख आणि हेकेखोर वाटणारच. आणि या संस्कृतीभिन्नत्वामुळेंच हिंदुस्थान-वर राज्य करणें मूर्खपणाचें आणि अशक्य वाटत असतें.

१० आधिभौतिक शास्त्रांच्या उत्क्रांतीबरोबरच त्यांच्या पूर्व-जांच्या कालीं चालत असलेल्या धर्मपंथानुसार व रूढीनुसारच हल्लीं धर्मपंथ सुरू झाले आहेत. त्यांच्या अर्वाचीन धर्मसमजुती व विचार-सरणी हीं सर्व गतकालीन विचारौघानुसार आहेत. आपण हिंदुलोकही

इतर रूढीबरोबरच हजारोंवर्षांपासून चालत आलेल्या गतकालीन कर्मानुसार आणि आचाराप्रमाणेंच आमच्याच संस्कृतीचें निसर्गतःच अनुसरण करूं शकूं. रुळलेल्या मार्गावरून भविष्याचा मार्ग काढावयाचा आहे आणि त्याच मार्गाचा आम्हांस अवलंब करावा लागेल.

भारतीय श्रेष्ठत्वाचा विकास.

११ आपल्या मार्गांत हजारों विघ्नें 'आ' करून उभीं आहेत. आपण 'विश्वास माहीत असणारे' लोक आहोंत ही जाणीव आपल्या मार्गक्रमणाची दुस्तरता जाणवीत असते. उज्वलदेशभाक्ति आणि पूर्वजांविषयीं पूज्याभिमान याशिवाय आणखी किती तरी सद्गुण इतर राष्ट्रापासून शिकावयास पाहिजेत. गतकालीन वैभवाची स्मृति, गतेतिहासाची जाणीव झाल्यावांचून माझ्या हातून कार्य होतच नाहीं. परंतु तें वैभव प्राप्त करून घेण्यासाठींच प्रत्येकाला गुरू समजून, सर्व राष्ट्रांचें गुणाशिष्यत्व पत्करण्याची, त्यांचे पादवंदन करण्याची, तयारी असली पाहिजे. कारण लक्ष्यांत ठेवा कीं स्वतंत्र राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्ति तुम्हांला स्वातंत्र्यप्राप्तीचे महत्वाचे धडे देईल.

१२ पाश्चात्यांपासून आपणास पुष्कळ गोष्टी शिकल्या पाहिजेत. त्यांच्यापासून त्यांच्या कलांचें आणि शास्त्रीय विषयांचें ज्ञान संपादिलें पाहिजे. शारीरशास्त्रांचें अध्ययन आपण त्यांच्या जवळच केलें पाहिजे. उलट धर्म आणि अध्यात्मविद्या यांचा मेळ बसवून जीवितौघ अव्याहत करण्याचा मार्ग जाणण्यासाठीं पाश्चात्यांना आर्यावर्ताकडेच धांव घेतली पाहिजे. पारलौकिक सुखासाठीं आर्यावर्त हा विश्वास एकटाच मार्गदर्शक आहे.

१३ हिंदुस्तानाबाहेरील जगाशिवाय आपलें चालावयाचें नाहीं. बाह्यजगाची फिकीर न करतां आपण चालूं शकूं ही आपली कल्पना आतां मात्र फोल ठरली. आणि त्या बेदरकारीबद्दल आपणास प्रायश्चित्ता-दाखल हजारवर्षेंपर्यंत दास्यत्व पत्करण्याचें खडतर तपश्चरण करावें लागलें.

१४ इतर राष्ट्रांशीं स्वसामर्थ्याची तुलना केली नाहीं, आपल्या भोंवतीं वावरत असलेल्या वातावरणाचा संदेश ऐकण्याची फिकीर बाळगली नाहीं, आसमंतात् चाललेल्या घडामोडींचें, उत्क्रांतीचें रहस्य ओळखण्याची आवश्यकता वाटली नाहीं हेंच भारताच्या अवनतीचें सर्वांत प्रबल कारण होय. परदेशगमनाच्या निषिद्धत्वाच्या कल्पना फोल ठरल्या. त्या पोरकट कल्पनांचें डोक्यांतून समूळ उच्चाटन केलें पाहिजे. परदेशीं जितका प्रवास कराल, बाह्यजगाशीं जितकें संघट्टन कराल, परकीय जितके दोस्त कराल, तितका तुमचा आणि तुमच्या देशाचा फायदा होईल. राष्ट्राचा अभ्युदय जवळ येईल. शेंकडों वर्षां-पूर्वींच हें प्रमादक्षालन केलें असतें तर आज भारतावर सत्ता गाजवूं इच्छिणाऱ्या राष्ट्रांचें दास्य पत्करण्याची पाळीच आपणावर येती ना.

१५ परक्यांचा द्वेष करून परराष्ट्रावर द्वेषात्मक बहिष्कार घालून कोणत्याही राष्ट्रास, कोणत्याही व्यक्तीस जिवंत राहणें अशक्य होईल. ज्या दिवशीं इतर राष्ट्रांचा संबंध सोडून, परराष्ट्रांचें दळणवळण निषिद्ध मानून ' म्लेंच्छ ' या शब्दाचा शोध भारतांत लागला त्याच दिवशीं हिंदुस्तानची भवितव्यता दास्यत्वानें रेखाटली गेली. ललाटलेख बदलला. त्या अस्पृश्यत्वाच्या भावना तुमच्या कशा हाडींमासीं खिळल्या

आहेत, त्या भावनांचें पोषणच तुम्ही कसें करीत आहां हें नीट लक्ष्यांत आणा. वेदांताच्या गोष्टी बोलावयाला फार सोप्या आहेत पण वेदांताचीं साधीं साधीं तत्त्वें सुद्धां आचरणांत आणणें अत्यंत कठीण आहे.

१६ आपण प्रवास केला पाहिजे. परकीय राष्ट्रांत फिरलें पाहिजे. परदेशीय समाजयंत्रें सुरळीत चाललीं आहेत आणि परकीयांच्या अंतःकरणाची ओळख करून घेण्यासाठीं त्यांच्याशीं मोकळ्या मनानें, दिलदार स्वभावानें दळणवळण ठेवलें पाहिजे. तरच आपणांस पुन्हां ‘ राष्ट्र ’ स्वरूप प्राप्त होण्याची आशा आहे.

१७ आपल्या पायांवर उभे रहा. आणि तुम्हांला शक्य असेल तेवढ्या साधनसामुग्रीचा संग्रह करा. एकीकरण करा. प्रत्येक राष्ट्रांतील सद्गुणसंग्रहांतून कांहीं तरी उचला. तुम्हांला उपयोगी अशा गोष्टींचा अव्याहत संग्रह करा. परंतु लक्षांत ठेवा कीं ज्या अर्थीं तुम्हीं आर्य आहांत, हिंदू आहांत, त्या अर्थीं तुमच्या हिंदुत्वास रेसभरही कमीपणा न आणतां, तुमच्या राष्ट्रीयभावनांना प्राधान्य देऊन इतर सर्व भावना गौण आहेत ही जाणीव लक्षांत ठेऊन त्यांचें ग्रहण करा. राष्ट्रीयत्वाला विसरूं नका. इतर राष्ट्रांची शिकवण आपल्या राष्ट्रीयत्वाच्या लोपासाठीं घ्यावयाची नसून पुनरुज्जीवनासाठीं घ्यावयाची आहे हें एक क्षणभरही विसरूं नका. सर्व संपादावयाचें तें आपल्या मातृभूमीस सर्वसंपन्नत्व प्राप्त करून देण्यासाठीं हा बाणा ठेऊन कार्य करीत रहा.

प्रकरण ३ रें.

परराष्ट्रीय—बहिर्राष्ट्रीय कार्य.

भारताच्या बाहेरील जगांत जाऊन करावयाची विश्वसेवा.

पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन्हीही प्रकारचीं ध्येयें मानवी जगाच्या उन्नतीस आवश्यक आहेत.

१

या विश्वाची उभारणी श्रमविभागाच्या तत्वावर झालेली आहे. एकटींच व्यक्ति सर्व वस्तूंचा संग्रह करूं शकेल हें म्हणणें फोल आहे. पण आपण किती अज्ञानी आहोंत? ज्याप्रमाणें एकाद्या लहान बालकाला त्याच्या मनाच्या बाल्यावस्थेंत जगांत मिळविण्यासारखें कांहीं असेल तर फक्त आपलें ‘ खेळणें ’ एवढेंच आहे असें वाटतें. त्याचप्रमाणें आधिभौतिक सामर्थ्याच्या जोरावर बलवान् झालेलें राष्ट्र इतर जगाविषयीं अशी कल्पना करून घेतें कीं, जगांत मिळविण्यासारखें असें एक आधिभौतिक श्रेष्ठत्वच. आधिभौतिक श्रेष्ठत्व हाच जणूं काय उन्नतीचा उत्कर्ष आहे. सर्वांगीण उन्नति म्हणतात ती हीच. आधिभौतिक सामर्थ्याच्या उत्कर्षानें अध्यात्मदृष्टि अंध झाली म्हणजे हिंदुस्तानसारखें एखादें राष्ट्र आधिभौतिक श्रेष्ठत्वाची पर्वा करीत नसेल तर ‘त्या राष्ट्रांतील लोकांनीं जिवंत राहणें हें सुद्धां योग्य नाहीं.’ अशीं विधानें ही अध्यात्मांध राष्ट्रें करण्यास कचरत नाहींत. उलट पक्षीं आध्यात्मवादी एखाद्या राष्ट्रांतील लोकांची अशीच भावना असते

कीं आधिभौतिक वस्तूंचा संग्रह हा अविनाशी व कवडी मोल आहे. पाश्चात्यांना उच्च अध्यात्मज्ञानाची ओळख पटण्यास आध्यात्माचें आकलन करण्यास युगेंच्या युगें लोटलीं पाहिजेत. त्यांना प्रत्येक वस्तूची किंमत पौंड शिलिंग पेन्स येवढीच दिसते. त्या वस्तूंच्या आत्मस्वरूपाची ओळखही त्यांना नसते. ज्या धर्मांत त्यांना संपत्ति, सामर्थ्य, सौंदर्य किंवा दीर्घायुष्य मिळेल त्याच धर्माचे ते अनुयायी होतील. नाहीं तर धर्मविहीनत्व सुद्धां त्यांना पत्करेल. आध्यात्मिक हित, पारलौकिक श्रेय हें त्यांचें धर्मतत्व नसून ऐहिक वैभव हीच त्यांची धर्मदृष्टि.

२ स्वातंत्र्य हेंच उन्नतीचें आद्यतत्व आहे. आपले पूर्वज आध्यात्मिक पूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेत असत. त्यांनीं आत्म्याची शारीरप्रेमबंधापासून मुक्तता केली, आत्मज्ञानासाठीं जिवाचीही पर्वा केली नाहीं आणि तेव्हांच धर्माचें अभ्युत्थान झालें. परंतु शरीरालाच धर्मबंधनांनीं जखडल्यानें समाजाचा अभ्युदय झाला नाहीं. परंतु पाश्चात्यांची दृष्टि याच्या अगदीं विपरीत. त्यांनीं सामाजिक उन्नतीला प्राधान्य दिलें. सामाजिक सौख्यासाठीं धर्माचीही पायमल्ली केली. ऐहिक सुखासाठीं धर्मबंधनें स्वेच्छाचारीपणानें वाटेल तशीं ढिलीं करून धर्माचें पावित्र्य आणि श्रेष्ठत्व लयास नेलें.

३ सामाजिक उन्नतींतूनच पाश्चात्यांना आध्यात्मज्ञानाच्या प्रत्येक कणाची जरूर आहे. आणि पौर्वात्यांना आध्यात्मज्ञानाबरोबरच सामाजिक सामर्थ्याची गरज आहे.

४ यांत्रिक शक्ति मानवी सृष्टींत कधींच सुखोत्पत्ती करूं शकणार नाहीं. आणि यांत्रिक शक्तीनें मानवास पूर्ण सुखाचा कधींही

लाभ होणार नाहीं. " यांत्रिक शक्तीनें मानवी सृष्टि निर्भेळ सुखाचा आस्वाद घेण्यास समर्थ होईल " असा विश्वास ठेवण्यासाठीं जर तुम्हांस कोणीं सांगूं लागला तर तो 'सुख' या भावनेचा विपर्यास करीत आहे. यांत्रिक सुधारणेनेंच सुखाची उत्पत्ति करण्याचा वेडेपणा करीत आहे हें खास. सुख हें **'मानसिक भावनात्मक'** असतें. **"मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ।"** कारण जो आपल्या मनावर अधिकार चालवूं शकतो तोच सर्व जगांत सुखाचा स्वामी होईल. आणि ' मनाचे बंदे गुलाम ' असे इतरेजन आजन्म सुखासाठीं तळमळ-तच राहतील. ही सुखोत्पादनाची आध्यात्मशक्ति यांत्रिक सुधारणेंत आहे काय ? एकादा शास्त्रज्ञ एकाद्या तारेंतून विद्युत्प्रवाह वाहवूं शकला तोच सर्वश्रेष्ठ आणि सर्वज्ञ कां गणला जावा ? एवढ्याशा कार्यावरून त्यास सर्वज्ञत्व कसें प्राप्त होणार ? निसर्गाकडून क्षणोक्षणीं असे हजारों विद्युत्संदेश पाठविले जात नाहींत का ? यापेक्षांही चमत्कृतिनिधान अशीं लाखों कार्यें वेळोवेळीं निसर्गाकडून होत असतात. त्या निसर्गशक्तीपुढें, ईश्वरीतेजापुढें मानवी शास्त्रज्ञानाचा काय पाड ? मग आपण निसर्गालाच गुरू करून त्याचीच आराधना कां करीत नाहीं ? तुम्ही सर्व जगाचे स्वामी झालांत, सृष्टीच्या प्रत्येक अणुरेणूंचे भोक्ते झालांत तरी त्याचा काय उपयोग ? तुमच्या अंतःकरणांत सुखोत्पादनाची शक्ति, सुख-संवेदना ग्रहण करण्याइतकें चैतन्य असल्याशिवाय तुम्ही आत्मजय संपा-दल्याशिवाय विश्वाच्या सार्वभौमत्वानेंही तुम्हास सुख व्हावयाचें नाहीं.

९ एखादें फळ जमिनीवरच कां पडतें किंवा एखाद्या विद्युत्किरणानें माझा रक्तप्रवाह कां हेलावतो हें जर जाणण्याची मला जिज्ञासा असेल

तर मला त्या फळाच्या अंत:करणांत प्रवेश केला पाहिजे. या देहाचा त्याग केला पाहिजे. सूक्ष्म देह धारण केला पाहिजे. सृष्टीतत्वाचें गुह्य उकलण्यासाठीं विदेही बनून निसर्गाच्या अंत:करणाचा ठाव घेतला पाहिजे. शास्त्रज्ञ होणें हें उत्तम आणि मोठेपणाचें असेल. शास्त्रज्ञांना त्यांच्या संशोधनांत परमेश्वर त्यांना यश देवो. परंतु शास्त्र हेंच सर्वस्व आहे. शास्त्रज्ञ होणें, आधिभौतिक ज्ञानाचा स्वामी होणें हेंच इतिकर्तव्य होणें असें जर कोणी प्रतिपादूं लागला तर तो मूर्खासारखा बरळूं लागला असें म्हणावें लागेल. आयुष्याचें आदितत्व संपादण्याची पर्वा न करतां आयुष्याचाच अभ्यास न करतां तो अगदीं बाष्कळ बडबड्या ठरेल.

६ सर्व दु:खांचा शेवट करण्याची शक्ति एकट्या आध्यात्मिक ज्ञानांतच आहे. इतर ज्ञान संपादनानें फक्त तत्कालीन गरजा तात्पुरत्या भागविल्या जातात. परंतु केवळ आध्यात्मिक ज्ञानाच्या योगानेंच सर्व सुखेच्छा विलयास जातात. सुखाची हांव नाहींशी होते अविनाशी वस्तूंचा मोह नाहींसा होतो.

७ शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर झालेला बौद्धिक सामर्थ्याचा आणि शारिरीक बलाचा उत्कर्ष नि:संशय प्रशंसनीय आहे. परंतु यापैकीं एकाही बलसंपादनांत आध्यात्मज्ञानाइतकी, जगावर चिरस्थायी प्रकाश पाडण्याची शक्ति नाहीं.

८ पाश्चात्य सुधारणांच्या भपक्याकडे आणि तेजस्वी चमकेकडे लक्ष देऊनही, त्यांच्या सामर्थ्याचा आणि वैभवाचा चमत्कृतिपूर्ण उत्कर्ष दिसत असतांना सुद्धां, या व्यासपीठावरून मी त्यांना त्यांच्या समोर जाहीर रीतीनें सांगतों कीं त्यांचें वैभव फोल आहे. पोकळ गौरवाची पराकाष्ठा आहे. मिथ्यागर्वाची परमावधी आहे. एकटा परमेश्वरच सत्यमय आणि अनाद्यनंत अविनाशी आहे.

९ तुम्ही पाश्चात्य लोक, लष्करी सामर्थ्य, राजकारणाचें वैभव या व अशाच इतर बाबतींतच, एवढ्या नियमित वातावरणांतच फक्त कार्यक्षम आहांत. परंतु या वैभवाच्या अभावीं सुद्धां आम्हीं पौर्वात्य लोक आध्यात्मिक वातावरणांत, धर्माच्या साम्राज्यांत पूर्ण कर्तृत्वशील आणि कार्यक्षम आहोंत.

१० 'हुरा'! अशा गर्जनेबरोबर एखाद्या तोफेच्या तोंडावरही उडी मारण्यांत दिसून येणारें तुमचें धैर्य, स्वदेशाच्या नांवानें मातृभूमीच्या प्रेमासाठीं एकदम दंड थोपटून रणांगणाकडे धूम ठोकून देह विसर्जन करण्यांत दाखविलें जाणारें तुमचें अतुल शौर्य हीं जशीं तुमच्या कीर्तीस भूषणावह आहेत, आम्ही त्याप्रमाणेंच पौर्वात्यही देवाच्या नांवानें, 'हरहरमहादेव' या गर्जनेबरोबर धर्माच्या भगव्या झेंड्याखालीं एकत्र जमून धर्मक्षेत्रांत सर्वस्वासह हवन करण्यांत तितकेच शूर आहोंत याची साक्ष इतिहास तुम्हांला पटवीतच आहे.

११ आधिभौतिक आयुष्यांत सुखाचा लोट करणें हें जसें तुमचें पाश्चात्य ध्येय आहे तसेंच उच्च आणि पवित्र अशा वातावरणांत सदैव विहार करणें आणि धर्म हा केवळ शाब्दिक प्रकार नसून धर्मांतर्गत प्रत्येक तत्त्व पूर्णत्वास येतें हें स्वतःच्या आयुष्यांत सप्रमाण अनुभवणें हें आमचें पौर्वात्य ध्येय आहे.

१२ पाश्चात्य देशांत मनुष्याच्या वैभवाची परमावधी किती होऊं शकेल हा प्रश्न सोडविण्यासाठीं सर्व झटत आहेत. तर आम्ही पौर्वात्य-लोक मानवी जीविताची क्षणभंगुरता पटवून घेऊन पारलौकिक सुखाचे ठेव जोडण्यासाठीं झटत आहोंत.

१३ एक राष्ट्र विजयी आणि दुसरें पराजित होण्याचें कारण काय? प्रेमाचा विजय होतो कीं द्वेषबुद्धीच शेवटीं विजयी होते? सुखोपभोगानेंच जय मिळेल कीं धर्माच्या पुनरुज्जीवनानेंच विश्वोद्धार होईल? जीवितकलहांत जडाचा टिकाव लागेल कीं अविनाशी आत्मतत्वाचाच जय होईल? या प्रश्नमालिकेस पौर्वात्य संस्कृतींत असेंच उत्तर मिळेल कीं धर्माचें पुनरुज्जीवन, सर्वस्वाचा त्याग, धैर्य आणि प्रेम हींच विजयी ठरण्यास योग्य आहेत. अविनाशी आत्मतत्वाचा आश्रय केल्यानेंच मानवीजीवितकलहांत यशस्वी होतां येईल.

१४ धर्म हा आशियाचा आत्मा आहे तर राजकारण हेंच युरोपचें जीविततत्व आहे.

१५ आध्यात्मिकबलावर आशियानें अमानुष सामर्थ्य संपादिलें, त्याचप्रमाणें आधिभौतिकबलावर शास्त्रीयशक्तीनें युरोपनें राक्षसीशक्ति कमाविली आहे.

१६ पौर्वात्यांना यांत्रिक-ज्ञानप्राप्तीसाठीं पाश्चात्यांचें शिष्यत्व पत्करावें हें यथायोग्यच आहे. तसेंच हेंही तितकेंच सत्य आहे कीं पाश्चात्यांना आत्मज्ञानाचें अध्ययन करणें असेल, ईश्वराची ओळख पटवून घेणें असेल, आत्म्याची साक्ष ओळखणें असेल, या सृष्टीक्रमाचा अर्थ आणि विश्वाचें चमत्कृतिनिधान पाहणें असेल. तेव्हां त्यांनीं या गोष्टी जाणण्यासाठीं पौर्वात्यांचेच पाय धरले पाहिजेत.

१७ आसमतात् विश्वांत आत्मज्ञानाचा उपदेश करणें हेंच आमचें परराष्ट्रीय धोरण. आणि धार्मिक मतभेद आणि कलह घरांतल्या घरांत विझवणें हेंच आमचें आंतर्राष्ट्रीय कार्य होय.

१८ आर्यधर्माचीं दिव्यसत्यतत्त्वें जगास सांगा. त्यांचा प्रसार करा. जग त्यासाठीं उत्सुकतेनें वाट पहात आहे.

१९ हिंदुस्तानाबाहेर जाऊन प्रत्येक राष्ट्रांत प्रवास करणाऱ्या, सूर्यानें प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक भूभागावर फिरून आपल्या धर्माचा उपदेश, सर्व धर्मांच्या, सर्व जातींच्या, सर्व पंथांच्या प्रत्येक प्राणिमात्राला करा. हेंच तुमचें पवित्र कर्तव्य आहे.

२० अनेक शतकांपासून जगाला अवनतीचे मार्ग दाखविले जात आहेत. " तुम्हीं कुजत चालला आहांत अवनतीच्या घोर पंकांत रुतत आहांत " अशी शिकवण त्यांना दिली जात आहे. म्हणून त्यांना एकदा अविनाशी आत्म्याची जागृति ऐकवा. त्यांना मोठ्यानें ओरडून सांगा कीं, क्षुद्रापेक्षांही क्षुद्रतम अशा अणूरेणूंइतक्या सूक्ष्म जीवांतही अनंत आणि अविनाशी आत्मा वास करीत आहे तो कधींच नाश पावत नाहीं. **नायं हन्ति न हन्यते ।**

२१ राष्ट्रीय जीवनाच्या प्राप्तीचा, चैतन्यपूर्ण राष्ट्रीय जीवनाचा एकच मार्ग म्हणजे आर्यधर्माचा, आर्यविचारांचा आर्यतत्त्वांचा जगावर पगडा बसवून विश्वावर विजय संपादणें हा होय.

२२ आपण देशाबाहेर पडलें पाहिजे. आपल्या आध्यात्मिक तेजानें वेदांतानें जगावर विजय मिळविला पाहिजे. त्याशिवाय उन्नतीचा अन्य मार्गच नाहीं. तोच आपण अनुसरला पाहिजे नाहीं तर दास्यपंकांत बुडून मरणें तरी पत्करलें पाहिजे.

२३ भारत सम्राट अशोकानें आपल्या भारतीय दिग्विजयाचें वर्णन, धार्मिक आणि आध्यात्मिक उत्कर्षानें विश्वावर जय असेंच केलें आहे. पुन्हां एकवार भारताला विश्वाचें सार्वभौमत्व संपादिलें पाहिजे. विश्वाचें सार्वभौमत्व हेंच माझ्या आयुष्याचें स्वप्न झालें आहे. आणि तें

सार्वभौमत्व मिळवीपर्यंत तुम्हांलाही ध्यानीं, मनीं, स्वप्नीं सार्वभौमत्वाचाच ध्यास लागला पाहिजे. तोच तुमच्या चित्ताचा विषय होऊं द्या. आणि तें स्वप्न सत्यसृष्टींत उतरवीपर्यंत स्वस्थ बसूं नका. हेंच आयुष्याचें अंतिम ध्येय आहे आणि तें गांठण्यासाठीं प्रत्येकानें तयार असलें पाहिजे. हिंदुस्थानचा दिग्विजय हेंच तें दिव्यतम ध्येय. एक रेंसही कमीप्रतीचें ध्येय नको आहे. आटोकाट जिवापाड प्रयत्न झाले पाहिजेत. पाश्चात्यांना खुशाल सरसाऊंद्या. आपल्या सेनासागरासह वाटेल तेवढा धुमाकूळ घालूं द्या. पुढचें पाऊल इंचभरही मागें न घेतां आघाडी मारा. भारता, ऊठ जागा हो. आणि आपल्या आत्मतेजानें विश्वाच्या सार्वभौम राजाचें सिंहासन अलंकृत कर.

२४ आधिभौतिक वादाचा आणि तदंगभूत सर्व दुःखांचा शेवट आधिभौतिक सामर्थ्यानें कधींच होणार नाहीं. जेव्हां एखादा सेनासमूह दुसऱ्या सेनासमूहावर चाल करून जातो तेव्हां ते युद्धाची भयानकता द्विगुणितच करतात. आणि मानवी समाजाला राक्षसी स्वरूप देऊन हिंस्रवृत्तीची वाढ करतात. म्हणून आध्यात्मिक तेजानेंच सात्विक बलानेंच पाश्चात्यांवर जय मिळविला पाहिजे. आणि आत्मतेजापुढेंच पाश्चात्यांना हार खावी लागेल.

२५ आध्यात्मिक ज्ञानतेजाचा अमोघ अनंत संग्रह तुमच्याजवळ आहे. तुम्हीं पाश्चात्यांना तुमच्या दिव्यधर्माचीं तत्वें शिकवा. वेदांतज्ञानाची भिक्षा घालून त्यांच्यावर कृपाप्रसाद करा.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ॥
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥ १ ॥

समाप्त.